• पुणे, बुधवार, ५ मार्च २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 98 • वर्ष ४ थे, अंक ९८ • किंमत ₹ ६ • पाने : १२



पुणेकरांनो पाणी जरा जपूनच.! P३

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



टीम इंडिया अंतिम फेरीत १२

## At a Glance

### स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक लांबणीवर

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था प्रकरणाची सुनावणी मंगळवारी (दि. ४) सर्वोच्च न्यायालयात काही मिनीटे पार पडली. मात्र, दोन्ही बाजूंना आपले म्हणणे स्पष्टपणे न मांडता आल्यामुळे न्यायालयाने संताप व्यक्त केला. आणि पुन्हा एकदा ही सुनावणी लांबणीवर पडली. या प्रकरणाची सुनावणी आता कधी होणार, हे अद्याप अस्पष्ट आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता पावसाळ्यापूर्वी होण्याची शक्यता कमी असल्याचे कायदा क्षेत्रातील जाणकरांचे मत आहे.

मंगळवारी पार पडलेल्या सुनावणीत सुरूवातीलाच सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी राज्य सरकारच्या वतीने न्यायालयाला दोन दिवसांचा वेळ मागितला होता. याचिकाकर्त्यांनी या गोष्टीचा विरोध केला. यावर न्यायालयाने दोन्ही बाजूंना या प्रकरणासंबंधी विचारणा केली. न्यायालयाने

» पान ७ वर

### पुण्यात हिरा व्यापाऱ्याचे अपहरण

**पुणे :** पुण्यातील एका उच्चभ्रू परिसरात सोमवारी एक व्यापाऱ्याचे अपहरण करण्यात आले. संबंधित व्यापारी आपल्या घरापासून अचानक गायब झाला आणि अपहरणकर्त्यांनी त्याच्या पत्नीला मोबाईलवर फोन केला. त्यांनी २ कोटी रुपये मागितले आणि पैसे तयार ठेवण्याची धमकी दिली. घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त पोलीस आयुक्त आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त राजकुमार शिंदे, निखिल पिंगळे, विवेक मासाळ यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे.

### पक्षनेतेपदासाठी कोणताही फॉर्म्युला नाही: उद्धव ठाकरे

**मुंबई :** विधानसभेच्या विरोधी पक्षनेतेपदावर भास्कर जाधव यांची नियुक्ती करावी अशी मागणी करणारे पत्र मंगळवारी ठाकरे गटाच्या वतीने अध्यक्ष राहुल नार्वेकरांना देण्यात आलं. त्यानंतर विरोधी पक्षनेतेपदासाठी अडीच वर्षांचा फॉर्म्युला शरद पवारांच्या पक्षाने ठेवल्याची चर्चा सुरू झाली. त्यावर आता स्वतः उद्धव ठाकरेंनीच स्पष्टीकरण दिलं आहे. विरोधी पक्षनेतेपदासाठी अडीच वर्षांचा कोणताही फॉर्म्युला नाही असं त्यांनी स्पष्ट केलं.

विधानसभा विरोधी पक्षनेतेपदाचा तिढा जवळपास सुटल्याची शक्यता आहे. महाविकास आघाडीमध्ये शिवसेना ठाकरे गटाने या पदावर दावा केला आहे. ठाकरे गटाकडून भास्कर जाधव

» पान ७ वर

### पुण्यात पुन्हा अग्नी तांडव

**पुणे :** कात्रज भागात इलेक्ट्रिक वाहन निर्मिती करणाऱ्या एका कंपनीत मंगळवारी दुपारी आग लागली. कंपनीतील साहित्याने पेट घेतल्यानंतर आग भडकली. अग्निशमन दलाच्या जवानांनी आग तासाभरानंतर आग आटोक्यात आणली. कात्रज-गुजरवाडी रस्तयावरील साई इंडस्ट्रिअल इस्टेट परिसरात इलेक्ट्रिक दुचाकी निर्मिती करणारी कंपनी आहे. मंगळवारी दुपारी चारच्या सुमारास कंपनीत आग लागली. आग लागल्यानंतर कंपनीतील कामगार बाहेर पळाल्याने अनर्थ टळला. कंपनीतील साााहित्याने पेट घेतल्यानंतर आग भडकली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे सहा बंब आणि टँकर घटनास्थळी दाखल झाले होते.

अग्निशमन दलाच्या कात्रज केंद्रातील अधिकारी प्रदीप खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली जवानांनी पाण्याचा मारा करुन तासाभरानंतर आग आटोक्यात आणली.

» पान ७ वर

# अखेर राजीनामा



## फडणवीसांच्या दबावानंतर निर्णय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अखेरच्या तंबीनंतर धनंजय मुंडे यांनी दबावाखाली येऊन अखेर राजीनामा दिल्याचे स्पष्ट झाले आहे.

गेली दोन महिने विरोधक धनंजय मुंडे यांचा राजीनामा मागत होते, परंतु निगरगट्ठ धनंजय मुंडे यांनी राजीनामा देण्याची तयारी दाखवली नाही. परंतु संतोष देशमुख यांना मारतानाची क्षणचित्रे समाज माध्यमांवर वाऱ्याच्या वेगाने प्रसारित झाल्यावर समाजमन सुन्न झाले. त्यानंतर धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याचे काऊंट डाऊन सुरू झाले.

अजित पवार यांनी नैतिकतेचे धडे दिल्यावर तसेच राजीनामा मागून मागून विरोधकांच्या तोंडाला फेस आल्यावर आणि त्यांचा घसा कोरडा झाल्यावरही मंत्री धनंजय मुंडे यांनी गेंड्याची कातडी पांघरली होती. परंतु देशमुख हत्या प्रकरणात पोलिसांनी न्यायालयात दाखल केलेल्या दोषारोपपत्रातून मारेकऱ्यांनी सरपंचांना किती अमानुष पद्धतीने मारले, यासंबंधीची छायाचित्रे समोर आल्यानंतर आणि मित्रपक्षांतूनही राजीनाम्यासाठी दबाव वाढल्यानंतर अखेर नैतिकता खुंटीला टांगलेल्या धनंजय मुंडे यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. त्यांच्या राजीनाम्यासाठी देशमुख यांचे निर्वस्त्र फोटो आणि अंगावरील असंख्य व्रण महाराष्ट्राला पाहावे लागले.

» पान ७ वर

## छायाचित्रांनंतर दबाव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** संतोष देशमुख हत्या प्रकरणात पोलिसांनी न्यायालयात दाखल केलेल्या दोषारोपपत्रातून मारेकऱ्यांनी सरपंचांना किती अमानुष पद्धतीने मारले, यासंबंधीची छायाचित्रे समोर आल्यानंतर आणि मित्रपक्षांतूनही राजीनाम्यासाठी दबाव वाढल्यानंतर अखेर नैतिकता खुंटीला टांगलेल्या धनंजय मुंडे यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. त्यांच्या राजीनाम्यासाठी देशमुख यांचे निर्वस्त्र फोटो आणि अंगावरील असंख्य व्रण महाराष्ट्राला पाहावे लागले.

गेल्या दोन महिन्यांपासून धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यासाठी विरोधकांनी जंग जंग पछाडले. पण आवादा खंडणी प्रकरण आणि देशमुख हत्या प्रकरणाशी दुरान्वयेदेखील संबंध नसल्याचे धनंजय मुंडे सांगत राहिले. परंतु अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या प्रारंभीच्या दिवशीच देशमुख यांच्या मारेकऱ्यांचे रौद्ररूप महाराष्ट्रासमोर आले. ज्यांच्याशिवाय धनंजय मुंडे यांचे पानही हालत नाही त्या वाल्मिक कराड याचा सहभाग खंडणी आणि हत्येत असल्याचे खुद्द गुन्हे अन्वेषण विभागानेच दोषारोपपत्रातून न्यायालयाला सांगितल्याने नाईलाजास्तव का होईना पण धनंजय मुंडे यांना मंत्रिपदावरून पायउतार

» पान ७ वर

## अडीच महिने कुठे होती नैतिकता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणातील नैतिक जबाबदारी म्हणून महायुतीमधील मंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेण्यात आला आहे. मुंडेंच्या राजीनाम्यानंतर नैतिकतेच्या मुद्द्यावर हा राजीनामा घेतल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून जारी करण्यात आलेल्या परिपत्रकातून म्हटलं



आहे. मात्र, गेल्या अडीच महिन्यांपासून नैतिकता कुठे होती, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे यापूर्वीच हत्याप्रकरणाचे फोटो पोहोचले नाहीत का, असा सवाल आता विरोधकांनी उपस्थित केला आहे. तसेच, धनंजय मुंडेंचा राजीनामा घेण्यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यात बैठक झाली. त्यानंतर, सकाळी मुख्यमंत्र्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना धनंजय मुंडेंचा राजीनामा घेतल्याचे सांगितले. मात्र, तांत्रिकदृष्ट्या अद्यापही त्यांचा राजीनामा घेण्यात आल्याची माहिती सभागृहात सांगण्यात आली

» पान ७ वर

## आता नंबर कोकाटेंचा! -अंबादास दानवे

**छ. संभाजीनगर :** धनंजय मुंडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. अशातच विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी धनंजय मुंडे यांच्यानंतर कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा नंबर आहे, असा इशारा दिला आहे.

दरम्यान, मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराडचे नाव समोर आल्यानंतर विरोधकांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली होती. तर १९९५ मधील एका प्रकरणात माणिकराव कोकाटे यांना नाशिक सत्र न्यायालयाने दोन वर्षांचा कारावास आणि ५० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली आहे. मात्र त्यानंतरही माणिकराव कोकाटे यांची विधिमंडळ सदस्यता कायम आहे. त्यामुळे या दोन्ही नेत्यांच्या राजीनाम्याच्या मागणीने अर्थसंकल्पीय अधिवेशन गाजणार हे सर्वश्रुत होते. त्यानुसार, अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधकांनी जोरदार घोषणाबाजी केली. यानंतर सोमवारी रात्रीच्या सुमारास संतोष देशमुख यांच्या मारहाणीचे फोटो समोर आले आणि आज (४ मार्च) धनंजय मुंडेंनी पदाचा राजीनामा दिला.



## राष्ट्रवादीने केली भूमिका स्पष्ट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय असलेला वाल्मिक कराड हा सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात प्रमुख आरोपी असल्यानं महायुती सरकारवर दिवसेंदिवस दबाब वाढत चालला होता. अशातच धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर वैद्यकीय कारणानं राजीनामा दिल्याचा दावा केला. त्यावरून विरोधकांकडून टीका होत असताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं भूमिका स्पष्ट केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत भूमिका मांडताना एक प्रकारे धनंजय मुंडे यांचा बचाव केला आहे. त्यांनी प्रसिद्धीपत्रक जारी करून धनंजय मुंडे यांचा संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी संबंध असल्याचं तपासात समोर आलं नसल्याचं म्हटलं आहे.

धनंजय मुंडे यांनी नैतिकतेच्या मुद्यावर एक जबाबदार राजकीय नेता म्हणून राजीनामा द्यायचा निर्णय घेतला. त्यांनी नैतिकतेच्या मुद्द्यावर राजीनामा दिला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यापूर्वी नैतिक मुद्यांवर स्वतः राजीनामा देऊन एक उदाहरण निर्माण केलं होतं. तसंच, या प्रकरणातही त्यांनी तशीच ठाम भूमिका घेतली होती. संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा कोणत्याही दबावाशिवाय तपास सुरू आहे. यामध्ये कोणताही दबाव न येता आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी भूमिका आहे. या प्रकरणी न्यायालयीन प्रक्रिया सुरू आहे. अद्याप तपास सुरू असल्यानं त्यावर अधिक भाष्य करणं उचित ठरणार नाही. मात्र, कोणत्याही गुन्ह्याला, गैरकृत्याला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं, आमच्या नेत्यांचं कधीही समर्थन असणार नाही. आजच्या घटनेतून हाच संदेश राज्याला गेला आहे, असं तटकरे यांनी पत्रात नमूद केलं आहे. देशमुख हत्याप्रकरणातील दोषींवर कडक कारवाई व्हायला हवी, अशी भूमिका पक्षानं प्रारंभापासूनच घेतल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष तटकरे यांनी स्पष्ट केलं. बीडसह संपूर्ण राज्यभरातील आमच्या पक्षाच्या नेत्यांनी याबाबत अत्यंत ठाम भूमिका घेतल्याचा दावादेखील पत्रकातून करण्यात आला.



संतोष देशमुख हत्याप्रकरणातील मुख्य सुत्रधार वाल्मीक कराड सह सर्व आरोपींना शिक्षा झालीच पाहीजे या मागणीसाठी पुण्यातील अलका चौकात निदर्शने करण्यात आली.

### 'वंदे भारत एक्स्प्रेस'च्या डब्यांची निर्मिती व दुरुस्ती

## अलंकापुरीत रेल्वेचा कोचिंग डेपो!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मध्य रेल्वे पुणे विभागातील रेल्वेच्या डब्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी नव्याने 'कोचिंग डेपो' सुरू करण्यात येणार आहे. आळंदी येथील स्थानकावर हा डेपो उभारण्यात येणार असून, त्यासाठी सुमारे ९० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. विशेष म्हणजे 'वंदे भारत एक्स्प्रेस'च्या डब्यांची निर्मिती आणि दुरुस्ती या ठिकाणी होणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली.

पुणे रेल्वे स्थानकात जागेची कमतरता पडत असल्याने विस्तारीकरणाचे काम सुरू आहे. रेल्वे प्रशासनाने प्रवासी वाहतूक करणाऱ्या गाड्यांचे नियोजन करता यावे, म्हणून मालवाहतूक करणाऱ्या गाड्यांसाठी स्वतंत्र व्यवस्था केली आहे. त्यामुळे या ठिकाणी डब्यांच्या दुरुस्त देखभाल करणाऱ्या 'कोचिंग डेपो'चे नियोजन होऊ शकत नसल्याने आळंदीची निवड केली आहे. त्यानुसार आळंदी स्थानक परिसरातील १० एकर जागेवर हा डेपो निश्चित करण्यात आला असून, पुणे रेल्वे विभागाकडून रेल्वे बोर्डाकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली.

सद्यस्थितीला पुणे स्थानकाजवळील घोरपडी कोचिंग मेंटेनन्स कॉम्प्लेक्स (जेसीएमसी) या ठिकाणी डब्यांची देखभाल दुरुस्ती करण्यात येते. दररोज ३०० पेक्षा अधिक डब्यांची

» पान ७ वर

**असे असेल कोचिंग डेपोचे नियोजन**

- डब्यांसाठी स्वतंत्र लाईन टाकणार
- ६०० मीटर लांबीच्या 'पीट लाइन' आणि दोन 'स्टेबलिंग लाइन' सुरू करणार
- डब्यांच्या दुरुस्तीसाठी 'सिक लाइन'ची व्यवस्था
- स्थानकाच्या जवळ दहा एकर जागा निश्चित
- ९० कोटी खर्च अपेक्षित

## पुणेकरांसाठी १२६१८ कोटींचा अर्थसंकल्प




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी २०२५-२६ साठी शहराचा अर्थसंकल्प मांडला. एकूण १२ हजार ६१८ कोटींचा हा अर्थसंकल्प ठरला. गत वर्षीच्या तुलनेत हा यंदाचा अर्थसंकल्प एक हजार कोटींनी अधिक आहे. त्यामुळे आतापर्यंतचे सर्व विक्रम मोडणारा हा अर्थसंकल्प ठरला आहे.

पालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी., अप्पर आयुक्त महेश पाटील, वित्त व लेखाधिकारी उल्का कळसकर, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, नगरसचिव योगिता भोसले आदी उपस्थित होते. पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३२ गावासाठी तब्बल ६२३ कोटी रूपयांची तरतुद करण्यात आली आहे. त्यामुळे समाविष्ट गावामध्ये पायाभुत सविधा निर्माण होणार आहे.

वैशिष्ट्य म्हणजे आयुक्तांनी कोणतीही करवाढ केली नसल्यामुळे सलग नव्या वर्षी पुणेकरांवर कोणतीही करवाढ असणार नाही. मात्र, महापालिका निवडणुकांच्या तोंडावर हा अर्थसंकल्प सादर झाल्याने ते प्रशासकाचे अंदाजपत्रक आहे की निवडणुकांचे? या बाबत चर्चा आहे.

» सविस्तर वृत्त पान ३ वर



# नव्या टर्मिनलवरुन विमानाची 'झेप'...!

## पूर्ण उड्डाणे नवीन टर्मिनलवरून होणार; आजपासून शुभारंभ

लोहगाव येथील नव्याने बांधण्यात आलेल्या नव्या टर्मिनलचा वापर करण्याचा निर्णय विमानतळ प्राधिकरणाने घेतला आहे; हे टर्मिनल बांधून पूर्ण होउन वर्षभरापेक्षा अधिक कालावधी उलटला असला तरी त्याचा वापर होत नसल्याने प्रवाशांमध्ये कमालीची नाराजी पसरली होती. त्याशिवाय विमानतळ प्राधीकरणावर चोहोबाजूंनी टीका होत होती, अखेर या टर्मिनलच्या प्रारंभाला अखेर मूहूर्त मिळाला असून येत्या ५ मार्चपासून सर्व विमानाची उड्डाणे नव्या टर्मिनलवरुन होणार आहेत. त्याचा फायदा प्रवाशांना होणार आहे; त्याशिवाय जुन्या टर्मिनलची नव्याने दुरुस्ती करण्यात येणार असून त्याठिकाणी प्रवाशांना विविध सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.



प्रवाशांना अधिकाअधिक दर्जेदार सुविधा मिळाव्यात आणि त्यांचा प्रवास अधिक सुखकर आणि जलद व्हावा यासाठी केंद्र शासनाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहेत; त्यामध्ये गेल्या काही महिन्यांच्या कालावधीत अपेक्षित यश आले आहे. त्यामुळे आगामी काळातही हे सातत्य कायम ठेवण्यावर केंद्र शासन आणि विमानतळ प्राधीकरणाचा भर राहणार आहे.

**-मुरलीधर मोहोळ,** केंद्रिय नागरी उड्डाण राज्यमंत्री

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** जुन्या टर्मिनलच्या पुनर्बांधणीमुळे विमानांची वाहतूक नवीन टर्मिनलवर टप्प्याटप्याने स्थलांतरीत करण्यात येत आहे. सध्या जुन्या टर्मिनलवरून १६ विमानांची उड्डाणे होतात. येत्या पाच मार्चपासून ही पूर्ण उड्डाणे नवीन टर्मिनलवरून होणार आहेत. जुन्या टर्मिनलच्या पुनर्बांधणीचे काम तातडीने हाती घेण्यात येणार असल्याचे पुणे विमानतळाचे संचालक संतोष ढोके यांनी सांगितले.

भारतीय विमानतळ प्राधिकरणाने दिलेल्या माहितीनुसार, पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाचे क्षेत्र ५२,००० चौरस मीटरपर्यंत पसरलेले आहे. त्यामध्ये १० उन्नत पूल, ३४ आगमन नोंदणी कक्ष, २५ स्वयंचलीत नोंदणी कक्ष, ५ प्रवाशी पिशव्या तपासून प्रवाशांपर्यंत पोहचणारी यंत्रणा (बॅग्ज कॅरोसेल) आहेत. पुणे विमानतळावर दिवसेंदिवस उड्डाणांची आणि प्रवाशांची संख्या वाढत असल्याने जुन्या टर्मिनलची पुनर्बांधणी करण्यात येणार आहे.पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जुन्या टर्मिनलच्या पुनर्बांधणीच्या कामाला येत्या आठवडाभरात सुरुवात होणार आहे. त्यामुळे बुधवारपासून (५ मार्च) सर्व उड्डाणे नवीन टर्मिनलवरून होणार असल्याची माहिती विमानतळ प्रशासनाकडून देण्यात आली.

आंतरराष्ट्रीय प्रवासापूर्वीची पडताळणी करण्यासाठीची सुविधा (इमिग्रेशन) आणि 'डीजी यात्रा' सुविधांचा अंतर्भावही नवीन टर्मिनलमध्ये असणार आहे.

विमानांची उड्डाणे नवीन टर्मिनलवर स्थलांतरीत करण्यात आल्याने प्रवाशी पिशव्या तपासणी करण्याच्या यंत्रणेत विलंब होत असल्याने प्रवाशांना ताटकळत थांबावे लागल्याचे प्रकार घडत आहेत. सोमवारी भोपाळ ते पुणे हे विमान पुणे विमानतळावर आले. प्रवासासाठी ५५ मिनिटांचा कालावधी लागला. विमानतळावर उतरल्यानंतर प्रवाशांच्या पिशव्या तपासून त्यांच्या हातात मिळेपर्यंत तब्बल ४५ ते ५० मिनिटांचा कालावधी लागल्याने संताप व्यक्त केला.

### अशा असणार जुन्या टर्मिनलवर सुविधा

- प्रशस्त आरामदायी आणि वातानुकुलीत क्षेत्र
- वातानुकुलीत प्रतीक्षाकक्ष
- खाद्य पदार्थांची दुकाने
- आसन कक्ष, स्वच्छतागृह
- महिलांसाठी स्वतंत्र कक्ष
- सुरक्षायंत्रणा आदी प्रवाशांसाठी सुविधा
- खर्च अंदाजे २५ कोटी

# बेकायदा सावकारीला कंटाळून तरुणाची आत्महत्या

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** बेकायदा सावकारी करणाऱ्या दोघांच्या त्रासामुळे तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घोरपडीतील ढोबरवाडीत घडली. तरुणाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरुन वानवडी पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

सचिन कट्टीमणी (रा. ढोबरवाडी, घोरपडी) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. याबाबत सचिन यांची आई येलक्का हनुमंता कट्टीमणी (वय ६१, रा. ढोबरवाडी, घोरपडी) यांनी वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, स्टिव्हन नेगल, विजय इंगळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सचिन यांनी आरोपी स्टिव्हन आणि विजय यांच्याकडून व्याजाने पैसे घेतले होते. व्याजाने घेतलेले पैसे, तसेच व्याजाची रक्कम परत करण्यावरुन आरोपींनी सचिन यांना त्रास देण्यास सुरुवात केली होती.. धमकीमुळे सचिन नैराश्यात होते. मार्च रोजी सचिन यांनी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक नंदकुमार जाधव यांनी घटनास्थळी भेट दिली. सचिन यांची आई येलक्का यांनी तक्रार दिली.

# आमदार बापूसाहेब पठारे तालिका सभापतीपदी



**पुणे :** विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी विधानसभा अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर यांनी नुकतीच विधानसभेच्या आठ तालिका अध्यक्षांची घोषणा केली. यात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाचे वडगावशेरी मतदारसंघाचे आमदार बापूसाहेब पठारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तालिका अध्यक्ष नियुक्तीवर आमदार पठारे म्हणाले, "विधानसभा अध्यक्षांच्या अनुपस्थितीत सभागृहाचे कामकाज सुरळीत चालवण्यासाठी तसेच विविध विषयांवर, विधेयकांवर सखोल चर्चा घडवून आणण्यासाठी 'तालिका अध्यक्ष' म्हणून असलेली जबाबदारी मी पूर्ण निष्ठेने आणि पारदर्शकतेने पार पाडेल. लोकशाही प्रक्रियेला अधिक बळकटी देण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करणे ही माझी प्राथमिकता असेल." तसेच, विधानसभा अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर यांचे त्यांनी आभार मानले. पठारे हे वडगावशेरी मतदारसंघातून दुसऱ्यांदा निवडून आले आहेत. त्यांना राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्राचा प्रदीर्घ अनुभव आहे. २००९-२०१४ या कार्यकाळात त्यांनी मतदारसंघातील पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, रोजगार निर्मिती आणि नागरी विकासाच्या अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्पांना चालना दिली आहे.

# स्वारगेट बस पुनरावृत्ती झाल्यास याद राखा- मनसे

**पुणे :** प्रत्येक आगारात खासगी प्रवासी वाहतूक करणारे एजंट, दारुडे, चोर यांचा सुळसुळाट झालेला आहे. या सर्वांचा बंदोबस्त करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना तातडीने करावी प्रवासी, माता भगिनींच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. स्वारगेट आगार, बसस्थानक व पुणे विभागातील इतर आगार व बसस्थानके येथे कोणताही अनुचित प्रकार यापुढे घडता कामा नये, काय उपाययोजना करायच्या त्या करा. यापुढे स्वारगेट घटनेची पुनरावृत्ती घटना पुन्हा घडल्यास आम्ही स्वस्थ बसणार नाही. स्वारगेट घटनेतील दोषींवर कडक कारवाई करा, अशी मागणी व इशारा महाराष्ट्र नवनिर्माण राज्य परिवहन कामगार सेनेने केली आहे.

याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण राज्य परिवहन कामगार सेनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अनिल पवार, सरचिटणीस किशोर चिंतामणी यांनी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे पुणे विभागीय नियंत्रक प्रमोद नेहूल यांना भेटून निवेदन दिले. तसेच कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. चार दिवसांपूर्वी स्वारगेट बसस्थानकात उभ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये पहाटे तरुणीवर झालेल्या बलात्काराच्या घटनेचा आम्ही तीव्र शब्दात निषेध व्यक्त करतो. या घटनेने राज्य शासनाच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली गेली. याला जबाबदार कोण?, याच्या मुळाशी जाणार कोण? असा सवाल महाराष्ट्र नवनिर्माण राज्य परिवहन कामगार सेनेचे अनिल पवार यांनी उपस्थित केला आहे.




# पीडितेचे चारित्र्यहनन रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आदेश द्यावेत -अॅड्.सरोदे

**पुणे :** स्वारगेट बलात्कार प्रकरणातील आरोपीला तब्बल ७२ तासांनी पोलिसांनी त्याच्याच गावात पकडून न्यायालयात हजर केले. त्यावेळी आरोपीच्या वकिलांनी दोघांच्या संमतीने हे घडले असल्याचा दावा केला होता. त्यानंतर आरोपीच्या आणखी एका वकिलाने त्यांच्यात आर्थिक देवाणघेवाण झाली असल्याचे विधान केल्याने सर्वत्र खळबळ उडाली होती. या विधानानंतर सोशल मीडियावर उलटसुलट प्रतिक्रिया उमटल्या. पीडितेचे चारित्र्यहनन करणाऱ्या पोस्ट टाकल्या जाऊ लागल्या. राजकारणी आणि अधिकारीदेखील पीडितेबद्दल खोट्या बातम्या पसरवू लागले आहेत. या पार्श्वभूमीवर अॅड. असीम सरोदे यांनी पीडितेचे चारित्र्यहनन रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आदेश द्यावेत, असा अर्ज न्यायालयात केला आहे.

स्वारगेट बलात्कार प्रकरणातील पीडितेचे चारित्र्यहनन करणारी वक्तव्ये सोशल मीडियासह सार्वजनिकरीत्या केली जात आहेत. त्या विधानांचा पीडितेवर मानसिक परिणाम होत आहे. त्यामुळे पीडितेचे चारित्र्यहनन रोखण्यासाठी न्यायालयाने प्रतिबंधात्मक आदेश द्यावेत, असा अर्ज अॅड.असीम सरोदे यांनी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात दाखल केला आहे. या अर्जातच पीडितेच्या वतीने वकीलपत्र सादर करण्याची इच्छाही त्यांनी व्यक्त केली आहे.

# महिला दिनानिमित्त गुरुवारी जनजागृती अभियान

**पुणे :** अॅक्युअर लाईफ सायन्स फाउंडेशन आणि डॉ. खुर्द गायनॅक इंडॉस्कॉपी व आयव्हीएफ सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून एरंडवणे भरत कुंज कॉलनी येथील डॉ. खुर्द हॉस्पिटल येथे पॉलिसिस्टिक ओवेरियन सिंड्रोम (पीसीओएस) विषयी जनजागृती अभियान आयोजित करण्यात आले आहे. गुरुवार, दिनांक ६ मार्च सकाळी ९ ते दुपारी १ यावेळेत रोजी स्त्रियांकरिता मोफत वैद्यकीय शिबीर, व्याख्यान व समुपदेशनाद्वारे याविषयी जनजागृती करण्यात येणार आहे, अशी माहिती डॉ. शंतनु जोशी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी डॉ. संजीव खुर्द, डॉ. साधना खुर्द आदी उपस्थित होते. अभियानांतर्गत गुरुवारी सकाळी ९ ते १० यावेळेत डॉ. संजीव खुर्द आणि डॉ. आदित्य खुर्द यांचे जनजागृतीपर व्याख्यान होणार असून डॉ. साधना खुर्द या देखील मार्गदर्शन करणार आहेत. त्यानंतर सकाळी १० ते १ यावेळेत विनामूल्य समुपदेशन व वैद्यकीय सल्ला दिला जाईल.

# भांडार विभागात भ्रष्टाचाराचे 'भंडार'

## तब्बल सव्वाचार कोटींची साहित्य खरेदी पुन्हा वादाच्या भोवऱ्यात

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत महापालिका प्रशासनाच्या सर्वच विभागात भ्रष्टाचाराला अक्षरश: 'उकळी' फुटली आहे, विशेष म्हणजे यापूर्वी आणि आताही महापालिकेच्या तत्कालीन शिक्षण मंडळात भ्रष्टाचाराचे पेव फुटले होते. त्यामुळे हे शिक्षण मंडळ बरखास्त करुन त्याजागी शिक्षण समिती नेमण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे, परंतु त्यामध्ये अपेक्षित बदल न होता या भ्रष्टाचाराला आता वेगळया नावाने ओळखू जाऊ लागले आहे. धक्कादायक बाब म्हणजे महापालिकेचा भांडार विभाग हा भ्रष्टाचाराचे अक्षरश: 'भंडार' झाले आहे. मात्र; प्रशासक राज असल्याने आणि त्यावर कोणाचाच अंकुश नसल्याने मूग गिळून गप्प राहाण्याशिवाय सर्वसामान्य नागरिकांकडे अन्य कोणताही पर्याय उपलब्ध नाही.



लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या आचारसंहितेमुळे या खरेदीला विलंब झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही, तरीही अशा प्रकारची खरेदी ही शैक्षणिक वर्षाच्या शेवटाला करणे ही बाब निश्चितच खेदजनक अशीच आहे. त्यामुळे प्रशासनानेही आता पुढच्या शैक्षणिक वर्षामध्ये खरेदीला प्राधान्य देऊ नये अशी आमची मागणी आहे.

**-बाळासाहेब जानराव,** माजी सदस्य, शिक्षण मंडळ, पुणे मनपा



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** महापालिकेचे शिक्षण मंडळ अस्तित्वात असताना खरेदी प्रक्रियेतील गैरव्यवहार हा नेहमीच चर्चेचा विषय राहिला. अखेर शिक्षण हक्क कायद्यानुसार शिक्षण मंडळे बरखास्त झाली आणि त्याचा कारभार महापालिकेच्या हाती आला. मात्र, विद्यार्थ्यांसाठी खरेदी करण्यात येत असलेल्या साहित्य खरेदीतील गैरव्यवहार काही थांबण्यास तयार नाही. त्यात शिक्षण विभागासाठी महापालिकेकडून करण्यात येत असलेली तब्बल सव्वाचार कोटींची साहित्य खरेदी पुन्हा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

शैक्षणिक वर्ष संपत आले असतानाच महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी नियम धाब्यावर बसवून तब्बल सव्वाचार कोटींच्या शैक्षणिक साहित्य खरेदीची निविदा मंजूर करण्यात आली आहे. धक्कादायक म्हणजे ज्या भांडार विभागामार्फत ही खरेदी प्रक्रिया होणार आहे, त्या विभागानेही फेरनिविदा काढण्याची शिफारस केली असताना आयुक्तांनी मात्र त्याकडे सोईस्कर दुर्लक्ष करून नियमबाह्य खरेदीचा मार्ग मोकळा केला आहे.

शिक्षण विभागाने दिलेल्या पत्रानुसार, भांडार विभागाने लिगल पेपर, लेजर पेपर, दोन प्रकारचे रायटिंग पॅड, दोन प्रकारचे रजिस्टर, प्लास्टिक फूटपट्टी, स्केच पेन, रंगीत खडू, टाचणी पिन, लाल टॅग, फाइल लेस, स्टेपलर (छोटे, मोठे),पंचिंग मशिन, स्टॅम्प पॅड, कात्री, बॉलपेन, रूम फ्रेशनर, कॅलक्युलेटर, मार्कर, कुलूप (लॉक), पेपर वेट, डस्टर, व्हाइट बोर्ड, कंपास पेटी (27 हजार नग), चार्ट पेपर, डिंक बाटली.

पब्लिक सिटिंग चेअर, लोखंडी कपाट, अशा विविध प्रकारच्या 47 वस्तूंची एकत्रित खरेदीची निविदा काढली. मात्र, या निविदेत अनेक चुकीच्या अटी असल्याच्या तक्रारी आल्यानंतर भांडार विभागानेच संबंधित निविदा प्रक्रिया रद्द करून नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यासंबंधी विनंती आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्याकडे केली होती.

मात्र, आयुक्तांनी ही विनंती फेटाळून लावत आलेल्या निविदा उघडल्यानंतर त्याबाबत आलेल्या तक्रारींचा कार्यादेश देताना विचार करावा, अशा शेरा मारला.

### असे घातले जातेय भ्रष्टाचाराला खतपाणी

- शैक्षणिक साहित्यांची गरज नसतानाही खरेदी
- शैक्षणिक वर्षाच्या शेवटला खरेदीचा खटाटोप
- प्रशासक असल्याने मनमानी कायम
- अधिकारी म्हणतात तुम्ही खा आणि आम्हालाही खाउ द्या
- शिक्षण विभागावर कोणाचाच वचक नाही
- शिक्षकांचाही मनमानी कारभार
- भरडला जातोय तो पालक आणि विद्यार्थी

# गुंड गजा मारणे याला न्यायालयीन कोठडी

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**



**पुणे :** मकोका अंतर्गत गुन्हा दाखल झाल्याने अटकेत असलेला गुंड गजा मारणे याला पुणे न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. कोथरूड परिसरात मारणे टोळीतील गुंडांनी आयटी अभियंत्याला बेदम मारहाण केली होती.

भाजप नेते आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचा निकटवर्तीय असलेल्या तरुणाला झालेल्या या मारहाणीनंतर पुणे पोलिस अॅक्शन मोडमध्ये आले होते. गजानन मारणे आणि टोळीवर पोलिसांकडून मकोका लावण्यात आला. त्यानंतर गजा मारणेला आज ३ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली होती. मारणे याला आज पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले असता त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.

कोथरुड परिसरात १९ फेब्रुवारी रोजी देवेंद्र जोग या तरुणाला मारहाण केल्याप्रकरणी गजानन मारणे याला टोळी प्रमुख म्हणून पोलिसांनी अटक केली होती. आज दुपारी २ वाजता गजानन मारणे आणि टोळीला न्यायालयात हजर केले गेले. फिर्यादी देवेंद्र जोग यांनी स्वतः कोर्टात हजर राहून कोणीही चिथावनी दिली नसल्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

गजा मारणेला पोलिसांनी मोक्काच्या गुन्ह्यात सोमवारी रात्री उशिरा अटक केली होती आणि त्यानंतर कोणत्याही प्रकारची बडदास्त न ठेवता थेट मांडी घालून त्याला जमिनीवर बसवले होते. तसंच ओम तीर्थराम धर्मजिज्ञासू (३५), किरण कोंडिबा पडवळ (३१), अमोल विनायक तापकीर (३५, तिघेही रा. शास्त्रीनगर, कोथरूड) यांना अटक केली होती. आरोपींपैकी श्रीकांत ऊर्फ बाब्या संभाजी पवार हा गजा मारणे याचा भाचा असून, तो अद्याप फरार आहे. तर रुपेश मारणे आणि गजा मारणे या दोघांनादेखील पोलिसांनी या गुन्ह्यात आरोपी केले आहे. गजा आणि रूपेश याला याबाबत चाहूल लागताच दोघे फरार झाले होते. कोथरूड पोलिस आणि गुन्हे शाखेची पथके दोघांचा शोध घेत होती. मात्र ते आढळून येत नव्हते. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दोघांना जेरबंद करण्यास पथकांना सांगितले होते. त्यासाठी पोलिसांनी गजासह त्याच्या साथीदारांच्या वास्तव्याच्या ७४ ठिकाणी झाडाझडती घेतली.

# शहरात जीबीएसचा उद्रेक ओसरला

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**




**पुणे :** पुण्यात ९ जानेवारीपासून गुइलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) चा मोठा उद्रेक झाला होता. या कालावधीत, पुणे परिसरात या रोगाचे रुग्ण वाढत गेले होते. मात्र, सध्या ही परिस्थिती नियंत्रणात आली असून, गेल्या दोन दिवसांपासून पुण्यात जीबीएसचे एकही नवे रुग्ण आढळलेले नाहीत.जीबीएसचा उद्रेक ओसरला आहे आणि या बाबतीत नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

जीबीएसच्या रुग्णसंख्येत वाढ झाल्यामुळे आरोग्य विभागाची चिंता वाढली होती. एकूण २२२ रुग्णांच्या नोंदी झाल्या, ज्यात ३८ रुग्ण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. या रुग्णांपैकी २९ जण अतिदक्षता विभागात होते, तर १२ रुग्ण व्हेंटिलेटरवर होते. बरे झालेल्या रुग्णांची संख्या १७३ आहे. ही परिस्थिती पाहता, यावर्षी ११ रुग्णांचा मृत्यू झाला.

तथापि, गेल्या दोन दिवसांत पुण्यात जीबीएसचा उद्रेक थांबला आहे आणि अधिक रुग्ण आढळले नाहीत. आरोग्य विभागाने या प्रकरणी सतर्कता ठेवली असून, विविध उपाययोजना करून या रोगाचा फैलाव रोखला आहे. स्थानिक रुग्णालयांनी अत्यावश्यक सुविधांचा विस्तार केला होता आणि सर्व रुग्णांना उपचार मिळवून दिले. जीबीएसचा प्रादुर्भाव थांबला असला तरी पुणे शहरातील नागरिकांमध्ये दिलासा आहे. मात्र, आरोग्य विभाग अद्याप सतर्क असून, यापुढे अशी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून कडक उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

# नदीपात्रातील अनधिकृत होर्डिंग जमीनदोस्त

## महापालिका प्रशासनाची धडक कारवाई, होर्डिंग मालकास कडक समज

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** टिळक चौकातील संभाजी पोलिस चौकीच्या पाठीमागे उभारण्यात येत असलेल्या वादग्रस्त होर्डिंगला सांगाडा महापालिकेने मंगळवारी सकाळी पुन्हा पाडला. यासंदर्भात पत्रकारांनी सातत्याने पाठपुरावा करत प्रशासनाला कारवाई करण्यास भाग पाडले.

महापालिकेच्या कसबा विश्रामबाग क्षेत्रीय कार्यालयाच्या तत्कालीन अधिकाऱ्यांनी चुकीच्या पद्धतीने दीड वर्षापूर्वी परवानग्या दिल्याने टिळक चौकातील संभाजी पोलिस चौकीच्या मागच्या बाजूला तीन होर्डिंग एकत्र करून एकच भले



मोठे होर्डिंग उभारले होते. यावर प्रसार माध्यमांनी प्रकाश टाकल्यानंतर तत्कालीन महापालिका आयुक्तांनी क्षेत्रीय कार्यालयातील तीन कर्मचाऱ्यांना निलंबित केले होते. त्यानंतर, होर्डिंग व्यावसायिकाने सलग होर्डिंग वेगवेगळे करून तीन होर्डिंग केले होते. कारवाई होण्याची शक्यता लक्षात घेऊन होर्डिंग मालकाने कारवाईस स्थगिती मिळविण्यासाठी महापालिका न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, न्यायालयाने कारवाईस स्थगिती देण्यास नकार दिल्यानंतर महापालिकेने फेब्रुवारी २०२४ मध्ये हे होर्डिंग पाडून टाकले होते.

या घटनेस एक वर्षाचा कालावधी गेल्यानंतर, त्याच होर्डिंग मालकाकडून आता पुन्हा याच ठिकाणी होर्डिंग उभारणी करण्याचे काम सुरू आहे. महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी शुक्रवारी परवानगीसंदर्भात चौकशी करण्यासाठी गेल्यानंतर त्यांना पोलिसांच्या समोर दमदाटी करून हुसकावून लावण्यात आल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला.

# सामाजिक काम करणे हे समाजाचे दायित्व : डॉ. कृष्णगोपालजी




■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** सर्व काही सरकार करेल ही पाश्चात्य आणि चुकीची धारणा आहे. सुरक्षा, न्याय अशा काही व्यवस्था आणि छोटी, मोठी कामे सरकार निश्चितपणे करेल. परंतु, समाजासाठी आवश्यक प्रत्येक काम करणे हे समाजाचेच दायित्व आहे. हा विश्वास समाजात पुनर्स्थापित करूया. यासाठीच 'जनकल्याण समिती'सारख्या संस्थांचे कार्य अधिक गतीने पुढे जाणे आवश्यक आहे. त्यातूनच समाज प्रगती करेल, असा विश्वास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सह सरकार्यवाह डॉ. कृष्णगोपालजी यांनी शनिवारी व्यक्त केला. 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती'तर्फे आयोजित 'पूजनीय श्रीगुरुजी पुरस्कार' प्रदान समारंभात डॉ. कृष्णगोपालजी बोलत होते. राजस्थानमधील कोटा जिल्ह्यातील 'गोयल ग्रामीण विकास संस्थान' आणि भारतीय हॉकी संघाचे मुख्य प्रशिक्षक पी. आर. श्रीजेश यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. श्री संकेश्वर पीठाचे श्री स्वामी शंकराचार्य कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शाल, श्रीफल, सन्मानचिन्ह, मानपत्र आणि एक लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. संघाचे पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर यांचीही व्यासपीठावर उपस्थिती होती.

संघाचे कार्यकर्ता निर्माणाचे कार्य प्रारंभीची अनेक वर्षे समाजाच्या लक्षातच आले नाही. संघ युवकांची शक्ती वाया घालवत आहे, अशीही टीका त्या काळात झाली. संघ स्वयंसेवकांनी हजारो सेवाकार्ये सुरू केली. असे डॉ. कृष्णगोपालजी यांनी सांगितले. 'जनकल्याण समिती'चे अध्यक्ष डॉ. अजित मराठे यांनी प्रास्ताविकामध्ये समितीच्या सेवा प्रकल्पांची माहिती दिली. समितीचे सह कोषाध्यक्ष चंदन कटारिया यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. 'सेवा भारती' संस्थेचे सचिव प्रदीप सबनीस यांनी आभार प्रदर्शन आणि डॉ. प्रांजली देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले.

भक्तीभावाचे नाव आध्यात्म आहे आणि संवेदना, करुणा, हे आध्यात्माचे मूळ आहे. नुकताच प्रयागराज येथे झालेला महाकुंभ हेही आध्यात्मभावाचेच प्रगटीकरण आहे. करुणा, प्रेम, समर्पण हा भाव कुंभामध्ये दिसला. कुंभ हा ऐक्य भावाचे प्रतीक आहे.

**— डॉ. कृष्णगोपालजी,** सह सरकार्यवाह

## अधिकाऱ्याच्या परवानगीविना फायली अडकल्या लालफितीत

**पुणे :** एसीबीने कारवाई केल्यानंतर अभियोगपूर्व मंजुरी व पुनर्विलोकनासाठी शासन व सक्षम अधिकाऱ्याकडे न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यासाठी संबंधित विभागाची परवानगी घेण्याची आवश्यकता असते.मात्र, शासन दरबारी व सक्षम अधिकाऱ्याच्या परवानगीविना 402 फायली लालफितीत अडकल्या आहेत.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) कारवाई केल्यानंतर परवानगीसाठी संबंधित विभागाकडे फायली पाठवूनही त्यातील 402 फायलींना अद्यापही परवानगी न मिळाल्याने त्या लालफितीत अडकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.तर १३ कोटी ६५ लाखांच्या अपसंपदेच्या १३ फायलींना परवानगी मिळेना, अशी स्थिती आहे. त्यामुळे परवानगीला एवढी दिरंगाई का, असा सवालही या निमित्ताने उपस्थित होऊ लागला आहे. राज्यात २६ फेब्रुवारी २०२५ अखेर लाचेची ११७ प्रकरणे दाखल झाली आहेत. त्यात १७१ आरोपींना अटक केली आहे. पुण्यात दोन महिन्यांत सर्वाधिक२४ गुन्हे दाखल असून, त्यामध्ये 37 जणांवर गुन्हा दाखल केला आहे.ज्ञात उत्पन्नापेक्षा १३ जणांच्या फायली लालफितीत अडकल्याचे एसीबीच्या अहवालावरून समोर आले आहे. यामध्ये तब्बल १३ कोटी ६५ लाख ८७ रुपयांची अपसंपदा जप्तीची ही प्रकरणे प्रकरणे प्रलंबित आहेत. यामध्ये नगर विकास विभागातील सहा फायली, ग्राम विकास, पोलिस, परिवहन, कृषी, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम विभाग, आदिवासी विभाग अशी प्रत्येकी एक अशी एकूण १३ प्रकरणे प्रलंबित आहेत.



## भारतीय विद्याभवन सुरू करणार मराठी माध्यमाची शाळा !

**पुणे :** मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय विद्या भवन या नामवंत शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थेने पुण्यातील सेनापती बापट रस्त्यावरील केंद्रात येत्या जून २०२५ पासून अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त,नवीन शैक्षणिक धोरणानुसार आदर्श स्वरूपाची मराठी माध्यमाची पूर्व प्राथमिक शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. पुणे केंद्राचे संचालक व मानद सचिव प्रा.नंदकुमार काकिर्डे यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली. पूर्व प्राथमिक ची मराठी शाळा खेळ गट म्हणजे नर्सरी व बालवाडी छोटा गट म्हणजे ज्युनिअर केजी अशी सुरू केली जात आहे.

येत्या जून पासून या पूर्व प्राथमिक शाळेचे खेळ गट (नर्सरी) व बालवाडी (ज्युनिअर केजी) हे वर्ग दुपारच्या सत्रात सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या जागेची उपलब्धता लक्षात घेऊन प्रारंभी केवळ एक वर्ग सुरू करणार असून त्यामध्ये कमाल तीस पटसंख्या राहील असे ठरवण्यात आले आहे. हे विद्यार्थी दोन वर्षानंतर पहिली इयत्तेमध्ये जातील. त्यावेळी सक्तीच्या मोफत कायद्यातील तरतुदीनुसार (आरटीई ) प्रवेशांसाठी आवश्यक जागांवरील प्रवेश नियमानुसार केले जातील.

## पीडितेच्या न्यायासाठी प्रकरण जलदगती न्यायालयात चालवा



**पुणे :** मुलीचे परप्रांतीय व्यक्तीने फूस लावून अपहरण करून अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणाची विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी तातडीने दखल घेत पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांना कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत.

ही घटना २१ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता घडली. पीडित मुलगी आपल्या राहत्या घरी असताना आरोपीने तिला फूस लावून पळवून नेले आणि तिच्यावर अत्याचार केला. या प्रकरणी खेड पोलीस ठाण्यात एफआयआर क्रमांक ००९५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, आरोपी मागील आठ वर्षांपासून मुलीच्या घरीच कामाला होता आणि त्याने याच विश्वासाचा गैरफायदा घेत हा घृणास्पद कृत्य केल्याचे निष्पन्न झाले आहे.




# पुणेकरांनो पाणी जरा जपूनच.!

● आतापर्यंत मुबलक पाणी वापर करत असलेल्या पुणेकरांच्या पाणी वापरावर ' वेसण' घालण्याचा निर्णय महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी आज घेतला; या पाणीवापरावर निर्बंध यावेत यासाठी पाण्याचे मीटर सक्तीचे करण्याचे स्पष्ट संकेत आयुक्तांनी मंगळवारी अर्थसंकल्पाच्या माध्यमातून दिले आहेत. मात्र; हा नियम पाळतील ते पुणेकर कसले ? हे आतापर्यंतच्या अनेक नियमावरुन अधोरेखित झाले आहे. त्याशिवाय आयुक्तांच्या या निर्णयात राजकीय हस्तक्षेप आणि आंदोलनाच्या माध्यमातून आडकाठी येणार हे त्रिवार सत्य आहे, त्यामुळे आयुक्तांचा हा निर्णय कितीकाळ टिकतो हे पाहाणे औत्सुक्याचे ठरणार आहे.






आगामी वर्षात मीटर प्रमाणे पाणी वापराचे बील द्यावे लागणार

### महापालिका आगामी वर्षात

- इमारतींच्या बांधकामासाठी ४९० कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली आहे
- रस्त्यांसाठी १ हजार १२६ कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली आहे
- नदी सुधारणा योजनेसाठी ३९६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे
- आरोग्यासाठी ५६९ कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली आहे
- पाणीपुरवठ्यासाठी १ हजार ६६५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे
- घनकचरा व्यवस्थापनासाठी १४२ कोटींची तरतूद केली आहे
- महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या ३४ गावांसाठी ६२३ कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली आहे
- याशिवाय महापालिका
- स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका उभारणार आहे
- मंहंमदवाडी येथे नवीन क्रीडा संकुल उभारणार आहे
- नेहरु स्टेडीयमची सुधारणा करणार
- साथ रोगांसाठी प्रयोगशाळा उभारणार
- आपत्कालीन कक्ष उभारणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणेकरांना आगामी वर्षात मीटर प्रमाणे पाणी वापराचे बील द्यावे लागणार आहे. महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी ही माहिती दिली आहे. पुणे महापालिकेनं समान पाणीपुरवठ्याची योजना राबवली आहे. त्याचे काम जवळपास पुर्ण होत आले आहे.

महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी २०२५ - २०२६ या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प सादर केला आहे . पुणे महापालिकेने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ₹१२,६१८ कोटींचा अर्थसंकल्प सादर केला असून, यामध्ये कोणतीही करवाढ प्रस्तावित नाही. पाणीमीटर प्रणाली, रस्ते सुधारणा आणि आरोग्य सेवेसाठी मोठ्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. अर्थसंकल्पात कोणतीही करवाढ सुचवण्यात आलेली नाही.त्यामुळे आगामी वर्षात पुणेकरांना पाण्याचं बील मीटर प्रमाणे द्यावे लागणार आहे पुराचा फटका बसलेल्या सिंहगड रस्त्यावरील एकता नगरी मधील घरांचे पुनर्वसन महापालिका करणार आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आली




आहे.

गेल्यावर्षी ११६०१ कोटीचा अर्थसंकल्प होता, त्यापैकी आत्तापर्यंत ६५०० कोटी जमा (५५ टक्के ), ८४०० कोटी जमा होतील. मागच्या अर्थसंकल्पाच्या ७० टक्के खर्च केला. प्रशासक काळातील हा तिसरा अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प लोकांना उपयोगी पडावे यासाठी स्वच्छता, आरोग्य, पायाभूत सुविधांवर भर दिला असल्याचे आयुक्तांनी सांगितले

बजेट मध्ये आपल्या प्रभागातील विकासकामे अनेक माजी नगरसेवकांनी सुचवली होती. आमदारांनी देखील कामे सुचवली होती. यात आयुक्त फक्त सत्ताधारी नेत्यांचेच प्रस्ताव घेत असल्यास महाविकास आघाडीच्या नेत्यांनी नाराजी व्यक्त करत आंदोलनही केलं होतं त्यानंतर त्यांनीही काही विकास कामावर सुचवली होती सर्व पक्षातील नेत्यांनी सुचवलेल्या विकास कामांची ही कींमत जात होती ३० हजार कोटींवर. महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनीच ही माहिती दिली महापालिकेचे बजेट बारा हजार कोटींचा असताना सर्वपक्षीय नेत्यांनी तीस हजार कोटींची विकास कामे सुचवली होती.

## आयुक्तांनी केला गोप्यस्फोट

### लोकप्रतिनिधींची बजेटसाठी ३० हजार कोटींची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सर्वच आजी माजी लोकप्रतिनिधींनी माझ्याकडे बजेटसाठी ३० हजार कोटींची मागणी केली होती. मात्र, प्रशासक म्हणून संबंधित लोकप्रतिनिधींचे पत्रानुसार त्यांच्या मागण्या प्रशासनाच्या दृष्टीने आवश्यक आहे का याची पडताळणी करून न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच अंदाजपत्रकात नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून अंदाजपत्रक केल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ.राजेंद्र भोसले यांनी दिली.

पुणे महापालिकेचे आर्थिक वर्ष २०२५-२६ चे अंदाजपत्रक महापालिका आयुक्त डॉ.राजेंद्र भोसले आज स्थायी समितीला अंदाजपत्रक सादर केले. यंदाचा अंदाजपत्रकात मंत्री चंद्रकांत पाटील यांनीही भाजपच्या माजी नगरसेवकांना त्यांना आवश्यक निधी मिळेल असे आश्वासन दिल्याने यंदाचे अंदाजपत्रक वादाच्या भोवऱ्यात सापडले होते. अंदाजपत्रकात सत्ताधाऱ्यांकडून याद्या दिल्याची चर्चा होती.

आजी माजी लोकप्रतिनिधींकडून बजेटच्या मागणीवर महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले म्हणाले, सर्वच आजी माजी लोकप्रतिनिधींनी बजेटमध्ये ३० हजार कोटींची मागणी



केली होती. लोकप्रतिनिधींनी विकासकामांसाठी निधीची मागणी करणे हे त्यांचे काम आहे. मागणी करण्यात काही हरकत नाही. मात्र, प्रशासनाच्यादृष्टीने ती मागणी योग्य असल्यास त्याचा विचार केला जातो. माझ्या दृष्टीने काम होणे महत्वाचे आहे. दहा-दहा वर्षापासून सुरू असलेल्या कामांपेक्षा वर्षभरात पुर्ण होणाऱ्या कामांना प्राधान्य दिले आहे.

# महामेट्रोच्या प्रवाशांना रिक्षाचालकही देणार ‘फिडर’ सेवा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महामेट्रोच्या माध्यमातून प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर आणि जलद व्हावा यासाठी ' पीएमपीएल' च्या वतीने महामेट्रोच्या बहुतांशी स्थानकांवर फीडर सेवा देण्यात येत आहे, त्यामुळे प्रवाशांना त्याचा फायदा होत आहे. त्याच धर्तीवर रिक्षांच्या माध्यमातून अशी फिडर सेवा देण्याचा प्रशासन गांभीर्याने विचार करत आहे; त्यासाठी महामेट्रो आणि रिक्षा संघटनांच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत यासंदर्भात निर्णय झाला असून त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी



झाल्यास हजारो प्रवाशांना त्याचा लाभ होणार आहे.

पुणे, पिंपरी चिंचवड शहरांमधील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत मेट्रो सेवा सुरू करण्यात आली. मात्र मेट्रोच्या अनेक मार्गांवर मेट्रोच्या मार्गिकांचे विस्तारीकरण प्रकल्प प्रलंबित असून ज्या ठिकाणी मेट्रो मार्गच नाहीत, अशा ठिकाणच्या प्रवाशांना मेट्रोचा सुलभ प्रवास करता यावा म्हणून रिक्षाचालकांच्या मदतीने प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी महामेट्रो आणि रिक्षाचालक संघनटांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीत रिक्षाचालकांना पूरक सेवा (फीडर) देण्याबाबत सूचना करण्यात आल्या आहेत.

मेट्रोचे सहज वापर आणि वाहतूक कोंडी सोडविण्याच्या दृष्टीने महामेट्रोने रिक्षाचालक संघटनांच्या मदतीने कार्यवाही करण्याबाबत पुढाकार घेतला आहे. घरापासून मेट्रो स्थानकापर्यंत आणि स्थानकापासून घरापंर्यंत अशी सुलभ सेवा देण्यासाठी महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशनकडून (महामेट्रो) रिक्षाचालकांसोबत लवकरच 'सामाईक कृती आराखडा' तयार करण्यात येणार आहे.

सध्या प्रवाशाना मेट्रो स्थानकापर्यंत पोहचण्यासाठी वैयक्तीक वाहनांवर अवलंबून रहावे लागत आहे. अनेक मेट्रो स्थानकांच्या ठिकाणी वाहनतळाची सुविधा नसल्याने प्रवाशांना अडचणी येत आहेत. त्यामुळे घरातून बाहेर पडल्यानंतर नागरिकांना मेट्रो स्थानकांना सुविधा निर्माण होण्यासाठी रिक्षाचालकांनी घरापासून स्थानकापर्यंत सेवा देण्याबाबत सामाईक सेवा देण्याबाबत सहमती दर्शविण्यात आली आहे. याबाबत महामेट्रो आणि रिक्षाचालक संघटनांसोबत सामाईक कृती आराखडा तयार करण्यात येणार आहे. या आराखड्यात स्थानकांची निश्चिती, वेळापत्रक आणि प्रवासी संख्या, प्रवाशी दर निश्चिती आणि सुविधांचा समावेश असणार आहे, अशी माहिती मेट्रोच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.



“ घरापासून स्थानकापर्यंत पोहचण्यासाठी रिक्षाचालकांनी जवळच्या अंतरापर्यंत मीटरदराद्वारे सुविधा दिल्यास, फेऱ्या वाढविल्यास मेट्रोला याचा फायदा होईल. रिक्षाचालकांना आर्थिक सहाय्य मिळेल. रस्त्यांवर खासगी वाहनांचे प्रमाण कमी होऊन वाहतूक कोंडीतून काहीशी सुटका होईल. प्रवाशांना सुलभ प्रवास करता येईल.

**—श्रावण हर्डीकर,**
व्यवस्थापकीय संचालक, महामेट्रो, पुणे



“ मेट्रो प्रवाशांना सामाईक सेवा देण्यासाठी रिक्षाचालक आणि संघटनांकडून नक्कीच जागृकता निर्माण करण्यात येईल. मीटर आधारीत सेवा देण्यासाठी आणि प्रवाशांना सेवा रिक्षासंघटनांकडून नेहमीच सहकार्य असेल. त्यासाठी महामेट्रो प्रशासन जो निर्णय घेइल तो निर्णय रिक्षा संघटनांना मान्य असणार आहे.

**— बाबा शिंदे,**
-अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माल व प्रवासी वाहतूक संघटना



## 'आयसीएआय' पुणे शाखेच्या अध्यक्षपदी सीए मिणियार

**पुणे :** दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय) पुणे शाखेच्या अध्यक्षपदी सीए सचिन मिणियार यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी सीए प्रणव आपटे, सचिवपदी सीए निलेश येवलेकर, खजिनदारपदी सीए नेहा फडके यांची, तर 'विकासा' या विद्यार्थी शाखेच्या अध्यक्षपदी सीए प्रज्ञा बंब यांची निवड झाली आहे. २०२५-२०२६ या वर्षासाठी नवीन कार्यकारी मंडळाची निवड जाहीर करण्यात आली. नवनिर्वाचित अध्यक्ष सीए सचिन मिणियार यांनी मावळत्या अध्यक्षा सीए अमृता कुलकर्णी यांच्याकडून पदभार स्वीकारला. कार्यकारिणी सदस्य म्हणून सीए हृषीकेश बडवे, सीए सारिका दिंडोकर, सीए प्रितेश मुनोत, सीए नंदकुमार कदम काम पाहतील.

यावेळी 'आयसीएआय'च्या केंद्रीय समितीचे सदस्य सीए चंद्रशेखर चितळे, विभागीय समिती सदस्य सीए राजेश अग्रवाल, सीए रेखा धामणकर व सीए अभिषक धामणे, माजी अध्यक्ष सीए काशिनाथ पाठारे, सीए मोशमी शहा, सीए अजिंक्य रणदिवे आदी उपस्थित होते. आयसीएआय पुणे शाखेच्या वतीने तसेच वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी नवनिर्वाचित कार्यकारिणीचे अभिनंदन केले.



## कोब्बी शोषाणी यांना 'सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार'

**पुणे :** इस्राईल आणि भारत यांच्यातील परस्पर संबंध अधिक सक्षम होण्यात, परराष्ट्र क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल इस्राईलचे भारतातील कॉन्सुल जनरल कोब्बी शोषानी यांना सुर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या वतीने 'सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार २०२५' प्रदान करण्यात आला. पुण्यातील जेडब्ल्यू मेरियट हॉटेलमध्ये आयोजित एका शानदार सोहळ्यात ज्येष्ठ अभिनेते रझा मुराद व 'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या हस्ते शोषानी यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेच्या उपाध्यक्ष व सचिव सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, कार्यकारी विकास अधिकारी सिद्धांत चोरडिया, मुख्य कार्यपालन अधिकारी अक्षित कुशल, महाव्यवस्थापक रोहित संचेती, वर्ल्ड ट्रेड सेंटरचे व्यवस्थापकीय संचालक सागर चोरडिया आदी उपस्थित होते.

कोब्बी शोषानी म्हणाले, "काटेकोर शिस्त आणि समर्पित वृत्ती ही इस्राईलची ओळख असून, त्या देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मला मिळतेय, याचा मला अभिमान वाटतो. मला भारताविषयी अतीव प्रेम आहे. वर्षागणिक या सुंदर अशा देशाची संस्कृती आणि येथील लोकांविषयी माझ्या मनात आदर, प्रेम व आस्था वाढत आहे. विद्यार्थ्यांना प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी सूर्यदत्त मोलाचे योगदान देत आहे.

## संतोष देशमुख हत्येप्रकरणी मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा

**पुणे :** बीड येथील मास्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या अमानुष हत्येप्रकरणी राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांनी आज राजीनामा दिला असला तरी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुरोगामी महाराष्ट्रात अत्यंत अमानवी हत्या करण्यात आली आहे यास गृहखाते जबाबदार आहे त्यामुळे या खात्याचा कारभार सांभाळणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी पुणे शहर आम आदमी पक्षाचे शहराध्यक्ष धनंजय बेनकर यांनी केली आहे.

गेल्या तीन महिन्यांपासून राज्यासह देशभरात सरपंच संतोष देशमुख यांच्या अमानुष हत्येचे पडसाद उमटत आहेत त्यामुळे सर्व समाजात संतापाची तीव्र लाट उसळली आहे.

असे सांगून आम आदमी पक्षाचे शहराध्यक्ष धनंजय बेनकर म्हणाले, यापूर्वी महाराष्ट्रात अशा घटना घडल्या नाहीत.संतोष देशमुख यांना अमानुषपणे लोखंडी रॉडने मारहाण करून त्यांच्या मृतदेहाची विटंबना करताना आनंदोत्सव साजरा करतानाचे छायाचित्र व्हिडिओ काढून ते व्हायरल करून समाजात दहशत निर्माण करणाऱ्या हल्लेखोरांना व त्यांच्या सुत्रधारांना तसेच मदत करणाऱ्यांना तत्काळ फाशी देण्यात यावी.

## ताम्हिणी घाटात ST बसचा भीषण अपघात; २ ठार ३ जखमी




**पुणे :** रायगड जिल्ह्यातील ताम्हिणी घाटात कार व एसटी बसचा भीषण अपघात झाला असून या अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. अपघाताची तीव्रता भीषण होती. या अपघातात कारचा चेंदामेंदा झाल्याचे वृत्त आहे. दुर्दैवाने अपघातात दोघांचा मृत्यू झाला असून, तीन जण जखमी झाले. पुण्याच्या दिशेकडे जात असलेली खेड-चिंचवड ही एसटी बस आणि पुण्याच्या दिशेकडून माणगाव दिशेकडे येत असलेली स्विफ्ट कार यांच्यात हा अपघात झाला.

# पुण्यात पाण्याची अघोषित 'पाणीबाणी'..!

## संपूर्ण पुण्यात कृत्रिम पाणीटंचाई; वडगांवशेरीकरांना 'काळया पाण्याची शिक्षा'




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**पुणे :** पुणे शहराला पाणीपुरवठा होत असलेल्या संपूर्ण धरण क्षेत्रात पुरेसा पाणीसाठा शिल्लक आहे, हा पाणीसाठा किमान पावसाळा सुरु होइपर्यंत पुरणार आहे. विशेष म्हणजे खुद्द जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीच तूर्त पुण्यासाठी पाणीकपात करणार नाही असे जाहीर आश्वासन दिले आहे. मात्र; हे वास्तव असतानाही महापालिकेच्या बड्या अधिकार्यांनी पुण्याच्या पाण्यात कृत्रिम पाणीटंचाई केली असून शहराच्या संपूर्ण भागात अनियमित आणि अपुरा पाणीपुरवठा होत आहे.

धक्कादायक बाब म्हणजे वडगावशेरी आणि खराडी यासह बहुतांशी भागातील नागरिकांना प्रशासनाने चक्क ' काळया पाण्याची' शिक्षा ठोठावली असून या भागात दूषित पाणीपुरवठा होत आहे, त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. प्रशासनाने नागरिकांवर लादलेल्या या अघोषित पाणीटंचाईमुळे पाण्याची अक्षरश: 'आणीबाणी' निर्माण झाली आहे, त्यामुळे नागरिक चांगलेच त्रस्त झाले आहेत.

गेल्या वर्षी पुण्यासह राज्याच्या सर्वच भागात समाधानकारक पाऊस झाला होता. त्याशिवाय पुण्याला पाणीपुरवठा होत असलेल्या खडकवासला, टेमघर, वरसगाव आणि पानशेत या धरणसाखळीतही अपेक्षेपेक्षाही अधिक पाऊस झाला होता. त्यामुळे या धरणसाखळीसह शहराच्या पूर्व भागाला पाणीपुरवठा होत असलेल्या भामा आसखेड ही धरणे संपूर्ण हाउसफुल्ल झाली होती, परिणामी धरणातून तब्बल सोळा वेळा पाणी सोडण्याची वेळ जलसंपदा विभागावर आली होती.

त्यामुळे किमान यावर्षी तरी पुण्यासाठी पाणीकपात होणार नाही, असे स्पष्ट संकेत मिळत होते.विशेष म्हणजे दोनच दिवसांपूर्वी झालेल्या कालवा समितीच्या बैठकीत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पुण्यात पाणीकपात करणार नसल्याची ग्वाही दिली होती, तरीही गेल्या महिनाभराच्या कालावधीत महापालिका प्रशासनाने संपूर्ण पुण्यामध्ये कृत्रिम पाणीटंचाई निर्माण केली आहे, त्यासाठी प्रशासनाच्या वतीने विविध ' आयडिया' लढविल्या जात आहेत.

संपूर्ण पुण्यात ही परिस्थिती असतानाच गेल्या महिना ते दीड महिन्यापासून शहराच्या पूर्व भागातील येरवडा, खराडी, चंदननगर आणि वडगावशेरीला दूषित पाणीपुरवठा होत आहे. शहरावर ' जीबीएस' चे संकट घोंगावत असतानाच दूषित पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यासंदर्भात सर्वच राजकीय पक्षांसह सामाजिक संघटनांनी महापालिका प्रशासनाकडे दाद मागितली असून आंदोलनाचाही इशारा दिला आहे, तरीही प्रशासनाच्या वतीने यासंदर्भात अद्याप कोणतीही ठोस भूमिका घेतलेली नाही.



"अनियमित आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे यंत्रणेत काही बिघाड आहे का याची तपासणी करण्याच्या सूचना सर्व विभागातील कार्यकारी अभियंत्यांना देण्यात आल्या आहेत, त्यानुसार लवकरात लवकर हा पाणीपुरवठा सुरळीत करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न असणार आहे.

**-नंदकिशोर जगताप,** प्रमुख पाणीपुरवठा विभाग, पुणे मनपा



"दूषित आणि अनियमित पाणीपुरवठा करणे हे महापालिका प्रशासनाचे पाप आहे; या दूषित पाण्यामुळेच वडगांवशेरी भागात नागरिकांचे आजारी पडण्याचे प्रमाण वाढले आहे. या परिस्थितीला महापालिका प्रशासनच जबाबदार आहे, त्यामुळे प्रशासनाने येत्या दोन दिवसात या परिस्थितीत बदल न केल्यास नाईलाजाने तीव्र आंदोलन करावे लागेल.

**-उषाताई कळमकर,** माजी नगरसेविका, वडगांवशेरी

### अशी होतेय पाण्यात कपात...!

- दुरुस्तीच्या नावाखाली राहतोय पाणीपुरवठा बंद
- दुरुस्ती झाल्यानंतर अनियमित पाणीपुरवठा
- नियमितपेक्षा पाणीपुरवठ्यात एक ते दीड तासांनी कपात
- सर्वच भागात कमी दाबाने पाणीपुरवठा
- व्हॉल्वमनला पाणी कपातीच्या सक्तीच्या सूचना
- राजकीय दबाव झुगारण्याचे आदेश
- टँकरचालक घेताहेत मनमानी पध्दतीने दर



# वीजग्राहक सुरक्षेसाठी ३१०० लाईनमन

## ग्राहकांची संख्या ३१ लाख, पण लाईनमन कमीच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वीजपुरवठा खंडित झाला की तो पूर्ववत होईपर्यंतचा प्रतीक्षा काळ हा वीजग्राहकांना नकोसा असतो. तो सुरळीत करण्याचे काम लाईनमन करत असतात. परंतु त्यांची संख्या लोकसंख्येच्या तुलनेत अपुरी आहे. पुणे शहर आणि परिमंडलात पुरुष आणि महिला असे मिळून सुमारे तीन हजार १०० लाइनमन काम करीत असून, त्यांच्यावर परिमंडलातील ३१ लाख वीजग्राहकांची सुरक्षा अवलंबून आहे. वीजपुरवठा खंडित झाला की तक्रारकर्ते वीजग्राहक कधी येईल, याची प्रतीक्षा करतात. या प्रतीक्षाकाळात महावितरणचे अभियंते आणि लाइनमन विविध अडथळ्यांना तोंड देत रात्री-बेरात्री कामे करीत वीजपुरवठा सुरळीत होण्यासाठी प्रयत्न करीत असतात. त्यामुळेच ग्राहकांना वीजपुरवठा सुरळीत होत असतो.

विजेच्या निर्मितीनंतर पारेषण, वितरण अशा टप्प्यांमध्ये ग्राहकांच्या घरापर्यंत वीजपुरवठा केला जातो. दाटवस्तीच्या महानगरापासून ते अतिदुर्गम दऱ्याखोऱ्यातील सर्व प्रकारच्या वीजग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी महावितरणचे अभियंते व जनमित्रांना दक्ष राहावे लागते. वीज दिसत नाही.

वीजयंत्रणेत काम करण्याचा कितीही वर्षांचा अनुभव असला तरी विजेशी मैत्री होऊ शकत नाही. त्यामुळे एखाद्या क्षणी अनावधानाने झालेली चूकही जिवावर बेतू शकते. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर रात्री-बेरात्री अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत व धोकादायक आव्हाने पेलून अभियंता व जनमित्रांना वीजपुरवठा सुरळीत करण्याचे कर्तव्य बजवावे लागते.

वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी साधारणतः उन्हाळा ते पावसाळ्यातील ८ ते ९ महिन्यांचा कालावधी अतिशय आव्हानात्मक व खडतर असतो. उन्हाचा तडाखा, तापलेली वीजयंत्रणा, वाढलेली विजेची मागणी त्यानंतर वादळे, मान्सूनपूर्व धुव्वाधार पाऊस व त्यानंतरचा पावसाळी संततधार पाऊस, पूरस्थिती अशा नैसर्गिक प्रतिकूल परिस्थितीत वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणचे प्रकाशदूत सज्ज असतात.

# मागण्या मान्य करा अन्यथा आंदोलन



### आणखी मागण्या कोणत्या

- भविष्य निर्वाह निधीच्या खात्यातून उचल मिळावी
- नवीन शिस्त आणि कार्यपद्धती लागू करावी
- खात्यांतर्गत प्रथम बदली अर्जानुसार बदल्या कराव्यात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एमएसआरटीसी) कर्मचाऱ्यांची वेतवाढ, थकबाकी, महागाई भत्ता आदी मागण्यांची तातडीने दखल घेतली नाही, तर ५ मार्च रोजी राज्यातील सर्व बस स्थानके आणि आगारांच्या बाहेर निदर्शने करण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य परिवहन कामगार संघटनेकडून देण्यात आला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांना २०१८पासून महागाई भत्ता त्वरित देण्यात यावा, असे आदेश देण्यात आले आहेत. तसेच सन २०१६-२० कालावधीत एकतर्फी लागू केलेल्या वेतनवाढीत घरभाडे भत्त्याचा दर वाढवून द्यावा. या वेतनवाढीतील घरभाडे भत्त्याची रक्कमदेखील थकित आहे, अशा अनेक मागण्यांबाबत कामगार संघटनांकडून वारंवार बैठका घेऊन आश्वासने देण्यात आली आहेत. अद्याप याबाबत कुठलाच निर्णय घेतला जात नसून, संघटनेकडून राज्यभर आंदोलनाचा इशारा दिला आहे.

पाच मार्च रोजी पुणे जिल्ह्यातील सर्व आगारांच्या बाहेर मागण्यांसंदर्भात निदर्शने करण्यात येणार आहेत, असे पुणे संघटनेतील कर्मचाऱ्यांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

"एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांचे आर्थिक प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. विशेषत: कामगारांना ५० टक्के महागाई भत्ता लागू झाला असताना अद्याप अंमलबजावणी करण्यात येत नसल्याने पाच मार्च रोजी आगारांच्या प्रवेशद्वाराजवळ आंदोलन करण्यात येणार आहे. त्यानंतरही कार्यवाही झाली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

**-संदीप शिंदे,** अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परिवहन कामगार संघटना

# यंदा निम्म्या ग्रामपंचायतींवर महिलांची सत्ता येणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच निवडणूक नियमातील नव्या तरतुदीनुसार, सरपंचपदासाठी पन्नास टक्के आरक्षण महिलांसाठी ठेवणे बंधनकारक आहे. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार, जिल्ह्यात बिगर अनुसूचित क्षेत्रातील 108 ग्रामपंचायतींपैकी निम्म्या ग्रामपंचायतींवर महिलांची सत्ता येणार आहे. मार्चच्या पहिल्या आठवड्यापर्यंत मुदत संपणाऱ्या जिल्ह्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील 108 ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे फेरआरक्षण जाहीर केले आहे.



सरपंचपदाचे फेरआरक्षण होणाऱ्या एकूण 108 ग्रामपंचायतींपैकी अनुसूचित जातीसाठी 12 आरक्षित सरपंचपदे ठेवण्यात आली आहेत. यामध्ये 9 महिलांचा समावेश आहे. तर अनुसूचित जमातीसाठी आरक्षित सरपंचपदे एकूण 8 आहेत. यामध्ये पाच महिलांचा समोवश आहे, तर मागास प्रवर्गासाठी 29 आरक्षित सरपंचपदे आहेत. त्यातील 15 पदे महिलांसाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. खुल्या प्रवर्गात 59 ग्रामपंचायतीचा समावेश आहे.

यातील 30 ग्रामपंचायतीवर महिला सरपंच राहणार आहेत. पुणे जिल्ह्यातील तब्बल 1400 ग्रामपंचायतींचे 5 मार्च 2020 ते 4 मार्च 2025 या कालावधीमधील सरपंचपदाचे आरक्षण सर्व तहसील कार्यालयाकडून काढण्यात आलेले होते.

उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर, येथे दाखल रिटमध्ये न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार ग्रामविकास विभागाने नवीन अधिसूचना काढली आहे. यामध्ये प्रामुख्याने पुणे जिल्ह्यातील दि. 01 जानेवारी 2024 ते दि. 04 मार्च 2025 या कालावधीत मुदत संपणाऱ्या बिगर अनुसूचित क्षेत्रातील 108 ग्रामपंचायतीच्या सरपंचपदांचे फेरआरक्षण जाहीर करण्यात आले आहे.

## विद्यार्थ्यांकडून कामगाराच्या सुरक्षा जनजागृतीची शपथ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कामगार मंत्रालय व भारत सरकारच्या वतीने दरवर्षी 4 मार्च हा दिवस राष्ट्रीय सुरक्षा दिन म्हणून साजरा केला जातो. संकल्प प्रतिष्ठान संचलित संकल्प कॉलेज फॉर फायर सेफ्टीच्या वतीने आजच्या विद्यार्थ्यांना कामगाराच्या सुरक्षा जनजागृतीची शपथ देण्यात आली. महाविद्यालयाच्या वतीने विविध कंपन्या, कामगार संघटना यांच्यामध्ये सुरक्षा विषयक माहितीची जनजागृती करण्यात येणार आहे.

सन 1972 मध्ये पहिल्यांदा राष्ट्रीय सुरक्षा दिन साजरा करण्यात आला तेव्हापासून व्यावसायिक सुरक्षेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. आरोग्य जागृत जागरूकता एनएससी कामाच्या ठिकाणी सुरक्षितता वाढवण्याचा अपघात रोखण्यासाठी सुरक्षित आणि योग्य कामाच्या परिस्थितीला प्रोत्साहन देण्यासाठी या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत येत असल्याचे महाविद्यालयाचे संचालक निलेश गिरमे यांनी बोलताना सांगितले.

गेल्या वर्षीपासून या उपक्रमाचे आयोजन फायर सेफ्टी कॉलेजच्या वतीने करण्यात येत आहे हे या उपक्रमाचे दुसरे वर्ष असून गतवर्षी देखील कॉलेजच्या वतीने राष्ट्रीय सुरक्षा दिनाच्या निमित्ताने विविध सुरक्षा विषयक जनजागृती उपक्रमांचे आयोजन केले होते.




पुणे कामगार मंत्रालय व भारत सरकारच्या वतीने दरवर्षी 4 मार्च हा दिवस राष्ट्रीय सुरक्षा दिन म्हणून साजरा केला जातो. संकल्प प्रतिष्ठान संचलित संकल्प कॉलेज फॉर फायर सेफ्टीच्या वतीने आजच्या विद्यार्थ्यांना कामगाराच्या सुरक्षा जनजागृतीची शपथ देण्यात आली.

# कविता स्फुरणे हा कवीचा पुनर्जन्म : ज्येष्ठ कवयित्री प्रज्ञा महाजन



पुरस्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कविता म्हणजे शब्दांची गुंफण असली, तरी त्यातून कवीचे अंतरंग उलगडत असते. कविता कधीही आणि कुठेही उमलू शकते. तो कविता उमलण्याचा आणि कविता स्फुरण्याचा क्षण म्हणजे कवीचा पुनर्जन्म असतो, असे मत ज्येष्ठ कवयित्री प्रज्ञा महाजन यांनी व्यक्त केले.

साहित्यदीप प्रतिष्ठानतर्फे आयोजित माधुरी गयावळ स्मृती पुरस्कार कवयित्री सुनीता टिल्लू आणि कवयित्री ऋचा कर्वे यांना प्रदान करण्यात आला, त्यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून प्रज्ञा महाजन बोलत होत्या. स्वा. सावरकर अध्यासन केंद्रात आयोजित या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर साहित्यदीप साहित्यदीप प्रतिष्ठानच्या अध्यक्ष ज्योत्स्ना चांदगुडे, साहित्यदीप प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष धनंजय तडवळकर, साहित्यदीप प्रतिष्ठानचे संचालक सतीश गयावळ, कवयित्री सुनीता टिल्लू आणि कवयित्री ऋचा कर्वे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना ऋचा कर्वे म्हणाल्या की, आता सगळे संपते की काय अशा विविध प्रश्नांच्या गर्तेत अडकलेले असताना मला कवितेने हात दिला. मला लहानपणापासूनच वाचनाची आवड होती. त्यातून मी कविता लिहित गेले. माझी कविता मला घडवत गेली आणि कवितेने माझ्या व्यक्तिमत्वाला पैलू पाडले.

यावेळी बोलताना सुनीता टिल्लू म्हणाल्या की, मला कवितेचे आकर्षण सुरूवातीपासून होतेच. आयुष्याच्या वेगवेगळ्या वाटा-वळणांवर कवितेने माझा आणि मी कवितेचा हात कधीच सोडला नाही.

यावेळी सतिश गयावळ यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक साहित्यदीप प्रतिष्ठानच्या अध्यक्ष ज्योत्स्ना चांदगुडे यांनी केले. सूत्रसंचालन

"पुण्यातील सांस्कृतिक वातावरण हे फार वेगळ्या उंचीवरचे आहे. इथल्या साहित्य संस्थांमध्ये स्पर्धा नसून एकमेकांच्या हातात हात घालून साहित्य सेवा कशी करता येईल, यासाठी येथील साहित्यसंस्था प्रयत्नशील असतात.

**— प्रज्ञा महाजन,,**
ज्येष्ठ कवयित्री

# सामाजिक संदेशाचे स्नेहसंमेलन




भोसरी **संदेश** : मास्टर माईंड स्कूलचा दोन दिवसीय वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात साजरा झाला. स्नेहसंमेलनाचे प्रमुख आकर्षण कौटुंबिक नातेसंबंध, तसेच विविध ऐतिहासिक योद्धे , शेतकरी यांना आदरांजली हे ठरले. विविध सादरीकरणातून सामाजिक संदेश देण्यात आले.

## पिंपरी-चिंचवडसाठी मुळशीतील पाणी आरक्षणाची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** वाढती लोकसंख्या आणि भविष्यकाळात पाण्याची मागणी लक्षात घेता पिंपरी-चिंचवड शहरासाठी मुळशी धरणातून पाणी आरक्षणाला मंजुरी देण्याबाबत महायुती सरकारने सकारात्मक विचार करावा, अशी मागणी भाजपा नेते तथा आ. महेश लांडगे यांनी केली आहे. महाराष्ट्र विधानसभा अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची आमदार लांडगे यांनी मुंबईत भेट घेतली. यावेळी पिंपरी-चिंचवडचा पाणी पुरवठा आणि नवीन जलस्त्रोत निर्मिती याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना पत्र दिले आहे. शहरातील वाढते नागरीकरण आणि पाण्याची मागणी याचा विचार करता भविष्यात पाणी टंचाईचा प्रश्न गंभीर होणार आहे. त्यामुळे अतिरिक्त जलस्त्रोत निर्माण करण्याची नितांत आवश्यकता असून, मुळशी धरणातून पिंपरी-चिंचवडसाठी पाणी आरक्षीत करावे, असा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने राज्य शासनाला पाठवला आहे.



## तनुजा नाणेकर लोगो मेकिंग स्पर्धेत प्रथम मानकरी

**आकुर्डी :** पुणे महापालिकेच्या वतीने अमृतवर्ष वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या बोधचिन्ह स्पर्धेत पावणे दोन लाख रुपयाचे पहिल्या क्रमांकांचे बक्षीस मिळणाऱ्या तनुजा नाणेकर हिचा विशेष सत्कार शैक्षणिक संकुलाचे उपाध्यक्ष आ. सतेज पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. तनुजा नाणेकर हिला पावणे दोन लाखाचे बक्षीसाची रक्कम मिळाली .आकुर्डी येथील डी वाय पाटील आंतरराष्ट्रीय विद्यापीठातील उपयोजित कला विभागाच्या प्रथम वर्षात शिकत आहे .

## पारा वाढला ! चिंचवड @ ३८.२ अंश सेल्सिअस



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहरात मागील काही दिवसांपासून तापमानात सातत्याने वाढ होत आहे. मार्च महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात सोमवारी चिंचवडमध्ये पारा ३८.२ अंश सेल्सिअस इतका नोंदवला गेला. त्यामुळे दुपारी शहरातील रस्त्यांवर काही प्रमाणात शुकशुकाट दिसत होता. तापमानात वाढ झाल्याने थंड पेयांची मागणी वाढत आहे. वाढत्या तापमानामुळे विविध आजारांचे प्रमाणही वाढले आहे. तापमानात वाढ झाल्याने थंड पेयांच्या दुकानांमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. विविध फळांच्या ज्यूसला व उसाच्या रसाला नागरीकरांची सर्वाधिक पसंती मिळत आहे. थंड ताकाला मोठी मागणी आहे. ताकाच्या गाड्या चौकाचौकात उभ्या राहू लागल्या आहेत. उन्हाची लाही वाढत असल्याने टोप्या व गॉगल्सची मागणी वाढत आहे.

## आमदार महेश लांडगे यांचा सभागृहात संताप व्यक्त




**पिंपरी :** हिंदूस्थानवर क्रुरपणे अमानुष अत्याचार करणारा मुघल सम्राट औरंगजेबने माझ्या धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या समोर इस्लाम स्वीकारण्यासाठी भिक मागितली होती. त्या औरंग्याचे उदात्तीकरण काय करतो? महाराष्ट्रात धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या आमदार अबु आझमी सारख्या प्रवृत्तींना सभागृहातच आणि रस्त्यावर ठेचून काढले पाहिजे, असा संताप भाजपाचे प्रखर हिंदूत्ववादी नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी भर सभागृहात व्यक्त केला.

## लाडशाखीय वाणी समाजाचा वधू- वर परिचय मेळावा



**काळेवाडी :** पिंपरी चिंचवड शहरातील काळेवाडी – पुणे याठिकाणी अखिल भारतीय लाडशाखीय वाणी समाज पुणे आयोजीत पुणे उपवर ओळख परिचय संमेलन- २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. पिंपरी चिंचवड येथे प्रथमच उप वर (मुले) पाहण्यासाठी उप वधू (मुली) सर्व विवाह उत्सुक मुलांना एकाच वेळी, एकाच मंचावर उप-वधू व तिच्या पालकांना बघता आले. सदर मेळावा वाणी समाजातील इतिहासातील पहिल्यांदाच उपवर व उपवधू यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती सदर प्रसंगी आपल्या मुलीसाठी सुयोग्य वर निवडण्यासाठी मदत झाली.
या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पिंपरी चिंचवड भाजप जिल्हा कार्यकारी अध्यक्ष शत्रुघ्न काटे व या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक युवा नेतृत्व तथा लाडशाखीय वाणी समाज विकास मंडळाचे अध्यक्ष मनोजभाऊ ब्राह्मणकर, परिचय मेळाव्याचे अध्यक्ष राजेंद्र महालपुरे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

## मोशी कचरा डेपोला आग



**पुणे :** पिंपरी चिंचवड शहराचा कचरा जमा होतो. त्याला मोशी कचरा डेपोस आज दुपारी आग लागली. आग विझविण्यासाठी महापालिका प्रशासन युद्ध पातळीवर काम करीत आहे.
मोशी डेपोत संपूर्ण शहराचा कचरा जमा केला जातो. तीव्र उन्हामुळे मिथेन वायू तयार झाल्याने ही आग लागण्याचे महापालिका अधिकाऱ्यांनी सांगितले. यापूर्वी 3 वर्षांपूर्वी डेपोत आग लागली होती.

# मिनी ऑलिम्पिक धर्तीवर क्रीडा संकुल

### निगडी प्राधिकरणातील सेक्टर २५ येथील मदनलाल धिंग्रा मैदानाचे रुप पालटणार

> विविध खेळाच्या आधुनिक सुविधांसह मदनलाल धिंग्रा मैदानातील नवीन क्रीडा संकुलाची निविदा प्रक्रिया सुरू असून लवकरच कामास सुरुवात होणार आहे. क्रीडा संकुलाचे काम सुरु असताना मैदान नागरिकांसाठी खुले राहणार आहे.
>
> **-मनोज सेठिया,** सह शहर अभियंता, स्थापत्य -उद्यान क्रीडा, महापालिका






■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रावेत :** निगडी प्राधिकरणातील सेक्टर २५ येथील मदनलाल धिंग्रा मैदानाचे रुप पालटणार आहे. महापालिका विविध खेळांसाठी या मैदानात नवीन क्रीडा संकुल उभे करणार आहे. त्यामुळे अत्याधुनिक सुविधायुक्त मिनी ऑलिम्पिक धर्तीवर हे क्रीडा संकुल हौशी, उदयोन्मुख व स्पर्धक खेळाडूंसाठी दिलासा ठरणार आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या मैदानात तीन बॅडमिंटन कोर्ट आहेत. तसेच जॉगिंग ट्रॅक आणि मोकळे खेळाचे मैदान, असे एकूण मैदानाचे क्षेत्रफळ ५.४ एकर आहे. सकाळी व संध्याकाळी नागरीक व्यायामासाठी तसेच खेळाडू या मैदानावर सरावासाठी येत असतात. तसेच क्रिकेटचे सामनेही येथे भरविण्यात येतात. हे नवीन क्रीडा संकुल बांधण्याचा खर्च अंदाजे २३ कोटी ४० लाख रुपये असणार आहे. दोन वर्षात काम पूर्ण करण्याची महापालिका प्रशासनाची अट आहे.

**कसं असणार क्रीडा संकुल**

- तीन मजली नवीन इमारत, पार्किंग व लिफ्ट सुविधा (२१८ चौ. मी) असणार आहे.
- इमारतीच्या पहिल्या मजल्यावर सेमी ऑलिम्पिक आकाराचा अत्याधुनिक सात लेनचा डेकसह जलतरण तलाव तयार करण्यात येणार आहे.
- कार्यालय, क्रीडा वैद्यकीय केंद्र, कोच रूम, कॉन्फरन्स हॉल तसेच प्रसाधनगृह, खेळाडूसाठी चेंजिंग रूम असणार आहे.
- इमारतीच्या बाजूला मैदानात बॉक्स क्रिकेट, पिकेल बॉल व व्हॉलिबॉलसाठी मैदानाची निर्मिती करण्यात येणार आहे.

# आधुनिकीकरणासाठी व्हिजन @50 मार्गदर्शक

### शेखर सिंग यांचे प्रतिपादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** पिंपरी चिंचवड २०३२ मध्ये ५० वर्षे पूर्ण करण्याच्या तयारीत असताना, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने (पीसीएमसी) शहराचे भविष्य डिजिटली प्रगत, जागतिक दर्जाचे शहरी केंद्र म्हणून घडवण्यासाठी व्हिजन@५० उपक्रम सुरू केला आहे. या महत्त्वाकांक्षी योजनेला सुरुवात करण्यासाठी, पीसीएमसी आयुक्त शेखर सिंग, अतिरिक्त आयुक्त, शहर अभियंता, मुख्य अभियंते आणि विभाग प्रमुखांनी ताम्हिणीजवळील गरुड माची येथे दोन दिवसांच्या धोरणात्मक कार्यशाळेत भाग घेतला, जिथे त्यांनी प्रमुख शहरी आव्हाने, पायाभूत सुविधा नियोजन आणि प्रशासन धोरणांवर चर्चा केली. व्हिजन @50 हे प्रगत तंत्रज्ञान, कार्यक्षम शहरी नियोजन आणि नागरिकांच्या सहभागासह शहराचे आधुनिकीकरण करण्यासाठी मार्गदर्शक चौकट म्हणून काम करेल.

"भविष्यातील गरजा लक्षात घेऊन शहराने उच्च दर्जाच्या पायाभूत सुविधा विकसित केल्या पाहिजेत. जग एआय आणि डिजिटल तंत्रज्ञानासह वेगाने प्रगती करत आहे आणि त्यानुसार शहरी प्रशासन विकसित झाले पाहिजे. ही कार्यशाळा आपल्याला अधिक कार्यक्षम, स्मार्ट आणि नागरिक-अनुकूल शहरासाठी एक रोडमॅप तयार करण्यास मदत करेल," असे त्यांनी सांगितले.



**व्हिजन@५० उपक्रम सहा महत्त्वाच्या क्षेत्रांना संबोधित करेल:**

- शहरी पायाभूत सुविधा
- आणि राहणीमान
- शहरी गतिशीलता
- आणि कल्याण
- आणि तंत्रज्ञान
- आर्थिक विकास

# महिला आरोग्य विषयक जनजागृतीवर फॅशन शो



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** अलीकडे फॅशन शोचे पर्व फुटलेले आहे. पाच - सहा वर्षांच्या बालकांपासून पन्नाशी गाठलेल्या महिला - पुरुषांचेही फॅशन शो होत असतात. या सर्व फॅशन शो पेक्षा एक आगळा - वेगळा, सामाजिक बांधिलकी आणि महिला आरोग्य जनजागृती घडवणारा फॅशन शो कशिश सोशल फाउंडेशनच्या सहकार्याने कशिश प्रॉडक्शन्स तर्फे रांका मिस / मिसेस / मिस्टर ग्लोबल इंडिया या फॅशन शो मोठ्या दिमाखात एलप्रो मॉल,चिंचवड येथे संपन्न झाला.

यावेळी कशिश सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष, पुण्याचे पॅडमॅन योगेश पवार, रांका ज्वेलर्स चे शिवम अरोरा, बिग बॉस मराठी फेम अभिनेता वैभव चव्हाण, कशिश प्रॉडक्शन्स च्या ब्रँड ॲम्बेसेडर स्नेहल नार्वेकर, आदि मान्यवर उपस्थित होते.

या सामाजिक उपक्रमांबद्दल शिवम अरोरा म्हणाले, आपण समाजाचे देणे लागतो या भावनेतून आम्ही या फॅशन शो चा भाग झालो आहोत.

# पिंपरी-चिंचवडमध्ये ८ व ९ मार्च रोजी वाहनमुक्त दिन




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** पिंपरी चिंचवडमध्ये आजपर्यंत सुमारे २३.३९ लाख वाहनांची नोंदणी झाली आहे, तर त्याची लोकसंख्या २५ लाख आहे. म्हणजेच प्रति व्यक्ती जवळजवळ एक वाहन. वाहनांची संख्या इतक्या वेगाने वाढत असताना, चालणे, सायकलिंग आणि सार्वजनिक वाहतूक यासारख्या पर्यायी आणि शाश्वत वाहतुकीच्या पद्धतींना प्रोत्साहन देण्याची नितांत गरज आहे, ज्याबद्दल वाहनमुक्त दिन साजरा केला जाईल.

पिंपरी मार्केट परिसराची निवड यासाठी केली आहे. येथे दर तासाला सुमारे ८,००० नागरिक बाजारपेठेचा वापर करतात. शहरातील सर्वात वर्दळीचे आणि सर्वाधिक गर्दीचे ठिकाण बनले आहे. केवळ वाहनांसाठीच नाही तर पादचाऱ्यांसाठी वाहनमुक्त दिवसाचे उद्दिष्ट पादचाऱ्यांना चालण्यासाठी, धावण्यासाठी, मुक्तपणे खेळण्यासाठी मौल्यवान रस्त्यावरील जागा परत देणे आणि बाजार परिसराचा आनंद घेणे हे असेल.

- कार्यक्रमाच्या दिवशी, सकाळी ९ वाजल्यापासून, महर्षी वाल्मिकी चौक ते शगुन चौक आणि शगुन चौक ते साई चौक अशी सर्व वाहनांची वाहतूक बंद केली जाईल.
- शगुन चौकाचा महत्त्वाचा जंक्शन वाहतुकीसाठी अंशतः खुला राहील.
- उड्डाणपुलावरून येणाऱ्या सर्व वाहनांना फक्त उजवीकडे वळण्याची परवानगी असेल.
- जवळच्या पार्किंग ठिकाणी पर्यटकांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.



> वाहनमुक्त दिन हा आपल्या रस्त्यांची पुनर्कल्पना करण्याची संधी आहे. वाहनांपेक्षा लोकांना प्राधान्य देऊन, आम्ही सुरक्षित, निरोगी आणि राहण्यायोग्य पिंपरी-चिंचवडच्या दिशेने एक पाऊल टाकतो . आम्ही सर्व नागरिकांना हे परिवर्तन प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी आमंत्रित करतो,"
>
> **—शेखर सिंग,** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त

संपादकीय विशेष

# ...आणि राजीनामा!

बीडमधील सर्वपक्षीय आमदारांनी ज्या पद्धतीने संतोष देशमुख प्रकरण सभागृहात मांडले, त्यावरून खरे तर मुंडे यांचा समावेशच मंत्रिमंडळात व्हायला नको होता; परंतु त्याकडे दुर्लक्ष करून त्यांना मंत्रिमंडळात घेण्यात आले. खून प्रकरणातील मुख्य संशयित कराडचा संपर्क, त्याची उठाठेव आणि त्याला असलेला मुंडे यांचा वरदहस्त यामुळे पोलिसांचे हात जणू बांधले गेले होते. आ. सुरेश धस यांनी मात्र या प्रकरणात ज्या पद्धतीने पाठपुरावा केला आणि पुराव्याची साखळी उभी केली, त्याची दखल मुख्यमंत्र्यांना घ्यावी लागली. आमदार धस, सोनवणे, सुळे, आमदार संदीप क्षीरसागर, मनोज जरांगे पाटील, अंजली दमानिया, तृप्ती देसाई आणि संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय यांनी या प्रकरणी ज्या प्रकारे सरकारवर दबाव वाढवत नेला, त्यावरून तरी सरकारला काळेबेरे करण्याची संधीच राहिली नव्हती. धनंजय यांना मंत्रिपद मिळाले; परंतु त्यांना बीड जिल्ह्यात हस्तक्षेप करण्याची फारशी संधी मिळाली नाही. एवढ्या गंभीर प्रकरणानंतर बीडची जबाबदारी अजित पवार यांच्यावर आली. केवळ कराडची पाठराखणच नाही, तर बीड जिल्ह्यातील अनेक कामांमध्ये गैरव्यवहार, कृषी खात्यातील घोटाळे मुंडे यांची पाठ सोडायला तयार नव्हते. धस, दमानिया, विजय कुंभार यांनी एकामागून एक आरोपाच्या फैरी झाडायच्या, मुंडे यांनी खुलासे करायचे आणि लगेच नवीन आरोप आणि पुरावे सादर करायचे या क्रमामुळे मुंडे यांचे पाय दररोज किती खोल रुतत चालले



आहेत, हे स्पष्ट होत होते. देशमुख खूनप्रकरणी कराडचा काहीही संबंध नसल्याचे सांगितले जात होते; परंतु खुनाचा सूत्रधार तोच असल्याचे स्पष्ट झाले. प्रति पालकमंत्री म्हणून मिरवणारा, कोट्यवधी रुपयांची मालमत्ता करणारा आणि मुंडे यांच्याशी भागीदारी असणारा कराड हा सुरुवातीपासूनच आरोपी मानला गेला.

ज्या निर्घृण पद्धतीने देशमुख यांची हत्या केली गेली, त्याचे 'आखो देखा हाल' असल्यासारखे वर्णन आमदार धस आणि देशमुख यांची मुलगी वैभवी हे करत होते. ते अतिशयोक्तीपूर्ण असल्याचे सांगितले जात होते; परंतु प्रत्यक्षात देशमुख यांना मारहाणीचे फोटो 'सोशल मीडिया'वर व्हायरल झाले, तेव्हा संतापाची आग पेटली आणि या आगीत मुंडे यांचे मंत्रिपद स्वाहा झाले. वैद्यकीय कारणामुळे तसेच आरोप-प्रत्यारोपामुळे राजीनामा दिल्याचे ते सांगत असले, तरी त्याला अर्थ नाही. देशमुख यांच्या हत्या प्रकरणात 'सीआयडी,' 'एसआयटी'ने कराडचा ज्या पद्धतीने तपास केला, त्याच्या मुसक्या आवळल्या, त्याच्यावर 'मोक्का' लावला आणि आरोपपत्रात तोच देशमुख यांच्या हत्येचा सूत्रधार असल्याचे म्हणणे मांडले, त्यावरून मुंडे यांना फार काळ मंत्रिपदी ठेवणे म्हणजे सरकारची प्रतिमा मलीन करणेच होते. महाराष्ट्रातील मुंडे प्रतापाची दखल खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना घ्यावी लागली. एका मंत्र्यांसाठी संपूर्ण सरकारला वेठीला धरणे, मंत्र्यांची पाठराखण करताना भाजपचीही प्रतिमा मलीन होणे परवडणारे नव्हतेच.

त्यात मुंडे हे शेतकी खात्याचे मंत्री असताना पीक विमा तसेच अन्य घोटाळे झाले. त्यावरून सरकारवर आरोप झाले. मंत्रिमंडळाची बैठक झाली नसताना ती झाल्याचे दाखवून निर्णय घेतले गेल्यामुळे त्यांची कारकीर्द वादाच्या भोवऱ्यात सापडली. या सर्व प्रकारामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची कोंडी होत होती. एका समाजाच्या मतांसाठी आणखी किती तडजोड करायची, हा मुद्दा होता. त्यात देशमुख हत्या प्रकरणाचे एक एक कंगोरे समोर येत गेले आणि त्यात कराडचा सहभाग पक्का होत गेला. हे बाहेर आले, तेव्हा अजितदादांनी अप्रत्यक्षपणे मुंडे यांना राजीनामा द्यायचा संकेत दिला; परंतु त्यांनी तो मानला नाही. देशमुख यांच्या निर्घृण हत्येचे फोटो समोर आल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात खळबळ माजली. या प्रकरणात अटक झालेल्या कराडचे मुंडे यांच्याशी निकटचे संबंध असल्याने त्यांच्यावर राजीनाम्याचा दबाव वाढला होता. अखेर फडणवीस यांनी मुंडे यांना राजीनामा देण्याचा आदेश दिला.

देशमुख यांची नऊ डिसेंबर 2024 रोजी हत्या करण्यात आली. या प्रकरणातील आरोपपत्रात कराडला मुख्य सूत्रधार म्हणून नमूद करण्यात आले आहे. कराड याने 'अवदा कंपनी'च्या भू-संपादन अधिकाऱ्याकडून दोन कोटी रुपयांची खंडणी मागितली होती. देशमुख यांनी या खंडणीला विरोध केल्यामुळे हत्या करण्यात आली. या प्रकरणाशी मुंडे यांचा संबंध जोडला जात असल्याने राज्य सरकारची बदनामी होऊ लागली आहे, अशी भावना कार्यकर्त्यांमधून व्यक्त केली जात होती. भाजप, महायुती आणि जनहितासाठी राजीनामा घेणे महत्त्वाचे आहे, या मुद्द्यावर निर्णय घेण्यास मुख्यमंत्री फडणवीस सक्षम आहेत, असे चित्र पुढे आले आनि राजीनामा घेतला गेला. फडणवीस यांच्याकडे गृह खाते आहे. पोलिस विभागाने त्यांना या संदर्भात काही माहिती दिली असेल, याशिवाय कृषी घोटाळ्याच्या आरोपावर कृषी विभागाच्या सचिवांनी त्यांना काही पुरावे दिले असतील तर ते निश्चितच निर्णय घेतील, असे सुधीर मुनगंटीवार यांचे म्हणणे म्हणजे राजीनाम्याचा आदेशच होता.

स्वकीय आणि विरोधकांचा दबाव लक्षात घेता राज्य सरकारने मुंडे यांचा राजीनामा घेऊन आता इभ्रतीचा अधिक पंचनामा होणार नाही, याची दक्षता घेतली आहे. आमदार धस म्हणतात त्याप्रमाणे देवाच्या काठीचा आवाज येत नाही; परंतु ती न्याय करते. मुंडे यांचा राजीनामा झाला असला, तरी देशमुख यांच्या समर्थकांनी ज्या पद्धतीने दबाव वाढवत नेला, ते पाहता ते स्वस्थ बसतील, असे वाटत नाही. अलिकडेच करुणा मुंडे प्रकरणात न्यायालयाने एक निकाल देताना धनंजय मुंडे यांना दोन लाख रुपये पोटगी देण्याचे आदेश यांना दिले. मुंडे यांनी या निर्णयाला आव्हान दिले असले तरी करुणाही शांत बसणाऱ्यांपैकी नाहीत. दमानियाही कृषी खात्यातील घोटाळ्यांचा पाठपुरावा मध्येच सोडणार नाहीत. आमदार धस यांनी कृषी खात्यातील घोटाळ्याचा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी 'ईडी', 'सीबीआय' चौकशीची मागणी यापूर्वीच झाली आहे. हार्वेस्टर अनुदान घोटाळ्यातील फिर्यादीवरही चौकशी होऊ शकते. हे सर्व मुंडे यांच्याभोवती संशयाचा भोवरा आणखी निर्माण करणारे आहे. त्यामुळे राजीनामा दिला, तरी त्यांना स्वस्थ बसता येणार नाही. करुणा यांची एक याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात प्रलंबित आहे. तिची सुनावणी ही याच महिन्यात होणार आहे. अपराध आणि आरोपांची संख्या अधिक असल्याने मुंडे यांना आणखी संघर्षाला तोंड द्यावे लागणार आहे.

# जर्मनीमध्ये सत्तांतर; पण आव्हाने कायम

**गेल्या सहा महिन्यांमध्ये जर्मनीमध्ये घडलेल्या राजकीय घडामोडी पाहता सत्तांतर अटळ होते. अमेरिकेप्रमाणेच तिथेही स्थलांतराचा मुद्दा प्रचाराच्या केंद्रस्थानी आला होता. दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनीमध्ये प्रथमच कडव्यांचे सरकार सत्तेवर येत असले, तरी या सरकारला तडजोडी करणं अपरिहार्य दिसते. आता जर्मनीचे चान्सेलर होऊ घातलेल्या फ्रेडरिक मर्झ यांना आघाडी करण्यासाठी अन्य पक्षांशी जुळवून घ्यावे लागणार आहे.**



विश्वसंचार

आरिफ शेख

जर्मनीमध्ये अलिकड पार पडलेल्या संसदीय निवडणुकीत काँझर्व्हेटिव्ह आघाडीला सर्वाधिक मते मिळाली. फ्रेडरिक मर्झ आता जर्मनीचे चान्सलर बनणार आहेत; मात्र त्यांच्या आघाडीला बहुमत मिळालेले नाही. सरकार स्थापन करण्यासाठी 50 टक्क्यांहून अधिक जागा मिळणे आवश्यक आहेत. तेथिल कोणत्याही पक्षाला वा आघाडीला त्या मिळालेल्या नाहीत. दुसऱ्या महायुद्धानंतर देशात कट्टरतावाद्यांची सत्ता येणार असली, तरी त्याची सुरुवात सहा महिन्यांपूर्वी झालेल्या विविध राज्यांच्या निवडणुकीत एक राज्य जिंकून कट्टरतावाद्यांनी आपली चुणूक दाखवली होती. बेकायदेशीर स्थलांतरित आणि सीरियन निर्वासितांचा प्रश्न हा या निवडणुकीतील सर्वात मोठा मुद्दा होता. इस्लामच्या नावाखाली पसरवल्या जात असलेल्या कट्टरतावादामुळे हैराण झालेल्या जर्मन जनतेला केवळ 'एएफडी'च जर्मनीला वाचवू शकते, असे वातावरण तयार करण्यात आले होते. 'एएफडी' म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून ड्यूशलँडसाठी उजव्या विचारसरणीचा पर्याय आहे. सध्याच्या सरकारच्या धोरणांविरोधात जनतेमध्ये रोष आहे. याचाच परिणाम म्हणजे देशातील सार्वत्रिक निवडणुकीमध्ये उजव्या विचारसरणीच्या पक्षाला सर्वाधिक मते मिळाली. जर्मनीमध्ये उजव्या विचारसरणीच्या अल्टरनेटीव्ह फॉर ड्युशलँड ने निवडणुकीत मिळवलेल्या आघाडीमुळे सामान्य जर्मन मतदार इस्लामिक कट्टरतावाद आणि सध्याच्या सरकारच्या इस्लामबद्दलच्या उदारमतवादी धोरणांविरुद्ध संतप्त असल्याचे दिसून आले आहे; मात्र उजव्या विचारसरणीच्या पक्षाला अजूनही स्वबळावर बहुमत मिळवता आलेले नाही. सरकार स्थापनेसाठी त्यांना युतीची गरज आहे.

अलिकडेच निवडणूक निकाल समोर आल्यानंतर सीडीयू/सीएसयू उमेदवार फ्रेडरिक मर्झ यांनी सत्ताधारी आघाडी स्थापन करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. निवडणुकीमध्ये त्यांना सुमारे 29 टक्के मते मिळाली. मर्झ म्हणाले, आता आम्ही जर्मनीमध्ये शक्य तितक्या लवकर सरकार स्थापन करण्याची गरज आहे. आम्ही युरोपमध्ये वेगळे स्थान निर्माण करू शकतो, याची खात्री आहे. दरम्यान, एएफडी पक्षाच्या चान्सलर पदाच्या उमेदवार एलिस विडेल यांनी निकालाबाबत आनंद व्यक्त केला. हा आमच्यासाठी ऐतिहासिक निकाल आहे. असे असले तरी आघाडी अपरिहार्य असल्याने त्यांना चान्सलर होता येणार नाही. सरकार स्थापनेचा मार्ग सोपा होणार नाही, कारण बहुतांश प्रमुख पक्ष अजूनही 'एएफडीला' पाठिंबा न देण्यावर ठाम आहेत. 'एएफडी' पक्ष अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा समर्थक मानला जातो. ट्रम्प यांनी जर्मनीतील नवीन निवडणूक निकालाचे कौतुक केले. ते म्हणाले, अमेरिकेप्रमाणेच जर्मनीचे लोकही ऊर्जा आणि इमिग्रेशनच्या अजेंड्यामुळे कंटाळले आहेत. 'एएफडी'चा विजय हा जर्मनीसाठी मोठा दिवस आहे. आता आपण 'नाटो'सोबत राहू शकतो का, हे पहावे लागेल. कारण संरक्षणाच्या बाबतीत युरोपला अमेरिकन प्रभावापासून मुक्त करून मजबूत करण्याला माझे प्राधान्य आहे.

69 वर्षीय मर्झ यांना सरकार चालवण्याचा अनुभव नाही; परंतु त्यांनी देशाला चांगले नेतृत्व देण्याचे आश्वासन दिले आहे. ओलाफ शुल्झ यांनी पराभव स्वीकारला आहे. त्यांनी मर्झ यांचे विजयाबद्दल अभिनंदन केले. शुल्ट्झ यांच्या नेतृत्वाखालील युती गेल्या नोव्हेंबरमध्ये तुटली. त्यामुळे नियोजित वेळेच्या सात महिने आधी निवडणुका घ्याव्या लागल्या. आता निवडणूक निकालानंतर मर्झ यांना बहुमत मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागेल, कारण सर्वाधिक जागा जिंकूनही त्यांच्या आघाडीला बहुमतासाठी आवश्यक असलेली 50 टक्क्यांहून अधिक मते मिळालेली नाहीत. तत्पूर्वी जर्मनीच्या संसदेचे कनिष्ठ सभागृहाचे 630 सदस्य निवडण्यासाठी 59 दशलक्षाहून अधिक मतदारांनी मतदान केले. जर्मनीच्या संसदेत 630 जागा आहेत, त्यापैकी 299 थेट मतदारांद्वारे निवडल्या जातात. 331 जागांचे वाटप पक्षीय मतांच्या आधारावर केले जाते. येथे मतदार दोन मते देतात. पहिले मत स्थानिक उमेदवाराला तर दुसरे मत राजकीय पक्षाला दिले. कनिष्ठ सभागृहातील जागांचे वाटप दुसऱ्या मताच्या आधारे प्रमाणात केले जाते. जर्मनीमध्ये निवडणूक प्रचारात अवैध स्थलांतरितांचा मुद्दा गाजला. बेकायदेशीर स्थलांतरितांनी देशात अनेक हल्ले केले आहेत. अर्थव्यवस्थेतील मंदीचा मुद्दाही निवडणुकीमध्ये वरचढ ठरला. जर्मनी हा 27 राष्ट्रांच्या युरोपीयन महासंघातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. तो 'नाटो'चा प्रमुख सदस्य आहे. तो युक्रेनचा अमेरिकेनंतर दुसरा सर्वात मोठा शस्त्र पुरवठादार आहे.

जर्मन राजकारणात ट्रॅफिक लाइट म्हणजे 'सोशल डेमोक्रेटिक पार्टी' (एसपीडी), 'फ्री डेमोक्रॅटिक पार्टी' (एफडीपी) आणि 'ग्रीन्स पार्टी' यांची युती आहे. या पक्षांच्या चिन्हांना अनुक्रमे लाल, पिवळा आणि हिरवा या रंगांची नावे देण्यात आली आहेत. अलिकडेच झालेल्या या निवडणुकीमध्ये काँझर्वेटिव्ह आघाडीला सर्वाधिक मते मिळाली आहेत; मात्र त्यांनाही बहुमत मिळू शकले नाही. सरकार स्थापन करण्यासाठी 50 टक्क्यांपेक्षा जास्त जागा मिळणे आवश्यक आहे, तर या उजव्या विचारसरणीच्या आघाडीला जवळपास 30 टक्के मते मिळाली आहेत; मात्र आता फ्रेडरिक मर्झ हे जर्मनीचे नवे चान्सलर होणार हे निश्चित झाले आहे. फ्रेडरिक मर्झ यांचे प्रतिस्पर्धी आणि विद्यमान चान्सलर ओलुफ शुल्झ यांनी ताज्या निवडणुकीमध्ये पराभव स्वीकारला आहे. जर्मनीतील चान्सलर पदासाठीच्या या निवडणुकीत विरोधी काँझर्व्हेटिव्ह अलायन्सला 28.5 टक्के मते मिळाली. या आघाडीमध्ये ख्रिश्चन डेमोक्रॅटिक युनियन (सीडीयू) आणि ख्रिश्चन सोशल युनियन (सीएसयू) पक्षांचा समावेश आहे. ही युती निवडणुकीत सर्वाधिक मते मिळवणारी आघाडी ठरली. यानंतर 'अल्टरनेटिव्ह फॉर जर्मनी' (एएफडी) हा 'अल्ट्रा राईट पार्टी' म्हणून ओळखला जाणारा पक्ष दुसऱ्या क्रमांकावर राहिला. या पक्षाला 20 टक्के मते मिळाली. 'एएफडी' पक्षाची ही आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे तर सत्ताधारी 'सोशल डेमोक्रॅटिक पार्टी'ला (एसपीडी) केवळ 16.5 टक्के मते मिळाली.

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात या निवडणुकीमध्ये 'एसपीडी' या पक्षाची कामगिरी सर्वात वाईट ठरली आहे. जर्मन निवडणुकीमध्ये 30 टक्क्यांपेक्षा कमी मते मिळवल्यानंतर काँझर्व्हेटिव्ह नेते फ्रेडरिक मर्झ नवीन युती सरकार स्थापन करणार आहेत. फ्रेडरिक मर्झ हे ख्रिश्चन डेमोक्रॅटिक युनियन (सीडीयू) चे नेते आहेत. निवडणुकीदरम्यान, मर्झ यांनी संकटग्रस्त अर्थव्यवस्थेला वळण देण्याचे आणि अवैध स्थलांतरितांना जर्मन सीमा बंद करण्याचे आश्वासन दिले. या आश्वासनांची पूर्तता करणे हे त्यांच्यासमोरील सर्वात मोठे आव्हान असेल. तसेच त्याची अंमलबजावणी करण्यालादेखील त्यांचे प्राधान्य असेल. मर्झ यांचा जन्म 11 नोव्हेंबर 1955 रोजी रोमन कॅथोलिक कुटुंबामध्ये झाला. ते नॉर्थ राइन-वेस्टफेलिया राज्यातील सॉरलँड प्रदेशातील आहेत. सहा फूट सहा इंच उंचीचे मर्झ हे परवानाधारक पायलटही आहेत. ते अनेकदा आपल्या प्रायव्हेट जेटमधूनही उड्डाण करतात. 1989 मध्ये ते पहिल्यांदा संसदेवर निवडून आले. 'ख्रिश्चन डेमोक्रॅटिक युनियन' (सीडीयू)मधील अँजेला मर्केल यांचा कालखंड संपल्यानंतर पक्षाची कमान त्यांच्या हातात आली. देशातला अतिउजवा पक्ष असलेल्या 'एएफडी'ला 20.6 टक्के मते मिळाली. ही त्यांची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी असून गेल्या वेळच्या मतांच्या टक्केवारीच्या जवळपास दुप्पट मते त्यांनी यावेळी मिळवली आहेत. ट्रम्प यांचे निकटवर्तीय अमेरिकन उद्योगपती एलन मस्क यांनी या पक्षाला उघडपणे पाठिंबा दिला होता आणि निवडणुकीपूर्वी अनेक वेळा या पक्षाच्या नेत्यांची भेट घेतली होती.

खेचाखेची

## तो मुलाने मिळवला

**बायको** : अहो, ऐकला का? शेजारच्या मुलीला गणितात ९९ गुणे मिळाले...

.

.

**नवरा** : अरे वा! फक्त एक गुण कसा गेला तिचा?

.

.

**बायको** : तो आपल्या मुलाने मिळवला.

सुप्रभात — वेगळं काही

तुर्कमेनिस्तानची राजधानी अश्गाबतमध्ये काळपट रंगाच्या गाड्यांवर बंदी घालण्यात आली आहे. या देशाच्या अध्यक्षांना पांढऱ्या रंगाच्या गाड्या खूप आवडतात. त्यांची ही आवडच काळ्या गाड्या मालकांच्या मुळावर उठली आहे. इथे फक्त पांढऱ्या रंगाच्या गाड्यांची चलती असल्याचं दिसून येतं. पांढरा रंग देशासाठी लकी असल्याचं अध्यक्षांचं म्हणणं आहे. त्यामुळे देशातल्या नागरिकांनी पांढऱ्या किंवा चंदेरी रंगाच्या गाड्या वापराव्या, असं फर्मान त्यांनी काढलं आहे. काळ्या रंगाच्या गाड्या जप्त केल्या जात आहेत. त्यामुळे लोकांना काळ्या रंगाच्या गाड्या पांढऱ्या रंगात रंगवून घ्याव्या लागत आहेत.

## धाकाचा अतिरेक नको

संगोपन

संगोपनाची व्याख्या अत्यंत व्यापक आहे. मुलांवर आपली मतं लादत राहणं, त्यांच्या मतांची कदर न करणं आणि धाकदपटशा दाखवून आपल्या मनाप्रमाणे वागवणं हे संगोपनाच्या व्याख्येत बसत नाही. मुलांना वाढवताना त्यांचं म्हणणं नीट ऐकून घेतलं पाहिजे आणि नंतर त्यावर प्रतिक्रिया व्यक्त केली पाहिजे. अनेकदा त्यांच्याकडून एखादी वस्तू हरवते. त्यावर पालक मुलांना खूप बोलतात. पण असं नेमकं का होतं हे शांतपणे विचारलं तर कदाचित कोणी त्यांच्याकडून वस्तू काढून घेत असेल किंवा चोरत असेल तर समजू शकतं. मुलांकडून बेजबाबदारपणा होत असेल तर समजावून सांगता येतं. मध्यंतरीच घडलेली एक गोष्ट आहे. कंपास बॉक्स हरवल्यामुळे तापट आईचा मार खावा लागण्याच्या भीतीनं पळणाऱ्या मुलानं थेट गच्चीवरून उडी मारली. कोवळ्या मुलाचा जीव गेला. म्हणूनच मुलांशी वागताना ९० टक्के प्रेम आणि १० टक्के धाक असावा. मारहाण, आरडाओरडा, शिवीगाळ यामुळे मुलांना वळण लागत नाही. प्रेमानं, समजुतीनं सांगितलं तर ती सगळं ऐकतात आणि त्यांच्या मनात आदर आणि प्रेम निर्माण होतं.






राशीभविष्य

- **मेष** : वादविवाद संपुष्टात येतील. नोकरीत मनासारख्या घटना घडतील. वैवाहिक सौख्य लाभणार आहे.
- **वृषभ** : आता अडचणी दूर होतील. प्रगतीचे मार्ग लाभतील. प्रवास फायदेशीर ठरेल. स्वास्थ्य लाभेल.
- **मिथुन** : रचनात्मक कार्यात यश मिळेल. आर्थिक प्राप्ती समाधानकारक होईल. स्पर्धांमध्ये यश मिळेल.
- **कर्क** : कार्यासाठीचे प्रयत्न यशस्वी होतील. व्यापारात योग्य वेळी घेतलेले निर्णय फायदेशीर ठरतील.
- **सिंह** : बुद्धिमत्ता, दूरदृष्टीपणामुळे समाजात कौतुक होईल. सुखवस्तूंवर खर्च होईल. प्रवास शक्यतो टाळा.
- **कन्या** : संपत्तीसंबंधात धावपळ फायदेशीर ठरेल. व्यवसायात यश मिळेल. नातलगांचं सहकार्य लाभेल.
- **तूळ** : कायदेशीर कामं पूर्ण होतील. अध्यात्मात प्रगती होईल. कार्यक्षेत्रातील अडचणी आता दूर होतील.
- **वृश्चिक** : वैवाहिक जीवनात आनंददायी घटना घडतील. आरोग्याच्या समस्या दूर होतील. अपेक्षित प्रगती.
- **धनु** : कौटुंबिक सौख्य लाभेल. मनस्वास्थ्य उत्तम राहील. व्यवसायातील महत्त्वाचे निर्णय विचारानं घ्यावे.
- **मकर** : मुलांकडून आनंदाची बातमी मिळेल. कार्यसिद्धी झाल्याने समाधान मिळेल. समाधानी रहाल.
- **कुंभ** : कामाचे नवीन प्रस्ताव मिळतील. नव्या योजना कार्यान्वित होतील. सुखस्वास्थ्य लाभणार आहे.
- **मीन** : व्यापारात नवीन संधी लाभतील. आर्थिक उत्पन्नात वाढ होईल. छोटा-मोठा प्रवास करावा लागेल

सल्ला मोलाचा

## व्हा 'रॅम्प रेडी'

काही झकास फॅशन ट्रेंड्सबद्दल-

✻ काही दिवसांपासून फ्रिंजची फॅशन चलतीत आहे. लेहंगा, साडी या सगळ्या प्रावरणांमध्ये फ्रिंज जादू पसरवत आहे. फ्रिंज स्टाईल कोणत्याही फॅब्रिकसोबत कॅरी करता येते. बाजारात फ्रिंजच्या अॅक्सेसरीजही उपलब्ध आहेत.

✻ लेदर जॅकेट हे ऑल टाईम फेव्हरिट आउटफिट आहे. त्यामुळे बिनधास्त लेदर जॅकेट कॅरी करा. टर्टलनेक टॉपवर लेदर जॅकेट खास लूक देऊन जातं.

✻ प्लीटेड स्कर्ट- सत्तरच्या दशकात प्लीटेड स्कर्टचा ट्रेंड लोकप्रिय होता. आता या ट्रेंडने पुन्हा रॅम्पवर धमाल करायला सुरवात केली आहे.

✻ श्रग- तुम्ही वेस्टर्न आउटफिटवर श्रग घालू शकता. श्रग जॅकेट वेस्टर्न, ट्रॅडिशनल अशा सर्व प्रकारच्या पोषाखांवर ट्राय करता येतं.

## ५ मार्च

दिनविशेष

- **२०१३** : आयपीएलमधील 'किंग्ज इलेव्हन पंजाब' या संघातील आर्थिक गुंतवणुकीबाबत अभिनेत्री प्रीती झिंटाची ईडीकडून चौकशी.
- **२०१४** : लोकसभा निवडणुकीचा बिगूल वाजला.
- **२०१६** : अपंगांसाठी सुगम्य भारत अभियान सुरू करण्याची घोषणा. देशभरात ग्राह्य होणारे एकच ओळखपत्र देण्याचे नियोजन.
- **२०१८** : क्रीडा संघटनांमधील अधिकार पदे भूषवण्यास मंत्र्यांना बंदी करण्याची सर्वोच्च न्यायालयाची सूचना.

जाणून घ्या

## जीवनसत्वांविषयी १

आहारातून आपल्याला बरेच पोषक घटक मिळतात. शरीराच्या वाढीसाठी या पोषक घटकांची गरज असते. तुमच्यासारख्या वाढत्या वयातल्या मुलांना तर याची खूप आवश्यकता असते. विविध पोषक घटकांमध्ये सर्वाधिक महत्त्व जीवनसत्त्वांना दिलं जातं. जीवनसत्त्वांचे बरेच प्रकार आहेत. प्रत्येकाची ठराविक कामं आहेत. ड जीवनसत्त्वामुळे हाडं बळकट होतात. अ जीवनसत्त्वामुळे दृष्टी चांगली होते. क जीवनसत्त्वामुळे जखम लवकर बरी होते. ब जीवनसत्त्वामुळे शरीराला ऊर्जा मिळते.

जीवनसत्त्वांचे दोन प्रकार आहेत. काही जीवनसत्त्वं चरबीत विरघळतात तर काही पाण्यात. चरबीत विरघळणारी जीवनसत्त्वं असलेलं अन्न खाल्ल्यानंतर ती शरीरातल्या चरबीत आणि यकृतात साठवली जातात. शरीराला गरज पडेल तेव्हा त्यांचा वापर केला जातो. ही जीवनसत्त्व बराच काळपर्यंत शरीरात साठून राहतात. काही जीवनसत्त्वं तर सहा महिन्यांपर्यंत टिकतात. अ, ड, ई ही चरबीत शोषली जाणारी जीवनसत्त्व आहेत.

पंचांग

**बुधवार, ५ मार्च २०२५**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
फाल्गुन शु.६, नक्षत्र: कृत्तिका
चंद्राशी: मेष, योग: वैधृती
सूर्योदय: ६.५७, सूर्यास्त: ६.४३


फॉरवर्डस

**आपल्या माणसांसाठी जगू या!**
छोटी सी जिंदगी है हंस के जियो,
भुला के गम सारे दिल से जियो,
उदासी में क्या रखा है मुस्कुरा के जियो, अपने लिए न सही अपनों के लिए जियो।

आरोग्यमंत्र

## मणक्यांचा आजार आहे?

सर्व साधारणत: दर दहा व्यक्तींमधील आठ व्यक्तींनी आयुष्यात कधी ना कधी मानदुखी आणि कंबरदुखी अनुभवलेली असते. बदलती जीवनशैली आणि चुकीच्या पध्दतीच्या शारीरिक हालचाली यामुळे या व्याधींमध्ये वाढ होताना दिसत आहे. मात्र सांधेरोपणाप्रमाणे मणक्यांचं रोपण होऊ शकत नाही. म्हणूनच मणक्यांच्या आजारावरील उपाययोजना समजून घेणं गरजेचं ठरतं.



मानवी पाठीचा कणा म्हणजे मणके आणि दोन मणक्यांमधील गादी अशा पध्दतीची एक मालिका असते. एकूण ३३ मणक्यांनी ही मालिका बनलेली असते. त्यात सात मानेचे मणके (सर्व्हायकल), १२ पाठीचे मणके (थोरॅसिक), पाच कंबरेचे (लंबार), पाच जोडलेले सेक्रम आणि चार जोडलेले मणके (कॉसीक्स) असे असतात. हे मणके एकत्र जोडले जाऊन एक पोकळी निर्माण होते. त्यातून नसांचं बंडल डोक्यापासून कंबरेपर्यंत जातं. त्यालाच मज्जारज्जू संस्था अर्थात स्पाईनल कॉर्ड म्हणतात. दोन मणक्यांच्या मधून असलेल्या पोकळीतून क्रमश: डावी आणि उजवी नस निघते. या नसा स्नायूंना ताकद आणि त्वचेला संवेदना देतात. या नसांवर ताण येतो त्यावेळी वेदना होतात. नसांवर ज्या ठिकाणी दबाव येतो त्याप्रमाणे क्रमश: वेदना होतात. तळहातात तसंच पायात, पोटरीत आणि तळपायापर्यंत वेदना होतात. त्याचप्रमाणे हातापायाला येणाऱ्या मुंग्या यामुळेच जाणवतात. ही बाब जाणीव घेण्याजोगी आहे. या त्रासाकडे दुर्लक्ष करु नये.

स्मार्ट शॉपिंग

✻ ऑनलाईन शॉपिंगमधल्या ऑफर्समध्ये फार बदल होत नाहीत. त्यामुळे एका दिवशी सगळी खरेदी करू नका.

✻ सेलमधल्या काही वस्तू बिनकामाच्या असतात. भविष्यात कधी तरी कामी येऊ शकतात म्हणून आपण त्या विकत घेतो. त्यामुळे गरजा लक्षात घेऊन खरेदी करा.

✻ इतरांची नक्कल करू नका. दिखावा म्हणून खरेदी करू नका.

✻ एक्सचेंज ऑफरपासून सावध रहा. उत्पादनाची किंमत जाणून घ्या. विविध साईट्सवर मिळणाऱ्या सवलतींची तुलना करा.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### भूकंपाच्या धक्क्यानं बिहारला हादरा

**पाटणा :** भूकंपाच्या हादऱ्यानं बिहारमध्ये चांगलीच दहशत उडाली आहे. मध्यरात्री जमीन हादरल्यानं नागरिकांनी घराबाहेर सैरावैरा धाव घेतली. बिहारमधील अनेक जिल्ह्यांना भूकंपाच्या हादऱ्यानं चांगलेच दणके दिले. बिहारमधील पाटणा, भागलपूर, समस्तीपूर, दरभंगा, कटिहार, सिवानसह अनेक जिल्ह्यांना भूकंपाचा चांगलाच धक्का बसला. शुक्रवारी पहाटेच्या सुमारास भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. त्यामुळे रात्रीच्या वेळी नागरिकांनी घराबाहेर धाव घेतली.

शुक्रवारी मध्यरात्रीनंतर नागरिकांना जमीन हलत असल्याचं जाणवलं. त्यानंतर नागरिकांनी घराबाहेर धाव घेतली. बिहारमधील काही परिसरात भूकंपाचे चांगलेच धक्के जाणवले. या भूकंपाची तीव्रता ५.५ रिश्टेल स्केल इतकी होती. बिहारमधील भूकंपाचा केंद्रबिंदू नेपाळमध्ये होता. भूकंपाचा उगम पृथ्वीच्या सुमारे १० किलोमीटर खाली झाल्यानंतर त्याचे धक्के नेपाळसह बिहारमधील अनेक जिल्ह्यांना जाणवले. मात्र या भूकंपात कोणतीही जीवितहानी झाली नाही, अशी माहिती सूत्रांनी दिली. भूकंपाचे हादरे बसल्यानं नागरिक रात्री उशिरा घराबाहेर पडले. त्यामुळे मोठा गदारोळ उडाला. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या मते नेपाळमधील बागमती हे भूकंपाचं केंद्र होतं. नेपाळमध्येही मोठा भूकंप झाला आहे. त्यामुळेच त्याचा परिणाम भारतातील बिहार आणि परिसरात दिसून आला. बिहारमधील भूकंपानंतर सोशल मीडियावर त्याबद्दल माहिती दिली जात आहे. अनेक ठिकाणी भूकंप झाल्यामुळे लोक रात्री घराबाहेर पडले.

# १० दिवसांत ९ निर्णय

## फडणवीस यांचे : मित्रपक्षांना सूचक संदेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** सरकारच्या १० दिवसांच्या कार्यकाळात ९ निर्णय घेऊन देवेंद्र फडणवीस यांनी मित्रपक्षांना काही सूचक संदेश दिले आहेत. आपण जरी सरकारमध्ये असलात तरी चुकीचे काम केले तर घरी बसवेन, असे देवेंद्र फडणवीस म्हणाल्याचे खुद्द कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी जाहीर सभेत सांगितले. अगदी त्याचप्रमाणे कधी खासगीत बोलून तर कधी सभा संमेलनातून जाहीरपणे मित्रपक्षांना 'ऐकवून' सरकारमध्ये आपलाच वरचष्मा कसा राहील, हे फडणवीस यांनी पाहिले. राज्यात महायुतीचं सरकार आल्यापासून सत्ता वाटपावरून धुसफूस सुरु असल्याची चर्चा आहे. सरकार स्थापनेवेळी आधी मंत्रिपदावरून, मग महत्वाच्या खात्यांवरून आणि नंतर पालकमंत्रिपदावरून वाद सुरु आहे. मात्र हे वाद सोडवताना आपणच 'बॉस' असल्याचे फडणवीस यांनी वारंवार दाखवून दिले.



१) एकनाथ शिंदे यांचा दिल्लीमार्गे दबाव पण तरीही फडणवीस गृहमंत्रीपद सोडले नाही

आधीच्या सरकारमध्ये मुख्यमंत्रिपद सांभाळलेले एकनाथ शिंदे यावेळीही मुख्यमंत्रिपदासाठी आग्रही होते. परंतु भाजपला मिळालेले निर्भेळ यश पाहता, ते त्यांना मिळाले नाही. परंतु अगदी शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी दबावतंत्र वापरून मुख्यमंत्री नाही तर नाही... गृहमंत्रिपद तरी मिळावे, यासाठी फडणवीस यांच्यावर जमेल तेवढा दबाव आणला. त्यासाठी सत्तास्थापनेच्या काळात ते साताऱ्याच्या मूळगावी जाऊन दोन दिवस मुक्कामी गेले. अगदी दिल्लीच्या महाशक्तीकडूनही प्रयत्न करून पाहिले. परंतु यावेळी मात्र भाजपच्या आमदारांचे संख्याबळ पाहता देवेंद्र फडणवीस यांनी अजिबात नमते घेतले नाही.

२) प्रथा मोडीत काढून देवेंद्र फडणवीस यांचा एकनाथ शिंदे यांना दुसरा दणका

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सूत्रे हातात घेतल्यानंतर महामंडळाच्या अध्यक्षपदाचा कार्यभारही आपल्याकडे राहावा, यासाठी प्रयत्न केले. परंतु देवेंद्र फडणवीस यांनी परिवहन महामंडळाच्या अध्यक्षपदी राजकीय नेत्याची वर्णी लावण्याची प्रथा मोडीत काढत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला पहिला दणका दिला. त्यानंतरही सरनाईक यांनी परिवहन खात्याचा मंत्री म्हणून माझाच निर्णय अंतिम राहील, असे जाहीरपणे सांगितले. या टिप्पणीवर खास 'नागपुरी स्टाईल'ने देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्र्यांकडे सगळ्या मंत्र्यांचे निर्णय येतच असतात, असे सांगत डिवचले.

३) पालकमंत्रिपदाचा वाद, भाजपच वरचढ, शिंदेंना दणका

सत्तावाटपाचे सूत्र ठरविताना तत्कालिन परिस्थितीत काही वाटाघाटी करण्याचा निर्णय तिन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये झाला. पण ज्यावेळी रायगडच्या पालकमंत्रिपदाचा विषय आला त्यावेळी अजित पवार यांची राष्ट्रवादी आणि शिवसेना एकमेकांसमोर उभी ठाकली. दुसरीकडे नाशिकच्या पालकमंत्रिपदावरूनही अजित पवार यांची राष्ट्रवादी आणि भाजप एकमेकांसमोर आले. या सगळ्यात रायगडच्या पालकमंत्रिपदाला स्थगिती देऊन नाशिकचे पालकमंत्रिपद भाजपकडे राहिल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. याचाच अर्थ नाशिक आणि रायगडच्या पालकमंत्रिपदाचा विषय फडणवीस यांनी चाणाक्ष पद्धतीने हाताळला.

४) जिथे भाजपचा पालकमंत्री नाही तिथे संपर्कमंत्री, मित्रपक्षावर दबावाचे राजकारण

सरकार आणि संघटनेत समन्वयासाठी भारतीय जनता पक्षाकडून विशेष नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. भाजपचा पालकमंत्री नसलेल्या जिल्ह्यात संपर्कमंत्री काम करणार आहेत. पालकमंत्रिपदावरून महायुतीमध्ये तीव्र संघर्ष सुरू असताना संपर्कप्रमुख हे नवे पद भाजपने निर्माण केलेले आहे. संपर्कमंत्री नेमून अप्रत्यक्षपणे मित्रपक्षाच्या पालकमंत्र्यांवर धाक राहावा, यासाठी भाजपने मोठी चाल खेळल्याची चर्चा आहे.

५) मंत्र्यांचे पीए आणि ओएसडी फडणवीसच निवडणार

राज्य सरकारमधील प्रत्येक मंत्र्याकडे मुख्यमंत्र्यांच्या संमतीनेच स्वीय सहाय्यक विशेष कार्यकारी अधिकाऱ्याची नियुक्ती होईल, तो अधिकार मुख्यमंत्र्यांचा आहे, असा फडणवीस यांनी निक्षून सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या निर्णयावर महायुतीत मोठा गजहब झाला. परंतु मंत्रालयात फिक्सर अधिकारी असल्याचे सांगून आपण आपल्या निर्णयावर ठाम आहे, असे स्पष्ट करीत अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या मंत्र्यांना फडणवीस यांनी दणका दिला.

६) एकनाथ शिंदे यांना आपत्ती व्यवस्थापन समितीतून वगळलं, पडसाद उमटल्यानंतर पुन्हा समितीत

आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पुनर्रचनेच्या नऊ सदस्यीय समितीत अजित पवार यांची नियुक्ती करून देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांना डावलले होते. परंतु एकनाथ शिंदे यांची नाराजी आणि शिवसेना नेत्यांच्या तीव्र प्रतिक्रिया पाहून फडणवीस यांनी पुन्हा शिंदे यांची समितीत नियुक्ती केली.

७) शिंदेसेनेचे माजी मंत्री तानाजी सावंत यांना धक्का

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिंदे सरकारच्या काळात आरोग्य विभागासाठी घेतलेला निर्णय स्थगित केला. माजी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या काळात दिलेले ३,२०० कोटी रुपयांचे कंत्राट रद्द करण्यात आले. या निर्णयावरून शिंदे-फडणवीस यांच्यातील द्वंद्व पुन्हा समोर आले.

८) धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला

राष्ट्रवादीचे पक्षाध्यक्ष अजित पवार यांनी नैतिकतेचे धडे दिल्यावर तसेच राजीनामा मागून मागून विरोधकांच्या तोंडाला फेस आल्यावर आणि त्यांचा घसा कोरडा झाल्यावरही मंत्री धनंजय मुंडे यांनी गेंड्याची कातडी पांघरली होती. परंतु देशमुख हत्या प्रकरणात पोलिसांनी न्यायालयात दाखल केलेल्या दोषारोपपत्रातून मारेकऱ्यांनी सरपंचांना किती अमानुष पद्धतीने मारले, यासंबंधीची छायाचित्रे समोर आल्यानंतर आणि मित्रपक्षांतूनही राजीनाम्यासाठी दबाव वाढल्यानंतर अखेर नैतिकता खुंटीला टांगलेल्या धनंजय मुंडे यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. त्यांच्या राजीनाम्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस पहिल्यापासूनच आग्रही होते. मात्र पक्षांतर्गत दबाव आल्यानंतरही राजीनामा देत नसल्याचे पाहून बरोबर अधिवेशनाच्या प्रारंभी मारेकऱ्यांचे फोटो समोर आणून 'करेक्ट टायमिंग'ने धनंजय मुंडे यांना भाग पाडल्याचे बोलले जाते. माणिकराव कोकाटे यांच्यावरही राजीनाम्याची टांगती तलवार आहे.

९) अजित पवार यांच्यावरही वेळोवेळी दबाव

देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीवरही दबाव राहील, याची खबरदारी घेतली आहे. कारण अजित पवार यांच्या पक्षाची ओळख धर्मनिरपेक्ष अशी आहे. मात्र नितेश राणे यांच्या माध्यमातून हिंदुत्ववादी विचारांना बळ देऊन, राज्यात त्यांच्या सभा घेऊन अजित पवार यांना अडचणीत आणण्याचे काम फडणवीस सातत्याने करीत आहेत. अजित पवार सरकारमध्ये असले तरी 'तोंड ताबून बुक्कांचा मार' दिल्याप्रमाणे 'सांगता येईना आणि बोलता येईना' अशी त्यांची विचारसरणीच्या मुद्द्यावरून अवस्था झाली आहे

# भास्कर जाधवांकडे विरोधी पक्षनेते पद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नोव्हेंबर महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत विरोधी पक्षांच्या महाविकास आघाडीचा धुव्वा उडाला होता. तसेच एकाही पक्षा विरोधी पक्षनेतेपदासाठी आवश्यक असणाऱ्या २८ जागांचा टप्पाही ओलांडता न आल्याने गेल्या तीन-चार महिन्यांपासून विरोधी पक्षनेत्याची निवड होऊ शकली नव्हती. दरम्यान, सध्या सुरू असलेल्या विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान विधानसभेतील विरोधी पक्षनेत्याची



निवड निश्चित झाली असून, शिवसेना ठाकरे गटाकडून ज्येष्ठ नेते भास्कर जाधव यांच्या नावावर विरोधी पक्षनेतेपदासाठी शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. तसेच त्यांच्या नावाची शिफारस पुढे करण्यात आली आहे

# अबू आझमी नरमले, केलेलं वक्तव्य मागे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** समाजवादी पक्षाचे नेते आणि आमदार अबू आझमी यांनी मुघल शासक औरंगजेबाबाबत केलेल्या एका वक्तव्यामुळं राजकीय वातावरण तापलं आहे. सोमवारी (दि. ३) अबू आझमी यांनी "औरंगजेब हा क्रूर प्रशासक नव्हता" असं वक्तव्य केलं होतं. त्यांच्या या वक्तव्यानंतर अनेकांनी टीकेची झोड उठवली होती. तसंच, आज त्यांच्या या वक्तव्याचे पडसाद अर्थसंकल्पीय अधिवेशनात उमटले. अधिवेशनादरम्यान सत्ताधारी आमदारांनी अबू आझमी यांच्या विधानावरून सभागृहात गोंधळ घातला. परिणामी, विधीमंडळाचं आजचं कामकाज तहकूब करण्यात आलं.

दरम्यान, अबू आझमी यांनी आज विधानसभेत सत्ताधारी आमदारांनी व्यक्त केलेल्या संतप्त प्रतिक्रिया पाहून मवाळ भूमिका घेत आपलं वक्तव्य मागे घेतलं आहे. ते म्हणाले, " मी कोणतेही आक्षेपार्ह वक्तव्य केलेलं नाही, माझ्या वक्तव्याचा विपर्यास करण्यात आला. माझ्या वक्तव्यामुळं अर्थसंकल्पीय अधिवेशन बंद पाडल्यानं जनतेचं नुकसान होत आहे. इतिहासकार व लेखकांनी औरंगजेबाबद्दल जे सांगितलं आहे, तेच मी बोललो आहे."

अबु आझमी म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज किंवा अन्य कोणत्याही महापुरुषांबद्दल मी अवमानकारक बोललेलो नाही. मात्र, तरीही माझ्या वक्तव्यामुळं कुणाच्या भावना दुखावल्या असतील तर मी माझे शब्द, वक्तव्य मागे घेतो, असं आमदार आझमी यांनी स्पष्ट केलं आहे. याशिवाय, "माझ्या वक्तव्याला विनाकारण राजकीय मुद्दा बनवला जात असून त्यामुळं महाराष्ट्र

# बांगलादेशाकडून सीमेवर ड्रोन तैनात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ढाका :** बांगलादेशची पाकिस्तानी लष्कर आणि सरकारशी वाढती जवळीक पाहता तुर्कस्तानबरोबरचे संबंधही सुधारले आहेत. शेख हसीना सत्तेतून हकालपट्टी झाल्यापासून बांगलादेशचे अंतरिम सरकार इस्लामी देशांशी मैत्रीपूर्ण आहे. आता त्याने इस्लामिक देश तुर्कस्तानकडून टीबी-२ बायराक्टार ड्रोन खरेदी केले असून ते भारताच्या सीमेवर तैनात केले आहेत. हे ड्रोन दीर्घकाळ आकाशात उडण्यास सक्षम आहे. याच पिढीचे ड्रोनही पाकिस्तानने तुर्कस्तानकडून खरेदी केले आहेत. तुर्कस्तानशी पाकिस्तानचे दीर्घ काळापासून चांगले संबंध आहेत. काश्मीरच्या बाबतीतही तुर्कस्तानने



पाकिस्तानच्या डावपेचांवर अनेकदा संयुक्त राष्ट्रांच्या व्यासपीठावरून आक्षेपार्ह भाष्य केले होते.

आता बांगलादेशनेही ते सोबत घेऊन शस्त्रे खरेदी करून भारताच्या सीमेवर तैनात केली आहेत. भारतीय सुरक्षा दल या ड्रोनवर लक्ष ठेवून आहेत. गेल्या काही दिवसांत हे ड्रोन सीमेपलीकडे उडले आहेत, अशी माहिती संरक्षण सूत्रांनी दिली. आतापर्यंत हे ड्रोन बांगलादेश सीमेवर उडताना आढळले आहेत. संरक्षण सूत्रांनी सांगितले की, भारतीय सुरक्षा दलांनी सीमेवर रडार लावले आहेत जेणेकरून अशा उपकरणांवर लक्ष ठेवता येईल. अनेकदा बांगलादेशचे हे ड्रोन २० तास आकाशात उडले आहेत.

मोहम्मद युनूस यांच्या अंतरिम सरकारने भारताच्या सीमेपर्यंत पाकिस्तानी अधिकाऱ्यांना भेटी दिल्या आहेत, ही देखील भारतासाठी चिंतेची बाब आहे. यामध्ये आयएसआयशी संबंधित लोकांचा समावेश आहे. अशा परिस्थितीत बांगलादेशची कारवाई ही भारतासाठी चिंतेची बाब असून त्यावर लक्ष ठेवण्याची गरज आहे. आता बांगलादेशने जे ड्रोन विकत घेतले आहेत. मध्यम उंचीवर दीर्घ काळ उड्डाण करू शकणारे हे ड्रोन आहे. एकदा चार्ज केल्यानंतर हे ड्रोन सुमारे २७ तास सलग उड्डाण करू शकते. इतकंच नाही तर हे विमान जवळपास ८२३० मीटर उंचीपर्यंत उड्डाण करू शकतं. हे ड्रोन इतर देशांची लढाऊ विमाने आकाशात टाकू शकते, असे संरक्षण तज्ज्ञांचे मत आहे.

# नितीश कुमारांनी तेजस्वीला सुनावले



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पाटणा :** विधानसभा निवडणुकीला काही महिन्यांचा कालावधी असला तरी बिहारमधील राजकीय आरोप-प्रत्यारोप, दावे-प्रतिदाव्यांची स्पर्धा सुरु झाली आहे. आज (दि.४) बिहार विधानसभेत मुख्यमंत्री नितीश कुमार आणि त्यांचे माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांच्यात जोरदार वाद झाला.

त्याचं झालं असे की, आज बिहार विधानसभेत नितीश कुमार एनडीए सरकारने केलेल्या विकासकामांबद्दल बोलण्यासाठी उभे राहिले. यावेळी तेजस्वी यादव यांनी यांनी त्यांचे भाषण थांबवले. विधानसभेत सुरुवातीलाच तेजस्वी यादव यांनी त्यांचे वडील आणि माजी मुख्यमंत्री लालू प्रसाद यांच्या नेतृत्वाखालील मागील बिहार सरकारची तुलना केली. तसेच नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील सरकारवर टीका केली.

यानंतर विरोधकांच्या प्रचंड गदारोळात बोलताना नितीश कुमार म्हणाले, "बिहारमध्ये आधी काय होते? मी तुमचे (तेजस्वी यादव) वडिलांना घडवलं आहे. तुमच्या जातीचे लोकही मला विचारत होते की मी हे का करत आहे, पण तरीही मी त्यांना पाठिंबा दिला. तुम्हाला काहीच माहिती नाही," असेही नितीशकुमार म्हणाले.


# भारताला सज्ज रहावेच लागेल -राजनाथसिंह

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारताला नव्या प्रकारच्या युद्धासाठी स्वतःला तयार करावे लागेल, कारण शत्रूंना आता केवळ पारंपारिक शस्त्रांपासूनच नव्हे तर हायब्रीड वॉरफेअर, सायबर हल्ले आणि अंतराळआधारित हेरगिरीसारख्या प्रगत तंत्रज्ञानापासूनही धोका निर्माण होऊ शकतो, असे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी मंगळवारी सांगितले.

अंतर्गत सुरक्षा आणि आपत्ती निवारण कार्यासाठी प्रगत तंत्रज्ञानावरील परिषद आणि प्रदर्शनात संरक्षणमंत्री बोलत होते. गृह मंत्रालय आणि संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (डीआरडीओ) यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांना (सीएपीएफ) उदयोन्मुख धोक्यांचा सामना करण्यास सक्षम करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाने सुसज्ज करणे हा दोन दिवसीय कार्यक्रमाचा उद्देश आहे.

ते म्हणाले की, अशा उदयोन्मुख धोक्यांमुळे देशाच्या सामरिक आणि आर्थिक स्थैर्याला आव्हान निर्माण होऊ शकते, असे ते म्हणाले. आजचे शत्रू नेहमीच पारंपरिक शस्त्रे घेऊन येत नाहीत. सायबर हल्ले, चुकीची माहिती देणारी मोहीम, अंतराळआधारित हेरगिरी असे



नवे धोके समोर येत असून त्यांचा मुकाबला करण्यासाठी आपल्याला आधुनिक उपायांचा अवलंब करावा लागणार आहे, असे ते म्हणाले. राजनाथ सिंह म्हणाले की, आधुनिक जगात सुरक्षेची आव्हाने झपाट्याने बदलत आहेत आणि अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेतील रेषा धूसर होत आहेत. आपल्या संस्थांनी आपल्या वेगवेगळ्या कार्यशैली बाजूला ठेवून सहकार्य वाढविणे आवश्यक आहे.

पान १ वरून

## फडणवीसांच्या दबावानंतर निर्णय

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे प्रारंभीपासून धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, यासाठी आग्रही होते. यापूर्वी तीन ते चार वेळा त्यांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याविषयी अजित पवार यांच्याशी चर्चा केली होती. स्वत: धनंजय मुंडे यांनाही समजावून सांगितले होते. पण, धनंजय मुंडे ऐकायला तयार नव्हते. शेवटी एका क्षणी देवेंद्र फडणवीस यांनी अशी भूमिका घेतली की, जर तुम्ही राजीनामा देणार नसाल, तर मला राज्यपालांना पत्र लिहून तुम्हाला मंत्रिमंडळातून काढण्याची कारवाई करावी लागेल. या इशाऱ्यानंतर वातावरण बदलले.

काल पुन्हा धनंजय मुंडे यांना उद्याच्या उद्या राजीनामा द्या, असे मुख्यमंत्र्यांनी त्यांना सांगितले आणि आज सकाळी मुंडेंचा राजीनामा मुख्यमंत्र्यांच्या हाती आला. प्रारंभीपासूनच या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी अतिशय कडक आणि ठोस भूमिका घेतली होती, अशी सूत्रांची माहिती आहे. म्हणूनच एकदा धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यावर अजित पवारांनी भूमिका स्पष्ट करावी, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे माध्यमांशी बोलताना अनेकदा म्हणत होते.

## स्थानिक स्वराज्य संस्था..

केलेल्या विचारणेसंदर्भात दोन्ही बाजू न्यायालयाला समाधानकारक उत्तर देऊ शकल्या नाहीत. दोन्ही बाजूंची भूमिका होती की, आम्हाला निवडणुका पाहिजेत. मात्र, त्यात काहीसा गोंधळ होता. त्यावर न्यायालयाने संताप व्यक्त केला आणि या संदर्भातील सर्व कागदपत्रे मागवली. हे प्रकरण आता पुढच्या सुनावणीत ऐकले जाईल. त्यामुळे हे प्रकरण पुन्हा एकदा लांबणीवर पडले आहे.

## छायाचित्रांचा दबाव

व्हावे लागले आहे. मारेकऱ्यांनी गाठलेल्या क्रौर्याची सीमा सगळ्या महाराष्ट्राने पाहिल्यानंतर कुणाचेही रक्त खवळेल. हेच सगळे फोटो पाहून सत्तापक्षातील नेते आणि विरोधकही अस्वस्थ होते. त्यामुळे सगळीकडूनच धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यासाठी दबाव होता. युतीतील मित्रपक्षांनीही राजीनाम्याचा सूर लावल्याने धनंजय मुंडे यांच्यापुढे कोणताही पर्याय उरला नव्हता. निकटवर्तीय वाल्मिक कराडनेच खंडणी आणि हत्येचे षडयंत्र रचल्याचे पोलीस चौकशीत निश्चित झाल्यावर धनंजय मुंडे यांना अखेर मंत्रिपदाची खुर्ची सोडावी लागली.

देशमुख यांच्या मारेकऱ्यांचे फोटो आणि त्यांची क्रूरता राज्यासमोर आल्यानंतर सगळीकडे संतापाची लाट होती. याच पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची देवगिरी या शासकीय बंगल्यावर जाऊन भेट घेतली. उभय नेत्यांमध्ये जवळपास सव्वा तास चर्चा झाली. मिळालेल्या माहितीनुसार फडणवीस हे ८ वाजून ५० मिनिटांनी देवगिरी बंगल्यावर दाखल झाले. त्या ठिकाणी आधीच राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि धनंजय मुंडे होते. जवळपास सव्वा-दीड तासाच्या चर्चेनंतर फडणवीस १० वाजून २० मिनिटांनी देवगिरी बंगल्यावरून बाहेर आले. या बैठकीत धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावरच चर्चा झाली. याच बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांचा दबाव आणि नैतिकता म्हणून आता धनंजय मुंडे यांना राजीनामा द्यावाच लागेल, अशी स्पष्ट भूमिका मांडली आणि मुख्यमंत्री म्हणून आपण निर्णय घेणार असल्याचे सांगितले. सरशेवटी जड अंत:करणाने मुंडे राजीनाम्याच्या निर्णयाप्रत यावे लागले.

## अडीच महिने कुठे होती नैतिकता

नसल्याचे काँग्रेस नेते आणि आमदार नाना पटोले यांनी म्हटलं आहे.

राज्यात एकीकडे संतोष देशमुख हत्याप्रकरणावरुन संताप व्यक्त होत असताना दुसरीकडे महापुरुषांचा अपमान करण्यात येत असल्यावरूनही विरोधक आक्रमक झाले आहेत. समाजवादी पक्षाचे नेते आमदार अबू आझमी यांनी औरंगजेबावर स्तुतीसुमने उधळली होती, औरंगजेब हा उत्तम प्रशासक असल्याचे आझमी यांनी म्हटले होते. तर, प्रशांत कोरटकर यांनी इतिहासकार इंद्रजीत सावंत यांना फोन करुन धमकी देत शिवाजी महाराज व संभाजी महाराजांबद्दल अर्वाच्य भाषा वापरल्यानेही सर्वत्र संताप व्यक्त होत आहे. त्यामुळे, अधिवेशनाच्या पहिल्याच दिवसापासून विरोधकांनी सरकारला याच मुद्द्यावरुन लक्ष्य केलं आहे.

धनंजय मुंडेंचा राजीनामा लपवता यावा, विरोधकांकडून विचारणा होऊ नये म्हणून आजचं कामकाज बंद पाडण्यात आलं, या सरकारचा निषेध केला पाहिजे. एकीकडे शेतकरी चिंतेत आहे, पीकाला भाव मिळत नाही. सध्या शेतकरी उपाशी आणि सरकार तुपाशी अशी परिस्थिती आहे. आझाद मैदानावर एवढे मोर्चे येत आहेत, सरकारला त्याची काळजी नाही. राज्यात आज जे काही संतापजनक सुरू आहे, पण सरकारने विधानसभा बंद पाडली, आजचा दिवस हा काळा दिवस असल्याचे नाना पटोले यांनी म्हटले.

## पक्षनेतेपदासाठी कोणताही फॉर्म्युला ...

यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं असून तशा आशयाचं पत्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांना देण्यात आलं आहे. त्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते. आम्ही विधानसभा अध्यक्षांकडे विरोधी पक्षनेते पदासाठी भास्करराव जाधव यांच्या नावाची मागणी केलेली आहे. आम्हाला खात्री आहे ही लोकशाही मूल्यांचा पालन करून लवकरात लवकर यावर निर्णय होईल. बजेटपूर्वी विरोधी पक्ष नेतेपद दिले जाईल, असे ते म्हणाले.

## अलकांपुरीत रेल्वेचा कोचिंग डेपो!

दुरुस्ती केली जात आहे. या ठिकाणीही वंदे भारत एक्स्प्रेसच्या डब्यांची दुरुस्ती करण्यासाठी नव्याने डेपो तयार करण्यात येत आहे. रेल्वे डब्यांच्या दुरुस्तीची संख्या वाढल्याने याचा फायदा प्रवाशांना होणार आहे. पुणे रेल्वे स्थानकातील गाड्यांचे नियोजन सुरळीत करून प्रवाशांना डब्यांमध्ये देण्यात येणाऱ्या सुविधांचा सहज लाभ घेता यावा, म्हणून स्वतंत्र 'कोचिंग डेपो' सुरू करण्याबाबत नियोजन होते. त्यानुसार आळंदी येथील जागेबाबत रेल्वे बोर्डाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. या प्रस्तावाला मान्यता मिळाली आहे.

# सरकारवर विरोधकांचा हल्लाबोल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येची छायाचित्रं समोर आली. त्यामध्ये क्रूरतेचा कळस गाठला गेला आहे. ही घटना माणुसकीला काळीमा फासणारी आहे. राज्यभरात या छायाचित्रांमुळे आक्रोश होत आहे. ही छायाचित्रं आणि व्हिडिओ सरकारकडं, पोलिसांकडं असतानाही सरकारनं धनंजय मुंडे यांना सातत्यानं वाचवण्याचा प्रयत्न केला. यामुळे राज्याची मान शरमेनं खाली गेली आहे. याप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पदावर राहण्याचा नैतिक अधिकार गमावला आहे. त्यामुळे त्यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. तर माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही सरकारवर तोफ डागली.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, इतक्या उशिरानं केवळ धनंजय मुंडेंचा राजीनामा घेतला, म्हणून सरकार आपलं कौतुक करुन घेऊ शकत नाही. इतकी भयानक परिस्थिती असताना मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी त्यांना वेळीच बडतर्फ करण्याची गरज होती, असं मत सपकाळ यांनी व्यक्त केलं.

या अमानुष प्रकरणातील सर्व फोटो, व्हिडिओ, पुरावे पोलिसांकडं आणि पर्यायानं गृहमंत्री, सरकारकडं सुरुवातीपासून होते. या प्रकरणाची पूर्ण माहिती असतानाही राज्य सरकारनं धनजंय मुंडेंना वाचवण्याचा पूर्णपणे प्रयत्न केला. याचाच अर्थ सरकारचा याला पाठिंबा होता. त्यांना हे हत्या प्रकरण दाबायचं होतं, असा आरोप सपकाळ यांनी केला. या प्रकरणी देशमुख कुटुंबीयांनी सातत्यानं लढा दिला, त्याला राज्यातील नागरिकांनी आणि प्रसार माध्यमांनी दिलेल्या साथीमुळे या प्रकरणातील सत्य उजेडात आलं. अन्यथा सरकार हे प्रकरण दडपण्यात यशस्वी झालं असतं. मुंडेंनी राजीनामा द्यावा, अशी भूमिका मुख्यमंत्र्यांची होती, असं पसरवण्याचा आता प्रयत्न केला जात आहे. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आता कितीही आदर्शवादी भूमिका घेण्याचा प्रयत्न केला, तरी त्यांची भूमिका समोर आली आहे. त्यामुळे त्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

## योगी आदित्यनाथ यांनी ठणकावून सांगितले

# आमचे आहे ते आम्हाला मिळालेच पाहिजे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लखनौ :** उत्तर प्रदेश विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी कायदा आणि सुव्यवस्थेपासून विकासकामांची सविस्तर माहिती दिली. यावेळी समाजवादी पक्षावर जोरदार हल्ला करण्यात आला. समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांचे काका शिवपाल यादव यांना पुन्हा एकदा 'चाचू' म्हणत टोला लगावला आहे. संभलचा उल्लेख करताना सीएम योगी म्हणाले की, जे आमचे आहे ते आम्हाला



मिळाले पाहिजे. दुसरं काही नाही. सीएम योगी म्हणाले की, एका उपद्रवाखाली संभलच्या ६८ तीर्थक्षेत्रे आणि १९ विहिरींचे चिन्ह पुसण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याला शोधून काढणं हे आमचं काम होतं. आम्ही ५४ मंदिरांचा शोध घेतला आणि १९ विहिरीही सापडल्या.

सीएम योगी म्हणाले की, ६६ कोटी लोक महाकुंभात पोहोचले पण एकही गुन्हेगारी घटना घडली नाही. महाकुंभात आलेले लोक भारावून गेले. सर्वजण सुखरूप घरी परतले आहेत. महाकुंभात दरोडा, विनयभंग, बलात्कार किंवा खुनाची एकही घटना घडलेली नाही.

समाजवादी पक्षावर निशाणा साधताना मुख्यमंत्री म्हणाले की, समाजवादी पक्ष डॉ. राममनोहर लोहिया यांना आदर्श मानत असला तरी त्यांनी दाखविलेल्या मार्गाचे अनुसरण करत नाही. सपा लोहियांच्या आदर्शांपासून दूर गेली आहे. राम, कृष्ण आणि शंकर हे भारताचे आदर्श आहेत, पण सपाचा या तिन्ही देवांवर विश्वास नाही. पोटनिवडणुकीचा संदर्भ देत त्यांनी सपा नेते शिवपाल सिंह यादव यांच्यावर निशाणा साधला. निवडणूक कशी जिंकायची हे चाचूपेक्षा चांगले कुणाला ठाऊक? मुख्यमंत्री म्हणाले की, महाकुंभात भारताच्या विकासाचा आणि वारशाचा ठसा उमटला. महाकुंभात जात, धर्म, प्रांत असा भेदभाव करण्यात आला नाही. सीएम योगी यांनी विधानसभेत महाकुंभाच्या आर्थिक फायद्यांविषयी सांगितले.

#रा

# हिंदी, मराठी, इंग्रजीला सर्वाधिक पसंती!

## त्रिभाषा सूत्राला दक्षिणेतील राज्यांचा विरोध कायम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** देशात हिंदी, मराठी आणि इंग्रजी भाषेला सर्वाधिक पसंती आहे. या तिन्ही भाषा बोलणा-यांची संख्या १ कोटीपेक्षा जास्त आहे. १९६८ मध्ये इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील सरकारने राष्ट्रीय शिक्षण धोरणात त्रिभाषा सूत्र सादर केले होते. परंतु या धोरणाला काही राज्यांनी विरोध केला. अजूनही या मुद्यावरून दक्षिणेतील राज्य विशेषत: तामिळनाडूने विरोध केलेला आहे. परंतु ख-या अर्थाने हिंदी, मराठी आणि इंग्रजी या तिन्ही भाषेला देशात सर्वाधिक पसंती असल्याचे समोर आलेले आहे.



२०११ च्या जनगणनेत त्रिभाषिकांमध्ये मराठी-हिंदी-इंग्रजी हे सर्वात सामान्य मिश्रण होते. जे १.०१ कोटी आहे. त्यानंतर पंजाबी-हिंदी-इंग्रजी ७७.९९ लाख, गुजराती-हिंदी-इंग्रजी ६६.३२ लाख, तेलुगू-इंग्रजी-हिंदी २५.०४ लाख आणि मल्याळम-इंग्रजी-हिंदी २४.७६ लाख आहे. १० सर्वांत सामान्य त्रिभाषिक मिश्रणांपैकी प्रत्येकांमध्ये हिंदी आणि इंग्रजी आहे.

हिंदीचा समावेश नसलेले सर्वात जास्त बोलले जाणारे त्रिभाषिक मिश्रण काश्मिरी-उर्दू-इंग्रजी आहे जे ६४.७९ लाख आहे तर हिंदी आणि इंग्रजी वगळता सर्वांत सामान्य मिश्रण तेलुगू-कन्नड-तमिळ आहे, जे १.६ लाख आहे.

१९६८ मध्ये इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील सरकारने तयार केलेल्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात त्रिभाषा सूत्र सादर केले होते. हिंदी-इंग्रजीवर आधारित या धोरणात हिंदी भाषिक राज्यांमध्ये दक्षिणेकडील भाषा आणि हिंदी नसलेल्या राज्यांमध्ये प्रादेशिक भाषा ही तिसरी भाषा म्हणून शिकवण्याची तरतूद होती. तेव्हापासून त्रिभाषा सूत्र हा वादाचा मुद्दा ठरला. १९६८ मध्ये तामिळनाडूने या धोरणाला विरोध केला. आजही तामिळनाडू द्विभाषिक सूत्रावर कायम आहे.

सध्या, द्रमुकच्या नेतृत्वाखालील तामिळनाडू सरकारचा भाजपाशासित केंद्र सरकारशी राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० वरून वाद सुरू आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरण लागू करेपर्यंत आणि त्रिभाषिक नियम स्वीकारेपर्यंत शालेय शिक्षणासाठी समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत केंद्र सरकार निधी देणार नाही, असे म्हटले. त्यानंतर तामिळनाडू आणि केंद्र सरकार यांच्यातील वादाला सुरुवात झाली. त्यावर मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी हे सूत्र केवळ हिंदी लादण्याचे एक स्वरूप आहे, असा आरोप केला.



### केवळ ८ राज्यांतच २ पेक्षा जास्त भाषा

● भारतात भाषिक विविधता असूनही केवळ आठ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील लोकांनाच दोनपेक्षा जास्त भाषा बोलता येतात. २०११ च्या जनगणनेनुसार राष्ट्रीय पातळीवर लोकसंख्येच्या २६.०२% संख्या द्विभाषिक आहे आणि ७.१% लोक त्रिभाषिक आहेत. २००१ च्या जनगणनेत द्विभाषिक लोकसंख्या २४.७९% वरून वाढली होती तर त्रिभाषिक भाषिकांचा वाटा ८.५१% वरून घसरला आहे.

### बहुभाषिकतेमध्ये गोवा राज्य अव्वल

● बहुभाषिकतेमध्ये सर्वोत्तम कामगिरी करणारे राज्य गोवा आहे. गोव्यातील ७७.२१% लोकसंख्या द्विभाषिक आहे आणि ५०.८२% लोकसंख्या त्रिभाषिक आहे. गोवा हे एकमेव राज्य आहे जिथे त्रिभाषिकता ५०% पेक्षा जास्त आहे, त्यानंतर चंदीगड ३०.५१% आणि अरुणाचल प्रदेश ३०.२५% आहे.

# माधवी पुरी बुच यांना दिलासा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

मुंबई : सेबीच्या माजी प्रमुख माधवी पुरी बुच यांना मुंबई उच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. सेबीच्या माजी अध्यक्षा माधवी पुरी बुच आणि इतरांविरुद्ध शेअर बाजारातील फसवणुकीप्रकरणी एफआयआर नोंदवण्याच्या विशेष न्यायालयाच्या आदेशाला मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिली.

मुंबईच्या एसीबी कोर्टाने सेबीच्या माजी प्रमुख माधबी पुरी बुच आणि इतर ५ जणांविरुद्ध स्टॉक मार्केट फसवणूक आणि नियामक उल्लंघन केल्याप्रकरणी एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले होते. या आदेशाला आव्हान देण्यासाठी बुच व इतरांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. या प्रकरणावर मंगळवारी (४ मार्च) सुनावणी झाली.

३ मार्च रोजी माधवी पुरी बुच, सर्वकालीन सदस्य अश्विनी भाटिया, अनंत नारायण, कमलेश चंद्र वार्शने, बीएसईचे सीईओ सुंदररामन राममूर्ती आणि माजी अध्यक्ष प्रमोद अग्रवाल यांनी त्यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्याच्या एसीबी न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देत उच्च न्यायालयात धाव घेतली होती. यावेळी कोर्टाने या प्रकरणाची सुनावणी होईपर्यंत एफआयआर दाखल करू नका, असे सांगितले होते. याप्रकरणी मंगळवारी सुनावणी झाली. एफआयआर नोंदवण्याच्या विशेष न्यायालयाच्या आदेशाला मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिली.

रविवारी मुंबईच्या एसीबी कोर्टाने माधबी पुरी बुच, सर्वकालीन सदस्य अश्विनी भाटिया, अनंत नारायण, कमलेश चंद्र वार्शने, बीएसईचे सीईओ सुंदररामन राममूर्ती आणि माजी अध्यक्ष प्रमोद अग्रवाल यांच्या विरोधात एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले होते. विशेष न्यायालयाने कथित स्टॉक मार्केट फसवणूक आणि नियामक उल्लंघन केल्याप्रकरणी पाचही लोकांविरुद्ध एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले. विशेष एसीबी न्यायालयाचे

# ३,५५८ कोटीचा काऊड पार्टीकल घोटाळा

## 'ईडी'कडून दोघांना अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर ईडीने ३,५५८ कोटी रूपयांच्या कथित घोटाळ्याचा मास्टरमाइंड सुखविंदर सिंग खरूर आणि डिंपल खरूर यांना अटक केली आहे. हे दोघेही देश सोडून पळून जाण्याचा प्रयत्न करत होते परंतु लुक आऊट नोटिशीमुळे एअरपोर्टवरच दोघांना रोखण्यात आले. व्यूनाऊ मार्केटिंग सर्व्हिसेज लिमिटेड आणि त्याच्याशी निगडीत कंपन्यांविरोधात मनी लॉन्ड्रिंग अंतर्गत तपास सुरू आहे. त्यातूनच ही कारवाई करण्यात आली.

ईडीने सुखविंदर आणि डिंपलला अटक केल्यानंतर जालंधरच्या कोर्टात हजर केले. त्यानंतर कोर्टाने दोघांना ईडीची कोठडी सुनावली आहे. हा घोटाळा 'क्लाऊड पार्टीकल स्कॅम' नावाने ओळखला जातो. ज्यात गुंतवणूकदारांना खोटी प्रलोभने देत त्यांना सेल अँन्ड लीज बँक मॉडेलच्या माध्यमातून फसवण्यात आले. उत्तर प्रदेशातील गौतमबुद्ध नगरमध्ये पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्याची प्राथमिक चौकशी करताना हा प्रकार समोर आला. त्यानंतर ईडीने यावर कारवाई करत तपासात व्यूनाऊ ग्रुपचे सीईओ सुखविंदर सिंग खरूर आणि त्याच्या सहका-यांनी मिळून



हा घोटाळा केल्याचे उघड झाले.

ईडीच्या माहितीनुसार, क्लाउड पार्टिकल टेक्नोलॉजीच्या नावाखाली गुंतवणूकदारांकडून मोठी रक्कम घेण्यात आली परंतु त्यांचा खरा व्यापार तो नव्हताच. गुंतवणूकदारांना मोठी स्वप्ने दाखवून त्यांची फसवणूक करण्यात आली. या बनावट गुंतवणूक योजनेत जवळपास ३,५५८ कोटी रूपये हडप करण्यात आल्याचा आरोप आहे. घोटाळ्यातून मिळालेला पैसा कमिशन, महागड्या कार, सोने, हिरे, शेल कंपन्यात वापरण्यात आला.

# पाकिस्तानी म्हणणे गुन्हा ठरत नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** "एखाद्याला 'मियाँ-तियाँ' किंवा 'पाकिस्तानी' म्हणणे चुकीचे असले तरी भारतीय दंड संहितेच्या (आयपीसी) कलम २९८ अंतर्गत धार्मिक भावना दुखावण्याच्या गुन्ह्यात मोडत नाही," असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणातील संशयित, ८० वर्षीय हरि नारायण सिंह यांची निर्दोष मुक्तता केली.

### काय म्हणाले सर्वोच्च न्यायालय?

● संबंधित याचिकेवर न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्न आणि न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. ११ फेब्रुवारी दिलेल्या निकालात खंडपीठाने म्हटलं आहे की, "एखाद्याला 'मियाँ-तियाँ' किंवा 'पाकिस्तानी' म्हणणे निःसंशयपणे चुकीचे आहे; पण या प्रकरणात याचा चुकीचा अर्थ लावला गेला आहे. या टिप्पण्या चुकीच्या होत्या; परंतु हे प्रकरण भारतीय दंड संहितेच्या (आयपीसी) कलम २९८ अंतर्गत धार्मिक भावना दुखावण्याच्या गुन्ह्यात मोडत नाही, असे स्पष्ट करत खंडपीठाने हरि नारायण सिंह यांच्यावरील धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणाचा खटला फेटाळला.

झारखंडमधील बोकारो येथील चास येथील उपविभागीय कार्यालयात उर्दू भाषांतरकार आणि कार्यवाहक लिपिक (माहितीचा अधिकार) मोहम्मद शमीमुद्दीन यांनी या प्रकरणी फिर्याद दिली होती. त्यांनी आरोप केला होता की, माहिती अधिकार अर्जासंदर्भात माहिती देण्यासाठी ते अपीलकतेर्ते ८० वर्षीय हरि नारायण सिंह यांच्याकडे गेले होते.

यावेळीहरिनारायणसिंहयांनीत्यांना 'मियाँ-तियाँ' आणि पाकिस्तानी असे संबोधले. शमीमुद्दीन यांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे हरि नारायण सिंह यांविरुद्ध कलम २९८ (धार्मिक भावना दुखावणे), ५०४ (जाणीवपूर्वक अपमान आणि शांतता भंग), ५०६ (गुन्हेगारी कट रचणे), ३५३ (सरकारी सेवकाशी गैरवर्तन) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होती.

पोलिसांनी हरि नारायण सिंह यांच्यावर आरोपपत्र दाखल केले. जुलै २०२१ मध्ये, दंडाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची दखल घेत संशयित आरोपीवर समन्स जारी केले. हरि नारायण सिंह यांनी अतिरिक्त सत्र न्यायाधीश आणि त्यानंतर उच्च न्यायालयात अपील दाखल केले. मात्र दिलासा

# दिल्लीतील सात हजार खड्डे बुजवणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : सार्वजनिक बांधकाम विभागाने (पीडब्ल्यूडी) राजधानीदिल्लीतील रस्त्यांवरील सात हजार खड्डे बुजविण्यासाठी ३० एप्रिलपर्यंतची मुदत दिली आहे. पीडब्ल्यूडीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना जारी करण्यात आलेल्या या निर्देशात मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली २१ फेब्रुवारी रोजी दिल्ली मंत्रिमंडळासमोर सादरीकरण करण्यात आले आहे.

या सादरीकरणात विविध निविदा मागवून काम सुरू करण्यासाठी ठराविक कालमर्यादा निश्चित करण्यात आल्या होत्या. त्यामुळे या कालमर्यादेचे पालन करण्याचे निर्देश सर्व संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.





**ऑस्कर**
**लॉस एंजेलिस**
दिग्दर्शक शॉन बेकर यांनी "अनोरा" साठी सर्वोत्कृष्ट चित्रपट, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकासह एकूण चार ऑस्कर पुरस्कार पटकावले.

# पीएम मोदींच्या हस्ते वन्यजीव केंद्राचे उद्घाटन




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातमधील वंतारा येथील वन्यजीव बचाव, पुनर्वसन आणि संवर्धन केंद्राचे आज जागतिक वन्यजीव दिनानिमित्त उद्घाटन केले. यावेळी पंतप्रधान मोदींनी सिंह आणि बिबट्याच्या पिल्लांना दूध पाजले आणि विविध घटनांमधून वाचवलेल्या अनेक प्राण्यांनाही भेट दिली.

वंतारामध्ये २००० हून अधिक प्रजाती आणि १.५ लाखांहून अधिक बचावलेले, अधिवास धोक्यात असलेले प्राणी राहतात. या काळात पंतप्रधानांनी अनेक सुविधांचा आढावाही घेतला. यादरम्यान, पंतप्रधान आशियाई सिंहाचे शावक, पांढरे सिंहाचे शावक, दुर्मिळ आणि धोक्यात असलेल्या हिम बिबट्याचे शावक, कॅराकल शावकांसह अनेक प्रजातींसोबत खेळताना दिसले.



मोदींनी ज्या पांढऱ्या सिंहाच्या पिल्लाला खूप प्रेमाने खायला दिले होते, तो याच केंद्रात जन्मला. त्याच्या आईला वाचवण्यात आले आणि उपचारासाठी 'वंतारा' येथे आणण्यात आले. एकेकाळी भारतात मुबलक प्रमाणात आढळणारे कॅराकल आता दुर्मिळ होत चालले आहेत. लोकसंख्या वाढवण्यासाठी आणि अखेर त्यांना जंगलात सोडण्यासाठी संवर्धन प्रजनन कार्यक्रमाचा भाग म्हणून वांतारा येथे कॅराकल पक्ष्यांना बंदिवासात प्रजनन केले जाते. आणि नंतर त्यांना जंगलात सोडले जाते.

### वन्यजीव रुग्णालयाला भेट

● पंतप्रधान नरेंद्र मोदींनी वन्यजीव बचाव, पुनर्वसन आणि संवर्धन केंद्रातील विविध सुविधांचा आढावा घेतला. पंतप्रधानांनी वांतारा येथील वन्यजीव रुग्णालयाला भेट दिली. याठिकाणी एमआरआय, सीटी स्कॅन, आयसीयू इत्यादींनी सुसज्ज असलेल्या पशुवैद्यकीय सुविधा पाहिल्या. तसेच येथे वन्यजीव भूल, हृदयरोग, नेफ्रोलॉजी, एंडोस्कोपी, दंतचिकित्सा, अंतर्गत औषध इत्यादींसह अनेक विभाग देखील आहेत.

## 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'चा मुलींना फायदा



**ईटानगर :** केंद्र सरकारच्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' योजनेमुळे अरुणाचल प्रदेशातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील मुलींमधील गळतीचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली आहे, असे महिला व बालविकास मंत्री दासंगलू पुल यांनी सांगितले. योजनेच्या दहाव्या वर्धापनदिनानिमित्त लोअर दिबांग खोऱ्यातील रोइंग येथे आयोजित 'बेटी जन्मोत्सव' कार्यक्रमात बोलताना त्या म्हणाल्या की, शाळा सोडण्याचे प्रमाण २०१९-२० मधील ३०.८९ टक्क्यांवरून २०२१-२२ मध्ये १२.५ टक्क्यांवर आले आहे. पुल म्हणाले की, लिंगगुणोत्तराच्या बाबतीतही राज्य चांगली कामगिरी करत असून २०२३-२४ मध्ये २५ पैकी १४ जिल्ह्यांमध्ये प्रति हजार पुरुषांमागे ९०० पेक्षा जास्त महिलांची नोंद झाली आहे.

## राजस्थानच्या बहुतांश भागात पारा घसरण्याची शक्यता

**जयपूर :** उत्तरेकडील जोरदार वाऱ्यांमुळे येत्या दोन दिवसांत राज्यातील बहुतांश भागात तापमानात चार अंश सेल्सिअसपर्यंत घट होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. पुढील आठवडाभर राज्यात कोणताही पश्चिमी विक्षोभ सक्रिय होण्याची शक्यता नाही आणि बहुतांश भागात हवामान कोरडे राहील, असे आयएमडीने म्हटले आहे. पुढील ४८ तासांत राज्याच्या बहुतांश भागात ताशी २० ते २५ किलोमीटर वेगाने उत्तरेकडे जोरदार वारे वाहतील. त्याच्या प्रभावामुळे कमाल आणि किमान तापमानात दोन ते चार अंश सेल्सिअसने घट होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

## जम्मू-काश्मीरमधील ३२ हजारांहून अधिक पदे रिक्त

**जम्मू :** जम्मू-काश्मीर सरकारच्या ३७ विभागांमध्ये ३२ हजारांहून अधिक पदे रिक्त असून आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षण विभागात सर्वाधिक ७,८५१ पदे रिक्त आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी मंगळवारी दिली. गेल्या वर्षी १६ ऑक्टोबर रोजी सरकार स्थापन झाल्यापासून जेकेएस सेवा निवड मंडळ (जेकेएसएसबी) आणि जेकेपीएससी यांना ३,७२७ रिक्त पदे भरण्याची जबाबदारी देण्यात आली आहे, असे त्यांनी विधानसभेत सांगितले. पीपल्स कॉन्फरन्सचे आमदार सज्जाद गनी लोन यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सामान्य प्रशासन विभागाचे प्रभारी मुख्यमंत्री अब्दुल्ला यांनी ही माहिती दिली.

## एटीएम लुटणाऱ्या टोळीचा पर्दाफाश



**भुवनेश्वर :** आंतरराज्य एटीएम लुटणाऱ्या टोळीचा ओडिशा पोलिसांनी पर्दाफाश करत आठ जणांना अटक केली आहे. पोलिस आयुक्त सुरेश देव दत्ता सिंह यांनी सांगितले की, भुवनेश्वरमधील श्रीराम नगरमधील एसबीआयएटीएममध्ये झालेल्या दरोड्याच्या तपासादरम्यान ही अटक करण्यात आली. ओडिशातून सहा, तर उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालमधून आणखी दोन संशयितांना अटक करण्यात आली आहे.

## चिटफंड कंपनीवर कारवाई करण्याचे आश्वासन



**अमरावती :** आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी पलनाडू जिल्ह्यातील शेकडो लोकांची फसवणूक करणाऱ्या चिटफंड कंपनीवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. सचिवालयातून उंडावल्ली रिव्हरफ्रंट येथील निवासस्थानी परतत असताना मुख्यमंत्र्यांना नरसरावपेटा येथील साई साधना चिटफंडने फसवणूक केलेल्या लोकांचा मोठा गट दिसला. उंडावल्ली येथील माझ्या निवासस्थानी आलेल्या पीडितांकडे मी गेलो. साई साधना चिटफंड कंपनीने आपली फसवणूक केल्याचे त्यांनी मला सांगितले. पीडितांना न्याय देण्यासाठी मी सरकारच्या वतीने दोषींवर कारवाई करेन, असे नायडू यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे.

# पै. यश वासव 'पुरंदर केसरी'

## पिसर्वेचा पै. प्रसाद जगदाळे उपविजेता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने आणि सासवड येथील पुरंदर नागरी सहकारी पतसंस्था व पुरंदर तालुका कुस्तीगीर संघाच्या वतीने माजी आमदार संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली स्व चंदूकाका जगताप यांच्या स्मरणार्थ सासवड येथे दि २ व ३ मार्च रोजी पार पडलेल्या कुस्ती स्पर्धेत आंबेगाव (ता. हवेली) पै यश वासवंड याने पिसर्वेचा (ता पुरंदर) चा पै प्रसाद जगदाळे याला चितपट करून २०२५ चा पुरंदर केसरीचा आखाडा मारला.

पुरंदर हवेलीचे माजी आमदार संजय जगताप, पै तात्यासाहेब भिंताडे, पै काका पवार, प्रकाश पवार, संजय हरपळे, माजी नगराध्यक्ष मार्तंड भोंडे, आदींच्या हस्ते पै यश वासवंड याला ३५ हजार रुपये रोख, प्रशस्तीपत्रक, चांदीची गदा आणि मानाचा " पुरंदर केसरी " २०२५ चा किताब तर उपविजेता पै प्रसाद जगदाळे याला २७ हजार रुपये रोख, प्रशस्तीपत्रक व ट्रॉफी देण्यात आली. सिल्व्हर ज्युबिली मोटर्सच्या वतीने ही दोन्ही बक्षिसे



देण्यात आली. प्रसिद्ध कुस्ती निवेदक पै हंगेश्वर धायगुडे यांच्या समालोचनाने आणि कोल्हापूरचे हालगीवादक बापू आवाळे यांच्या हालगीवादनाने आखाड्यात रंग भरला. जेष्ठ मल्ल तात्यासाहेब भिंताडे आणि काका पवार यांनी अंतिम कुस्तीचे पंच म्हणून काम पाहिले.

सर्व विजेते व उपविजेत्यांना रोख रक्कम, ट्रॉफी, प्रशस्तिपत्रक देण्यात आले. याप्रसंगी प्रदीप पोमण, नंदकुमार जगताप, कृष्णा शेट्टी, कल्याणराव जेधे, विनायक खाडे, अभिजित जगताप, संदीप फरतडे, विशाल हरपळे, देविदास कामथे, प्रकाश पवार, रफिक शेख, तानाजी जगताप, विठ्ठल मोकाशी, संभाजी काळाणे, डॉ मनोज शिंदे, अजित जगताप, मनोहर जगताप, संदीप जगताप, विजय वढणे, योगेश गिरमे, विकास कामथे, संतोष गिरमे, संदीप राऊत, नितीन भोंगळे, चेतन महाजन, संजय टिळेकर, तुषार जगताप, पुरंदर केसरी पै नितीन मोडक, पै प्रतिक जगताप, पै रितेश मुळीक, पिनू काकडे, संदीपबापू जगताप, बाळासो जगताप, रमेश जगताप, अतुल जगताप, मयूर जगताप, वैभव जगताप, ज्ञानदेव दिघे, रमेश मोडक, म्हस्कू दळवी, वासुदेव बनकर, आण्णा काळे, डॉ सुमित काकडे, सत्यजित जगताप, दिलीप मोरे यांसह हजारो कुस्तीशौकीन, जेष्ठ मल्ल, पुरंदर नागरीचे सर्व संचालक उपस्थित होते.

### एकूण १० गटांत पार पडलेल्या कुस्त्यांचे वजन गटनिहाय विजेते, उपविजेते अनुक्रमे

- ३० किलो - आर्यन सोळंकी, प्रशांत ढाकणे (दोन्ही सासवड).
- ३५ किलो - वेदांत भांडवलकर (आंबोडी), अर्णव हिवरकर( सासवड).
- ४० किलो - आर्यन मोडक (वडकी), सोहम काळे (सोनोरी).
- ४५ किलो- सोहम हिवरकर, तिर्थराज जाधव (दोन्ही सासवड).
- ५० किलो - अथर्व भिसे( पानवडी), सोहम झेंडे( झेंडेवाडी ).
- ५५ किलो - अक्षय धायगुडे (जेऊर), ओम गायकवाड (वडकी).
- ६० किलो - राहुल कुंभारकर ( सासवड), समर्थ शेंडगे (होळकरवाडी).
- ६६ किलो - आदित्य कुंभारकर (सासवड), प्रथमेश ढोणे (गराडे).
- ७४ किलो- गणेश जगताप (सासवड), यशराज गाढवे (आंबेगाव खुर्द)

## जारकरवाडीत मोरीचा कठडा ढासळला



जारकरवाडी (ता.आंबेगाव ) येथे ओढ्यावरील मोरीचा एका बाजूचा खचलेला कठडा.

**लोणी-धामणी :** लोणी-जारकरवाडी-मंचर (ता. आंबेगाव ) या रस्त्यावर जारकरवाडी नजदिक असणाऱ्या ओढ्यावरील मोरीचा एका बाजूचा कठडा खचल्याने, मोरीवर अपघाताचा धोका वाढला आहे. लोणी जारकरवाडी मार्गे मंचरला जाणारा हा जवळचा रस्ता असल्याने या रस्त्यावर लहान मोठ्या वाहानांची मोठी वर्दळ असते. शिवाय जड वाहनाची सुद्धा मोठ्या प्रमाणात जा ये असते. त्यामुळे अपघाताचा धोका वाढल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने या मोरीची दुरुस्ती करावी, अशी मागणी उपसरपंच सचिन टाव्हरे व सोसायटीचे माजी अध्यक्ष खंडू भोजणे, संचालक गणेश खुडे व येथील ग्रामस्थांनी केली आहे. लोणी, धामणी परिसरातील नागरीकांना हा जवळला रस्ता असल्याने अवसरी बुद्रुक, अवसरी खुर्द, मंचर, घोडेगाव या ठिकाणी जाण्या येण्यासाठी या रस्त्याचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. तसेच रात्री अपरात्री सुद्धा या रस्त्यावरून वाहतूक सुरू असते. त्यामुळे रात्रीच्या वेळी या ठिकाणी अपघात घडण्याचा धोका वाढला आहे. या कठड्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी उपसरपंच सचिन टाव्हरे यांनी केली आहे.

# वैद्यवाडी येथील चौक अपघाताचा हॉट स्पॉट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील पारगाव कारखाना लोणी रस्त्यावर वैदवाडी चौकात अपघाताची मालिका कायमच सुरू आहे. चारही बाजूने येणाऱ्या रस्त्यांचे नव्याने कारपेट डांबरीकरण करण्यात आले आहे. यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांची संख्या व वेग वाढला आहे. परिणामी रस्त्यालगतच्या दुकानदारांसह पादचाऱ्यांनी अपघाताची भिती व्यक्त केली आहे. वैदवाडी चौकात तातडीने गतिरोधक बसविण्याची मागणी वाहानचालक व ग्रामस्थांनी केली आहे.

मागील काही दिवसांत या रस्त्यावर अपघातांचे प्रमाण वाढले आहे. शिरूर वरून वैदवाडी फाटा मार्गे मंचर वरून भीमाशंकरला जाणारी वाहनांची संख्या झपाट्याने वाढली आहे. तसेच पारगाव वैदवाडी फाटा मार्गे लोणीला व पुढे पुणे आळंदी या ठिकाणी जाणाऱ्या वाहनांची संख्या वाढली आहे. वैदवाडी फाटा याठिकाणी वर्दळ वाढली आहे. पारगाव कारखाना लोणी रस्त्यावर वैदवाडी चौकात नेहमीच अपघात घडताना दिसून येत आहेत.

सदर चौक व परिसर नेहमीच वर्दळीचा आहे. त्यामुळे या चौकात नेहमीच वर्दळ असते. त्यात आता चारही बाजूने येणाऱ्या रस्त्यांची कामे झाली आहेत. काही कामे अंतिम टप्प्यात आहेत. रस्ते चांगले झाल्यामुळे वाहनांचा वेग वाढला आहे. काही क्षणातच हा चौक वाहनचालक पार करत आहेत. रस्त्याचे काम नुकतेच झाले आहे.

यापूर्वीही या रस्त्यावरून अनेक छोटे-मोठे अपघात घडले असून काही नागरिकांना प्राणही गमावले लागले आहेत. चारही बाजूंनी रस्त्यावर गतिरोधक नसल्यामुळे शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना व दवाखान्यात उपचारासाठी जाणाऱ्या वृद्धांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. त्यामुळे सार्वजानिक बांधकाम विभागाने नागरिकांच्या मागणीकडे गांभीर्याने लक्ष देऊन रस्त्यावर गतिरोधक बसवणे गरजेचे आहे. या चौकात आबालवृद्धांची रस्ता ओलांडताना तारांबळ उडते. दुसरा कोणताही अनुचित प्रकार घडण्याची वाट न पाहता, या चौकात महत्त्वाच्या ठिकाणी प्रशासनाने गतिरोधक बसविणे गरजेचे आहे.

चारही बाजूला गतिरोधक आहेत. पण छोटे आहेत. त्यामुळे जर मोठे गतिरोधक बसविले तर सर्वच लहानमोठ्या वाहनाचा वेग कमी होईल. अपघात कमी होतील, अशी मागणी येथील उद्योजक सागर तापकीर व सोसायटीचे उपाध्याक्ष गणेश खुडे व ग्रामस्थांनी केली आहे.



वैद्यवाडी (ता.आंबेगाव ) येथील अपघातग्रस्त चौक.

## औरंगजेबाचा फोटो ठेवणाऱ्याची कारागृहात रवानगी


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोशल मीडियावर धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या इसमावर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत त्याची येरवडा मध्यवर्ती कारागृहात रवानगी केली आहे. रविवारी बारामती शहर पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

रविवारी गोपनीय सूत्रांमार्फत पोलिसांना माहिती मिळाली की, एका व्यक्तीने आपल्या व्हॉट्सअप स्टेटसवर औरंगजेबाचा फोटो ठेवत धार्मिक भावना भडकवणारा मजकूर पोस्ट केला आहे. माहिती मिळताच बारामती शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विलास नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी कारवाई करत आरोपीस ताब्यात घेतले.

त्याच्या मोबाईलची तपासणी केली असता, वादग्रस्त स्टेटस आणि धार्मिक तेढ निर्माण करणारा मजकूर आढळून आला. यामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रस्ताव तयार करून अप्पर पोलीस अधीक्षक बारामती गणेश बिरादार यांच्यासमोर सादर केला.

आरोपीच्या कृत्यामुळे सामाजिक शांतता भंग होण्याची शक्यता असल्याचे स्पष्ट झाल्याने, प्रतिबंधक उपाययोजना म्हणून



त्याला येरवडा मध्यवर्ती कारागृहात पाठविण्यात आले आहे. बारामती शहर पोलीस सोशल मीडियावर सतत नजर ठेवून असून, कोणत्याही धर्माविरोधात चिथावणीखोर मजकूर पोस्ट करणाऱ्या इसमांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

दरम्यान, सध्या छत्रपती संभाजी महाराज बलिदान मास आणि पवित्र रमजान महिना सुरू असून, आगामी काळात होणाऱ्या उत्सवांच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावर अफवा आणि धार्मिक तेढ वाढवणारे स्टेटस ठेवू नयेत, असे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केले आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलीस अधीक्षक बारामती गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी बारामती सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## इंदापूर स्थानकात महिला सुरक्षारक्षकांची नियुक्ती करा

**इंदापूर :** पुण्यातील स्वारगेट एसटी बसस्थानकात झालेल्या अत्याचाराच्या घटनेनंतर खबरदारी म्हणून इंदापूर येथील बसस्थानकामध्ये दिवसा महिला पोलिस रक्षकांची नियुक्ती करावी. तसेच आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छता ठेवावी, अशा सूचना माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी पोलिस व नगरपरिषद विभागाला दिल्या. हर्षवर्धन पाटील यांनी सोमवारी बसस्थानकाला भेट देत पाहणी केली. तसेच उपस्थित प्रवाशांसोबत संवाद साधला आहे. या वेळी आगर व्यवस्थापक हनुमंत गोसावी, पोलिस निरीक्षक सूर्यकांत कोकणे, मुख्याधिकारी रमेश ढगे, प्रा. कृष्णा ताटे, अर्बन बँकेचे संचालक स्वप्निल सावंत, दादासाहेब पिसे, अविनाश कोथमीरे, माजी नगरसेवक शेखर पाटील, ॲड. शरद जामदार, हमीद आत्तार, अमोल खराडे, कपिल पाटील, अमर लेंडवे, गणेश रोडे, अमोल कारंडे, गणेश कांबळे, मनोज काळे, दत्ता पांढरे, माऊली चौधरी आदी यावेळी उपस्थित होते. पाटील यांनी बसस्थानकावर उभ्या असलेल्या बसमध्ये जात विद्यार्थिनी, प्रवाशांसोबत संवाद साधला. त्यांच्या अडीअडचणी व समस्यांबाबत विचारणा केली. इंदापूरचे बसस्थानक अत्यंत रहदारीचे ठिकाण असून, जवळच शाळा, महाविद्यालये असल्याने विद्यार्थिनी मोठ्या संख्येने बसस्थानकावर असतात. काही प्रमाणात बसस्थानकात अस्वच्छता दिसून आली. आरोग्याच्या दृष्टीने तत्काळ बसस्थानक आणि नगरपरिषदेने या ठिकाणी स्वच्छतेवर भर द्यावा आणि ठोस उपाययोजना राबवाव्यात, अशा सूचनाही पाटील यांनी या वेळी दिल्या.

## चौथीच्या विद्यार्थिनीचा विनयभंग; शिक्षकाचे निलंबन



**शिरूर :** शिरूर तालुक्याच्या पूर्व भागातील एका गावामधे चौथीच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थिनीचा विनयभंग करणाऱ्या नराधम शिक्षकावर अखेर शिक्षण विभाग प्रशासनाने निलंबनाची कारवाई केली आहे.पोलिसांनी अटक केल्यानंतर न्यायालयाने संबंधित शिक्षक आरोपीला न्यायालयीन कोठडी सुनावल्यामुळे त्या शिक्षकाची येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. बाळू धोंडीबा गुंजाळ (वय -४५, रा.शिरूर)असे संशयित नराधम शिक्षकाचे नाव आहे.त्याच्या विरुद्ध पोक्सो कायद्याअंतर्गत शिरूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. शिक्षक व विद्यार्थी या नात्याला काळीमा फासणारी घटना शनिवारी उघड झाली होती. त्याबाबत पीडित मुलीच्या पालकांनी शिरुर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. नराधम शिक्षक गुंजाळ हा चौथीत शिकणाऱ्या मुलीला कायमच वर्ग झाडून काढण्यास सांगत असे. मुलगी वर्ग झाडताना त्याचदरम्यान नराधम शिक्षक मुलीशी अश्लील चाळे करीत होता. याबाबत कुणाला काही सांगितल्यास शिक्षकाने पीडित मुलीला पट्ट्याने मारण्याची धमकी वेळोवेळी दिली होती. या सर्व प्रकारामुळे सदर पीडित मुलगी शाळेत जाण्यास घाबरत होती. त्यामुळे पालकांनी मुलीला विश्वासात घेत विचारपूस केल्यामुळे मुलीने सर्व प्रकार पालकांना सांगितला. त्यानंतर शिक्षकाचा खरा चेहरा समोर येऊन धक्कादायक प्रकार उघडकीस आला. सर्व प्रकारानंतर पालकांनी संबंधित शाळेला टाळे ठोकले होते व शिरूरच्या गट शिक्षणाधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती.त्यामुळे शिक्षण विभागाने चौकशी समिती नेमून नराधम शिक्षकाची चौकशी केली होती. चौकशीनंतर शिक्षक दोषी आढळल्याने त्याच्यावर निलंबनाची कारवाई केली असल्याचे शिरूरचे गट शिक्षणाधिकारी बाळकृष्ण कळमकर यांनी सांगितले. पुढील तपास पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हनुमंत गिरी करत आहेत.

# आळंदी पिंपळनेर पायीवारी; हरिनाम गजरात

## श्रीगुरु हैबतबाबा दिंडीची परंपरा कायम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** येऊल श्रीगुरु हैबतरावबाबा पायी दिन्डी ने श्रीक्षेत्र आळंदी ते पिंपळनेर पायी वारी दिंडी सेवाप्रथा परंपरांचे पालन करीत हरिनाम गजरात वारी केली. आळंदी येथील मंदिरातून यासाठी दिंडीचे हरिनाम गजरात प्रस्थान झाले.

या प्रसंगी स्वामी सुभाष महाराज यांचे हस्ते वीणा पूजन झाले. श्रीगुरु हैबतरावबाबा समाधी दर्शन आशीर्वाद घेऊन जनार्दन महाराज विणेकरी यांचेकडे श्रींचे दिंडीतील मानाचा वीणा स्वामी सुभाष महाराज यांनी पायीवारी साठी दिंडीकडे सुपूर्द केला. श्रीक्षेत्र पिंपळनेर येथे संत निळोबाराय यांची वारी करून श्रीगुरु हैबतराव बाबा पायी दिंडीने परतीचे मार्गे आळंदी कडे हरिनाम गजरात प्रस्थान ठेवले.

परंपरेने आळंदी देवस्थान व श्रीगुरु हैबतरावबाबा पायी दिंडी तर्फे श्री संत निळोबारायांचे समाधीची महापूजा झाली. दिंडीने वारकरी यांचे समवेत वीणा मंडपात पंचपदी झाली. श्री संत निळोबारायांचे मानकरी सुनील गाजरे पाटील, अनिल गाजरे पाटील यांचे येथे दिंडीचे स्वागत, पाहुणचार उत्साहात झाला.

दिंडीचे प्रस्थान पूर्वी गाभाऱ्यात निळोबारायांची पूजा, आरती आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, देवस्थांन मुख्य व्यवस्थापक माऊली वीर, पालखी सोहळ्याचे मालक बाळासाहेब आरफळकर, दिंडी क्रमांक १चे मालक माऊली गुळुंजकर, ज्येष्ठ वारकरी, पायी दिंडीतील वारकरी आळंदी जनहित फाउंडेशनचे विश्वस्त स्वामी सुभाष महाराज यांचे हस्ते झाली. पिंपळनेर येथे श्री संत निळोबाराय यांची वरी २७२ वा समाधी सोहळा प्रसंगी आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, मालक बाळासाहेब आरफळकर, माऊली गुळुंजकर, व्यवस्थापक माऊली वीर आदींचे उपस्थितीत आळंदी मंदिरातील तसेच दिंडी पायी वारी आणि संत निळोबाराय सोहळा यातील परंपरांचे पालन करीत श्री गुरु हैबतबाबा दिंडीने सेवा रुजू केली. आळंदी देवस्थानने परंपरेने व्यवस्था आदी सेवा देत परंपरा कायम ठेवली.



# जमीन मोजणीचे काम रेंगाळले, पत्रच केले नाही




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** जमीन मोजणीसाठी 'अतितातडी' प्रकारातून शासकीय तिजोरीत रक्कम जमा करुन दोन वर्षं पूर्ण झाली आहेत. तरीही मोजणी नकाशांचे पोट हिश्यांचे पत्रच अद्याप तयार केले नसल्याचा धक्कादायक प्रकार हवेली तालुक्यातील मोजणी कार्यालयात घडला आहे. शेतकऱ्याला तब्बल दोन वर्षे हेलपाटे मारूनही अद्याप न्याय मिळालेला नाही. "हवेलीत मोजणीचं काम, अन् पत्रासाठी दोन वर्षं थांब" असे म्हणत शेतकऱ्याने आपली हतबलता व्यक्त केली आहे. त्यामुळे हवेली भूमि अभिलेखचे उपअधीक्षक अमर पाटील शेतकऱ्यांना आता तरी विलंब न लावता न्याय देणार का? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

काही महिन्यांपूर्वी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भूमि अभिलेख विभागातील कामकाजाबाबत प्राप्त तक्रारीवरून अधिकाऱ्यांना चांगल्याच कानपिचक्या दिल्या होत्या. मात्र, हवेली तालुक्यातील मोजणी कार्यालय महसूल मंत्र्यांनी दिलेले आदेश अंमलात आणताना दिसत नाही. दिरंगाईचा अति गलथान कारभार हवेली भूमी अभिलेख कार्यालयात सुरु आहे. मौजे उरुळी कांचन येथील गट नंबर १२२३ ची अतितातडी पोट हिस्स्यांची मोजणी (रजिस्टर नबंर ८६६/२०२३) जानेवारी २०२३ मध्ये झालेली आहे. संबंधित पोट हिस्सा मोजणीची "क" प्रत नकाशा मार्च २०२३ मध्ये मिळाला आहे. त्याबाबत गट नबंरमधील हिस्सेदाराच्या कोणत्याही प्रकारच्या तक्रारी नाहीत. मात्र, याला दोन वर्षं पूर्ण झाल्यानंतरही सातबारावर पोटहिस्सा करण्याबाबतचे पत्रच हवेलीच्या मोजणी कार्यालयाने अद्याप तयार केले नाही.

दरम्यान, हे 'कजाप'चे पत्र का व कशासाठी तयार केले नाही, याबाबत वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. मात्र या 'कजाप'च्या पत्रकापोटी शेतकऱ्यांना दोन वर्षे हवेलीच्या मोजणी कार्यालयाने वेठीस धरले आहे.

### मावळचा न्याय लागू होणार का?

- दफ्तर तपासणीमध्ये दिरंगाई व शासकीय कर्तव्यात अनियमितता आढळल्याने मावळ तालुक्यातील परिरक्षक भूमापकाचे निलंबन झाले आहे. तसेच भूमापकाच्या कार्यालयीन कार्यविवरणावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी उपअधिक्षकांची असल्याने संबधित उपअधिक्षकांची विभागीय चौकशी करण्याचे आदेश भूमि अभिलेखचे पुणे येथील उपसंचालक राजेंद्र गोळे यांनी जारी केले आहेत. त्याच धर्तीवर हवेली तालुक्यात 'कजाप'चे पत्र देण्यास दोन वर्षं लावणाऱ्या संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांची चौकशी होणार का ? हा प्रश्न समोर येत आहे.

# भाविकांना सुविधा देणार : माने

## संत तुकाराम महाराज बीज सोहळ्याची आढावा बैठक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**आळंदी :** देहू नगरीत येत्या १६ मार्चला श्री संत तुकाराम महाराज बीज सोहळा साजरा होत आहे. या सोहळ्याचे नियोजनात विविध शासकीय खात्यांचे अधिकारी, विभाग प्रमुख यांनी आपापल्या विभागाचे वतीने आपले व्यवस्थापन आराखडे ५ मार्च पर्यंत देऊन केलेल्या नियोजन प्रमाणे सेवा सुविधा उपलब्ध होतील याची दक्षता घेऊन भाविक, नागरिक यांची बीज सोहळा काळात गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्याचे सूचनादेश उपविभागीय अधिकारी हवेली तथा प्रांत यशवंत माने यांनी दिले.

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांच्या ३७५ व्या त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी वर्षाची सांगता येत्या १६ मार्च रोजी श्री संत तुकाराम महाराज बीज सोहळा दिनी होणार आहे. या सोहळ्याचे नियोजनासाठी विविध शासकीय खात्यांचे अधिकारी, विभाग प्रमुख यांची बैठक देहू संस्थांचे कार्यालयात झाली. या बैठकीत मार्गदर्शन करताना प्रताधिकार माने बोलत होते. या प्रसंगी बैठकीस श्री संत तुकाराम महाराज संस्थांचे प्रमुख विश्वस्त पुरुषोत्तम महाराज मोरे, विश्वस्त माणिक महाराज मोरे, देहू नगरपंचायत मुख्याधिकारी निवेदिता घार्गे, अभियंता संघपाल गायकवाड, देहू प्राथमिक आरोग्य केंद्र वैद्यकीय अधिकारी किशोर यादव, व्यवस्थापक पीएमपीएल निगडी डेपोचे अशोक साबळे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता किरण सरवदे, सहायक अभियंता एस.बी.झोडगे, पोलिस उपायुक्त गुन्हे शाखा बाळासाहेब कोपनर, देहूरोड पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक विक्रम बनसोडे, पोलीस उपनिरीक्षक ( वाहतूक विभाग तळवडे ) मधुकर थोरात, अप्पर तहसीलदार हवेली चिंचवड जयराज देशमुख, परिमंडळ अधिकारी जयकुमार क्षीरसागर, प्राथमिक आरोग्य केंद्र देहू चे वाय.पी बराटे, वाहतूक निरीक्षक तळेगाव एस.टी. डेपो आकाश जगताप, येलवाडी ग्रामपंचायत ग्रामसेवक पूनम शेवाळे, उपसरपंच येलवाडी ग्रामपंचायत उर्मिला गायकवाड, नगरसेवक योगेश काळोखे, योगेश परंडवाल आदी पदाधिकारी मान्यवर बैठकीस उपस्थित होते.


येत्या १६ मार्च रोजी जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांच्या ३७५ व्या त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी वर्षाची सांगता होत आहे. या निमित्त देहूत मोठ्या संख्येने विविध धार्मिक अखंड हरिनाम सप्ताह वर्षभर झाले आहेत. तसेच बीज सोहळ्याचे निमित्त मोठ्या प्रमाणात सप्ताह होत आहेत. या निमित्त देहू नगरीत ७ मार्च ते १७ मार्च या दरम्यान मोठ्या प्रमाणात भाविक श्रींचे दर्शनास तसेच सप्ताहास येत आहेत. याचा विचार करून देहूत प्रशासनाने कंबर कसली असून देहूतील नागरिक आणि भाविक यांची सप्ताह तसेच बीज सोहळ्याचे काळात कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये यासाठी प्रांताधिकारी माने यांनी सुसंवाद साधून सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना प्रशासनास दिल्या. यावेळी उपस्थित शासकीय अधिकारी, विभाग प्रमुख यांचे कडून कामकाजाची माहिती जाणून घेत प्रांत माने यांनी विशेष मार्गदर्शन करीत बीज सोहळ्याचे काळात अधिक स्टार्क राहून दक्षता बाळगण्यास सांगितले. यात्रा काळात वाहतूक सुरळीत आणि सुरक्षित राहील याची खबरदारी घेण्याचे सांगत वेळ प्रसंगी बेशीस्त वाहनचालकांवर दंदातांक कारवाई करून रहदारीला अडथळा ठरणार नाही याची दक्षता वाहतूक विभागाने घेण्याचे आदेश त्यांनी दिले.

### राज्यभरातून भाविक येणार

● श्री संत तुकाराम महाराज यांचे बीज सोहळ्यास यावर्षी राज्यासह परिसरातून मोठ्या संख्येने भाविक येणार आहेत. येणारे वारकरी, फडकरी, दिंडीकरी तसेच वारकरी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. यामुळे श्रीक्षेत्र देहू मध्ये वर्दळ वाढणार आहे. गर्दी होणार आहे. येणाऱ्या वारकरी भाविक भक्तांना सर्व प्रकारच्या सोयी सुविधासाठी अडचण निर्माण होणार नाही, तसेच श्री संत तुकाराम महाराज वैकुंठगमन सोहळा आनंदात हरिनाम गजरात पार पडेल असे प्रभावी नियोजन या बैठकीत करण्याचे सुचना देण्यात आल्या. .

### इंद्रायणीत पाणी सोडणार

● पाटबंधारे विभागाकडे बीज सोहळ्यासाठी इंद्रायणी नदी पाणी सोडण्याची मागणी करण्यात आली आहे. येत्या ५ मार्च पूर्वी देहू इंद्रायणी नदीत पाणी येईल असे नियोजन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. उपविभागीय अधिकारी माने यांनी विविध विभागाचा आढावा घेत प्रभावी मार्गदर्शन केले. देहू ला जोडणारे रस्ते स्वच्छ आणि खड्डे मुक्त राहावेत यासाठी लक्ष देण्यास सांगत सीसीटीव्हीचा वापर गर्दी नियंत्रणेस ड्रोनचा वापर देखील करण्याचे नियोजनासाठी त्यांनी मार्गदर्शन केले.



“ संत तुकाराम महाराज बीज सोहळ्या दरम्यान मुख्य मंदिरात साफसफाई, भोजन व्यवस्था, पिण्याचे पाणी, दर्शन व्यवस्था आदी नियोजन प्रभावी पणे करण्यात येईल. देहूत ७ ते १४ मार्च, ९ ते १७ मार्च दरम्यान तीन ठिकाणी सप्ताह भव्य दिव्या प्रमाणात हजारो भाविकांचे उपस्थितीत अखंड हरिनाम सप्ताह होत आहेत. तसेच १६ मार्च रोजी बीज सोहळा होणार आहे.

**— माणिक महाराज मोरे,** देहू देवस्थानचे विश्वस्त.

● ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याचे टँकर, मोबाईल शौचालये, कचरा उचलण्यास घंटागाड्या, हायमास्ट दिवे, लाईटची व्यवस्था, नियंत्रण कक्ष कार्यरत ठेवण्यात येणार

● भाविकांची यात्रा काळात गैरसोय होणार नाही याची दक्षता देहू नगरपंचायतीचे वतीने घेण्यात येणार

● पीएमएमएल च्या वतीने जादा बसेस सोडण्यात येणार

● भाविकांचे आरोग्य सुरक्षित रहावयाचे दृष्टीने आरोग्य केंद्राचे माध्यमातून सेवा सुविधा देण्यात येणार

● ७ मार्च ते १७ मार्च या काळात आवश्यक त्या ठिकाणी भाविकांचे सोयीसाठी आरोग्य मदत सेवा सुश्रुषा केंद्र कार्यरत ठेवले जाणार

# पुरंदर काँग्रेसचे राज्य शासनाविरोधात आंदोलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**सासवड :** महिला सुरक्षा, शेतमालाचे गडगडलेले बाजारभाव आणि याबाबत सुस्त असलेल्या महायुती सरकारच्या विरोधात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या सुचनेप्रमाणे आणि काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सासवड (ता. पुरंदर) येथील शिवतीर्थावर पुरंदर तालुका काँग्रेसच्या वतीने राज्य शासनाचा निषेध करून आंदोलन करण्यात आले. शेतमालांना हमीभाव, कर्जमाफी, वीजबिल माफी, वाढती महागाई, बेरोजगारी आदींमुळे शेतकरी अडचणीत सापडला असून अशा परीस्थितीत सर्वसामान्य जनता, शेतक-यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या शासनाचा याप्रसंगी निषेध करण्यात आला.

याप्रसंगी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार संजय जगताप, तालुकाध्यक्ष प्रदीप पोमण, जिल्हा सरचिटणीस नंदकुमार जगताप, शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष दिलीप गिरमे, संदीप फरतडे, कल्याणराव जेधे, संभाजी काळाणे, देविदास कामथे, शाहजान शेख, अजित जगताप, चेतन महाजन, सागर जगताप, नंदकुमार जगताप, निलीमा होले, मनिषा बडदे, संतोष जगताप, सागर जगताप, दत्ता शिंदे, अमोल क्षिरसागर, धर्माजी गायकवाड, रफिक शेख, संजय टिळेकर, सोपान रणपिसे, मोबीन बागवान आदी पदाधिकाऱ्यांसह काँग्रेसच्या विविध विभागांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेकडोंच्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. याप्रसंगी महायुती सरकारने वचननाम्यात जाहिर केल्याप्रमाणे अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकऱ्यांना कर्जमाफी, विजबील माफी द्यावी अशा मागण्यांचे निवेदन तहसील कार्यालयात देण्यात आले.

# भीमशक्ती संघटना - खेड तालुका अध्यक्षपदी अनिल जाधव



**भीमशक्ती संघटनेच्या कार्यकर्त्यांची बैठक राजगुरूनगर येथे झाली या बैठकीत नवीन कार्यकारिणी निवडण्यात आली. यावेळी नियुक्तीचे पत्र देताना जिल्हा अध्यक्ष विजय डोळस आदी मान्यवर**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिरोली :** भीमशक्ती संघटनेच्या खेड तालुका अध्यक्षपदी अनिल जाधव यांची निवड झाली आहे. भीमशक्ती संघटनेचे जिल्हा अध्यक्ष विजय डोळस यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी संघटनेच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत ही निवड केली

भीमशक्ती संघटना पुणे जिल्हा अध्यक्ष तथा काँग्रेसचे तालुका अध्यक्ष विजय डोळस यांच्या उपस्थितीत राजगुरुनगर येथे तालुक्यातील कार्यकर्त्यांची बैठक झाली.

या बैठकीला अनिल जाधव, कृषिकेष डोळस, भानुदास नितनवरे, एकनाथ रोकडे,अर्जुन रोकडे, शंकर रोकडे, सुरेश शिंदे, पोपट शिंदे, राजेश शिंदे संतोष सोनावणे, मंगेश जाधव, आकाश घोडके, सारिका ओव्हाळ नामदेव वाकचौरे, सुभाष शिंदे, के डी जाधव, रवींद्र रोकडे, उषा उनवणे, प्रषिक सुरवाडे, दत्तात्रय गोतरणे तालुक्यातील भीमशक्ती संघटनेचे कार्यकर्ते उपस्थितीत होते.

**भीमशक्ती संघटना खेड तालुका नवनिर्वाचित कार्यकारिणी पुढील प्रमाणे : -**

अनिल बबन जाधव(अध्यक्ष), विलास बाजीराव रोकडे (कार्याध्यक्ष), उषा बाबुराव उनवणे ( महिला अध्यक्षा), के डी जाधव (सचिव), सारिका देवेंद्र ओव्हाळ (खेड पश्चिम विभाग संघटक), एकनाथ भिमाजी रोकडे (उपाध्यक्ष), प्रषित शिवराम सूरवाडे (चाकण शहर अध्यक्ष), दत्तात्रय चंद्रकांत गोतारणे (राजगुरुनगर शहर अध्यक्ष)

# मोशीत कुस्त्यांच्या आखाड्यात पै. हर्षवर्धन सदगीर विजेता

## ग्रामदैवत श्री नागेश्वर महाराज उत्सवात रंगला कुस्त्यांचा आखाडा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** मोशी येथील श्री नागेश्वर महाराज वार्षिक उत्सवातील कुस्त्यांचे रंगलेल्या आखाड्यात महाराष्ट्र केसरी किताब विजेता मल्ल पै. प्रकाश बनकर यांना पै. हर्षवर्धन सदगीर यांनी लपेट डाव टाकत कुस्ती विजेता ठरला. या कुस्त्यांचे आखाड्यात शिट्ट्यां, टाळ्यां आणि जल्लोषाने आखाडा खूपच रंगतदार झाला. आराखड्यात युवक तरुणांनी नागेश्वर महाराज की जय असा एकाच जयघोष करीत परिसरात जल्लोष भरला. यावेळी आखाड्या विजेता मल्ल हर्षवर्धन सदगीर यांचे नावाचे घोषणा देण्यात आल्या. यावेळी पारितोषिकात श्री नागेश्वर महाराज चांदीची गदा विजयी पैलवान हर्षवर्धन सदगीर यांना देण्यात आली.

मोशी येथील आमराई परिसरात ग्रामदैवत श्री नागेश्वर महाराज उत्सव, श्री नागेश्वर कुस्तीगीर संघ मोशी यांनी या कुस्त्यांचे आखाड्याचे यात्रेत आयोजन केले होते. या आखाड्यास राज्यातून कोल्हापूर, इचलकरंजी, पुणे, सातारा परिसरातून नामवंत मल्ल उपस्थित होते.

प्रसिद्ध कुस्ती निवेदक हंगेश्वर धायगुडे यांनी आपल्या पहाडी आवाजातील निवेदनातून आखाड्यात लक्ष वेधले. यावेळी त्यांनी पहाडी आवाजात थरारक कुस्त्यांचे निवेदन केले. कुस्ती शौकीन यांनी यास मोठी दाद दिली. या प्रसंगी रुस्तुम-ए हिंद अमोल बुचडे, महाराष्ट्र केसरी गुलाब बर्डे, अनिल गुंजाळ यांचेसह राज्यातून आलेले मल्ल उपस्थित होते. उपमहाराष्ट्र केसरी संतोष गरुड यांनी शेवटच्या विजयी कुस्तीचे तर रोहिदास आमले, तुषार गोळे, प्रसाद सस्ते, चंद्रकांत मोहोळ, बाळासाहेब काळजे, काळूराम लोखंडे यांनी लक्षवेधी कुस्त्यांचे पंच म्हणून काम पाहिले. यावेळी प्रमुख लढतीत दादा शेळके आणि शुभम शिंदनाळे बैंक ब्रो डावावर विजय मिळविला. पैलवान साकेत यादव विरुद्ध प्रशांत शिंदे यांच्या लढतीमध्ये प्रशांत शिंदेला दुखापत झाल्याने कुस्ती बरोबर झाली. यावेळी पंचक्रोशीतील कुस्ती शौकीन मोठ्या संख्येने कुस्त्यांचा आखाडा पाहण्यास उपस्थित होते.



# कर्जमाफीच्या चर्चेमुळे वसुलीवर विपरीत परिणाम




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** विधानसभा निवडणुकीमध्ये मतदारांना आकर्षित करण्यासाठी नेत्यांनी निवडणुकीच्या प्रचारात अनेक वेळा विविध प्रकारच्या घोषणा केल्या होत्या. प्रचारात महायुती सरकारने शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी करणार असल्याचे, आश्वासन दिले होते. या आशेवरच शेतकऱ्यांनी एक प्रकारे महायुतीच्या मागे शक्ती लावली होती. आता महायुतीचे सरकार येऊन साधारण तीन महिने झाले आहेत. कर्जमाफी ही शेतकऱ्यांची होणार का? सातबारा कधी कोरा होणार? या चर्चेने शेतकरी विकास सोसायटी व बँकेचे कर्ज भरण्यास सध्या तरी टाळाटाळ करीत आहेत.

याचा परिणाम विकास सोसायटीवर होताना दिसून येत आहे. यामुळे कर्ज वसुलीचे मोठे आव्हान हे उभे राहिलेले दिसून येत आहे. कर्जमाफी बद्दल शासन स्तरावरून अद्याप कोणतीही माहिती आलेली नाही, यासाठी कुठलाही आदेश किंवा शासन निर्णय हा झालेला नाही. वसुलीचा वेग मंदावला आहे. परंतु वसुली कामकाज सुरू आहे. कर्जमाफीमुळे बँका, सोसायटी कर्ज वसुलीवर परिणाम होताना दिसत आहे. यावेळी मार्च अखेरपर्यंत थकबाकीदार वाढणार आहेत, तर कर्जदारांची संख्या सुद्धा वाढणार आहे.

मात्र निवडणूक झाली की, अनेक वेळा या अशा घोषणा पूर्ण होताना दिसून येत नाही. यापूर्वी सुद्धा शेतकऱ्याचे कर्ज माफ झाल्याने, परत पुन्हा शेतकऱ्याची कर्जमाफी होईल, अशी ही आशा शेतकऱ्यांना आहे.


कर्ज माफीचा निर्णय हा शासनाने घेतला, तर केवळ थकबाकीदार हेच कर्जदारांना लाभ होऊ नये अशी प्रतिक्रिया नियमित कर्जदारांची आहे. कर्ज माफी मिळवण्यासाठी पुरंदर तालुक्यातील नियमित कर्जदार आपणही थकबाकीदार व्हावे, अशाच मानसिकतेत आहेत. सोसायटी कडून घेतलेले पीक कर्ज थकीत रहावे, यासाठी शिरुर तालुक्यातील अनेक शेतकरी कांदा व ऊस बिलातून आपल्या कर्ज वसुलीची कपात करू नये, अशा प्रकारच्या विनंत्या या बँका व सोसायटीच्या सचिवाकडे सूचना करीत आहेत. कांदा, ऊस बिलातून येणारी वसुली सोसायटीच्या खात्यात अनामत ठेव म्हणून, जमा करावी अशी मागणी एक प्रकारे शेतकरी करीत आहेत. कर्ज वसुलीमुळे शेतकरी आणि सचिव यांच्यामध्ये चांगलीच वादावादी होताना सध्या तरी शिरुर तालुक्यात दिसून येत आहे.



## चांबळी येथे नेत्र तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**सासवड :** पुरंदर तालुक्यातील चांबळी या गावी आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी, उपचार, चश्मे वाटप या शिबिराला ग्रामस्थांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. पुणे येथील पद्मश्री मनोहर डोळे मेडीकल फाउंडेशनच्या वतीने या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठान आणि चांबळी ग्राम पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने या नेत्र चिकित्सा शिबिरात फिरत्या दवाखान्याच्या माध्यमातून तब्बल ७८ नेत्र रुग्णांची तपासणी करण्यात आली तर सहा जणांना पुणे येथे शस्त्रक्रिया करण्यासाठी दाखल करण्यात आले. मनोहर डोळे मेडीकल फाउंडेशनच्या वतीने डॉ अंकुश टेलोरे, विजय गायकवाड, नरेंद्र चिपळूणकर, कमलाकर वाडीकर यांनी रुग्णांची तपासणी करून उपचार केले. सरपंच प्रतिभा कदम, माजी उपसरपंच संजय कामठे, बापूसाहेब कामथे, महादेव शेंडकर, संदिप कदम, हरिभाऊ शेंडकर यासह प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप, सचिव हेमंत ताकवले व अन्य ग्रामस्थ उपस्थित होते.

## प्राचार्य सरिता कपूर यांना महिला आयकॉन पुरस्कार



**जेजुरी :** येथील जिजामाता इंग्लिश मिडीयम स्कूलच्या प्राचार्या सरिता कपूर यांना हैद्राबाद महिला वल्ड रेकॉर्डस् च्या वतीने प्रतिष्ठित महिला आयकॉन पुरस्कार जाहीर झाला आहे. प्राचार्या सरिता कपूर या मूळच्या राजस्थान मधील असून त्यांनी मानसशास्त्र विषयात उच्च पदवी घेवून शैक्षणिक क्षेत्रात त्या उदयपूर येथे विविध संस्थेत कार्यरत होत्या. विशेष मुलांच्या शैक्षणिक संस्था,नृत्य व नाटक संस्था या मध्ये त्यांनी काम केले आहे. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक व कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल अमर सत्य फाऊंडेशन, हरियाणा, संकलप सेवा संस्थान जयपूर, मंथन फाऊंडेशन उदयपूर, वूमन पॉवर सोसायटी चंदीगड, तसेच रोटरी क्लब, लायन्स क्लब उदयपूर यांच्या वतीने अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्या श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या जेजुरी येथील जिजामाता इंग्लिश स्कूलमध्ये कार्यरत असून या विद्यालयात शैक्षणिक, सांस्कृतिक, कला व क्रीडा क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना जागतिक महिला दिना निमित्त हैद्राबाद महिला वल्ड रेकॉर्डसने प्रतिष्ठित महिला आयकॉन पुरस्कार जाहीर केला आहे. संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, सचिव व माजी आमदार संजय जगताप, महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे सचिव प्राचार्य नंदकुमार सागर यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## वैद्यकीय न्यायशास्त्र परिषदेचे आयोजन

**बारामती :** इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमानाने बारामती येथे वैद्यकीय न्यायशास्त्र परिषद भरविण्यात आली. या परिषदेत वैद्यकीय क्षेत्राला लागू होणारे कायदे त्यातील बारकावे, त्यांचे काटेकोर पालन, महत्त्वाच्या कागदपत्रांचे जतन इत्यादी विषयावर तज्ञांनी मार्गदर्शन केले. या परिषदेत ५०० डॉक्टरांनी सहभाग घेतला. डॉ. संतोष कदम अध्यक्ष आय.एम.ए.महाराष्ट्र, डॉ. अनिल आव्हाड सेक्रेटरी महाराष्ट्र आय.एम.ए., डॉ. बिपीन चेकर अध्यक्ष मेडिकोलीगल सेल आय.एम.ए. महाराष्ट्र,डॉ. होझी कपाडिया अध्यक्ष आय.एम.ए. मुख्यालय अशा मान्यवरांची उपस्थिती या परिषदेला लाभली. डॉ. साधना कोल्हटकर आय.एम.ए. बारामती, डॉ. निकिता मेहता आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या परिषदेचे नियोजन केले. डॉक्टर अशोक तांबे यांनी विशेष मार्गदर्शन केले. ही परिषद यशस्वी होण्यासाठी डॉ. दीपिका कोकणे आणि डॉ. सौरभ मुथा यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## शिवाजी इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात



**जेजुरी :** श्री पद्मावती एज्युकेशन सोसायटी संचलित छत्रपती शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल जेजुरी या शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या संस्थेच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना मल्हार समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येते, तर संपूर्ण शैक्षणिक वर्षांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्याला स्टुडन्ट ऑफ द इयर या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. पद्मावती एज्युकेशन सोसायटी आणि खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले सोशल फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने मल्हार समाजभूषण पुरस्कार लेखक कवी आणि इतिहासकार विनोद खटके आणि व्यंगचित्रकार मनोज कुंभार यांना पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, तर स्टुडन्ट ऑफ द इयर हा पुरस्कार मनवा शेवाळे या विद्यार्थिनीला मार्तंड देवसंस्थांनचे माजी प्रमुख विश्वस्त डॉ प्रसाद खंडागळे व विश्वस्त मंगेश घोणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. माजी उप नगराध्यक्षा उषाताई आगलावे यांच्या हस्ते पूजा राजपुरे, वैशाली जगताप, रिंकू सिंग, रचना पवार, प्रदीप खेडेकर, निशांत शिंदे, प्रियंका पवार आणि संस्थेचे मुख्याध्यापक श्रीकांत पवार यांना उत्कृष्ठ कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन संस्थेचे सचिव श्रीकांत पवार यांनी तर आभार प्रदीप पवार यांनी मानले.

# श्रीमंत देश स्लोव्हाकिया

**सफर देशांची**

सर्वही बाजूंनी भूभाग असलेला स्लोव्हाकिया हा मध्य युरोपमधला छोटासा देश आहे. ब्रातिस्लाव्हा ही स्लोव्हाकियाची राजधानी. उत्तर सीमेवर पोलंड, पूर्व सीमेवर युक्रेन, दक्षिण सीमेवर हंगेरी पश्चिमेला ऑस्ट्रीया आणि उत्तर पश्चिम सीमेवर झेक गणराज्य असलेला हा देश एकेकाळी हा झेकोस्लोव्हाकियाचा भाग होता. १९९० मध्ये हा भाग सोव्हियत युनियनपासून वेगळा झाला आणि १९९३ मध्ये तो झेक रिपब्लिकपासून वेगळा होऊन स्वतंत्र झाला. ५४,००००० एवढी या देशाची लोकसंख्या आहे. या देशातले लोक स्लोव्हाक भाषा बोलतात. युरोपातील दुसरी लांब नदी डेन्यूब स्लोव्हाकियामधून वाहते.या देशाला आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने जगातील १८७ देशांमधला ३८ व्या क्रमांकाचा श्रीमंत देश म्हणून मान्यता दिली आहे. स्लोव्हाकियाचा बराचसा भूभाग डोंगराळ आहे. देशाच्या उत्तरेला कारपाथियन पर्वतरांगा आहेत. टॅट्रा या इथल्या सर्वात उंच पर्वतरांगा आहेत. इथे उन्हाळ्यात खूप गरम होतं तर थंडीत आर्द्रता बरीच जास्त असते. डॅन्यूबे, वाह आणि एचरॉन या इथल्या प्रमुख नद्या आहेत. या देशात अनेक प्रजातींचे पक्षी आहेत. अस्वलं, लांडगे, रानमांजरं, मिंक असे प्राणी इथे आढळतात.

या देशात विविध उत्पादनांची निर्मिती होते. मोठ्या प्रमाणात शेतीही केली जाते. धातूचं उत्पादन हा या देशातला प्रमुख उद्योग आहे. या देशात नैसर्गिक साधनसंपत्तीही भरपूर प्रमाणात आहे. या देशात कुटुंब व्यवस्था अस्तित्वात आहे. इथे एकत्र कुटुंबंही आहेत.




# लॅपटॉपविषयी...

**ॲप वर्ल्ड**

लॅपटॉप एक प्रकारचा पोर्टेबल कॉम्प्युटर आहे,ज्याला आपण नोटबुक कॉम्प्युटरसुद्धा म्हणतो. हा एक बॅटरी वर चालणारा कॉम्प्युटर आहे. हा लहान आकाराचा असतो. याला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहज नेता येते. त्यामुळे याचा वापर आपण कोठेही करू शकतो जसं की लायब्ररी, विमान, ऑफिस आणि मीटिंग मध्ये सुद्धा. आता अनेक प्रकारचे लॅपटॉप बाजारात आहेत. आयबीएम, ॲपल, कॉम्पॅक, डेल, तोशिबा, एसर यांच्यासारखे काही लॅपटॉप मॅन्युफ्रॅक्चरर आहेत. लॅपटॉपचं डिझाइन आणि मॅन्युफ्रॅक्चर करणं खूप कठीण आणि कौशल्याचे काम आहे. लॅपटॉपची बॅटरी खूप वेळपर्यंत चालते. त्यामुळे आपण पॉवर सप्लाय नसतानासुद्धा काही वेळ लॅपटॉप वापरू शकतो. साधारणपणे लॅपटॉपची बॅटरी तीन ते चार तास चालते. यामध्ये इनबिल्ट कीबोर्ड असतो जो माऊसचे कामदेखील करू शकतो. यामुळे आपल्याला स्वतंत्र कीबोर्ड आणि माऊसची गरज पडत नाही. इंटरनेट वापरण्यासाठी वायफाय आणि ब्ल्यूटुथची सुविधा असते. लॅपटॉप आणि टॅब्लेट सुद्धा आता कॉम्प्युटर आणि मोबाईलप्रमाणे फिचर्स देऊ लागल्यामुळे लोक आता कॉम्प्युटरवर जास्त अवलंबून राहत नाहीत. नवा लॅपटॉप घेताना लॅपटॉपचं वजन कमीत कमी असावे आणि बॅटरी कमीत कमी चार सेलची असावी. ती 'लिथियम टाइप'ची असली, तर अधिकच चांगले. लॅपटॉप लेटेस्ट टेक्नोलॉजीचा आणि लेटेस्ट जनरेशनचा असावा.



# आकाशाचा डोळा : ड्रोन कॅमेरा

**टेक फन**

ड्रोन म्हणजे यूएवी म्हणजेच अनमॅनड एरियल व्हेईकल. ड्रोनला 'उडता रोबोट' असंही म्हणता येईल. आपण हा रोबोट रिमोट कंट्रोलद्वारे नियंत्रित करू शकतो. ज्या ठिकाणी माणूस पोहोचणे अवघड आहे त्या ठिकाणी ड्रोन सेट केला जातो. १९२० साली ह्या प्रकारचा ड्रोन सर्वात प्रथम उडवण्यात आला. बदलत्या टेक्नॉलॉजीमुळे यात अनेक सुधारणा झाल्या. हळूहळू सेन्सर आणि कॅमेरा मध्ये सुधारणा होत गेली. चांगल्या दर्जाचे ड्रोन आकाशात ३० मिनिटापर्यंत उडू शकतात. ड्रोनची बॅटरी आणि त्याचं वजन यावर त्याचे आकाशात उडत राहणे अवलंबून असते. ड्रोन हेलिकॉप्टरसारखा हवेत उडवला जातो आणि रिमोटने नियंत्रित केला जातो. त्याच्या कॅमेरामुळे जमिनीवरच्या दृश्यांचे शूटिंग स्पष्ट आणि नीट केले जाते. अनेक रिसर्च आणि रेस्क्यू ऑपरेशनमध्ये ड्रोनचा वापर केला जातो. ट्रॅफिक नियंत्रित करण्यासाठी, हवामानाचा अंदाज घेण्यासाठी ड्रोनचा उपयोग केला जातो. आकाशातून फोटोग्राफी करण्यासाठी तसंच खेळाच्या सामन्यांचं प्रक्षेपण करण्यासाठीदेखील ड्रोनचा वापर केला जातो. अलीकडे शेतीच्या विविध कामांमध्ये ड्रोनचा उपयोग केला जाऊ लागला आहे. लग्नसामारंभाचे किंवा एखाद्या मोठ्या कार्यक्रमाचे ड्रोनने आकाशातून शूटिंग केले जाते. मिलिटरीमध्ये ड्रोनचा वापर दिवसेंदिवस वाढू लागला आहे. हेरगिरीसाठी वापरण्यात येणारे ड्रोन हे आजच्या जगातले सर्वात प्रगत तंत्रज्ञान म्हणता येईल. हवाई दलाच्या गोरगोन सेन्सर असलेले रीपर प्रकारचे ड्रोन १२ कोनांमधून चार किलोमीटर क्षेत्रावर लक्ष ठेवते. ड्रोन हे नव्या युगाचे नवे तंत्रज्ञान योग्य रीतीने वापरले गेले तर वरदान ठरेल यात काही शंका नाही.



# का करायची भटकंती?

**लाईफस्टाईल**

'केल्याने देशाटन' पंडितमैत्री सभेत संचार ही म्हण तुम्हाला माहित असेलच. दोस्तांनो, फिरायला गेल्यावर तुम्हाला खूप मजा येते. तुम्ही अगदी धमाल करता. सुट्टी लागली की तुम्ही आईबाबांसोबत, कुटुंबियांसोबत फिरायला जात असालच. फिरणं ही खूपच छान गोष्ट आहे. यातून तुम्ही खूप अनुभव मिळवू शकता. विविध देशांतर्फे सांस्कृतिक देवाणघेवाण उपक्रम राबवले जातात. त्याअंतर्गतही तुम्हाला परदेशात जाण्याची संधी मिळू शकते. वेगवेगळ्या देशांत फिरल्यामुळे तुमच्या व्यक्तिमत्त्व विकसित होते. तुम्ही नवनवीन गोष्टी शिकता.

* फिरल्यामुळे विविध प्रांतांमधली, देशांमधली संस्कृती कळते. त्या त्या भागाची वैशिष्ठ्ये कळतात. तुमचा आत्मविश्वास वाढतो. स्वत:चे प्रश्न स्वत: सोडवता येतात. तुम्ही स्वावलंबी होता.

* लहानपणापासून तुम्ही तुमच्या कंफर्ट झोनमध्ये रहात असता. आईवडील तुमची काळजी घेत असतात. मित्रमैत्रिणींसोबत तुम्ही रमता. पण दुसऱ्या ठिकाणी गेल्यावर तुमची काळजी तुम्हालाच घ्यावी लागते. स्वत:च्या वस्तू नीटनेटकेपणाने ठेवणे, बॅग भरणे या गोष्टी तुमच्या तुम्ही करायला शिकता.

* फिरताना तुम्हाला सार्वजनिक वाहतून व्यवस्थेचा वापर करावा लागतो. बस, ट्रेन, मेट्रोमधून फिरावं लागतं. यामुळे आत्मविश्वास वाढतो. भीती कमी होत जाते. तुम्ही कुठेही जुळवून घेऊ शकता.

* सध्याच्या काळात एकापेक्षा अधिक भाषा येणं गरजेचं आहे. यानिमित्ताने तुम्ही नवी भाषा शिकू शकता. तुमची कौशल्यं वाढवू शकता.



**दोस्त हे मस्त**

## असा आहे व्हाइट बेलिड हेरॉन


व्हाईट बेलिड हेरॉनला इम्पिरियल हेरॉन असंही म्हटलं जातं. हा पक्षी हिमालयाच्या पायथ्याशी आढळतो. व्हाइट बेलिड हेरॉन हा काळपट, भुरकट रंगाचा बगळा आहे. याची मान लांब असते. या बगळ्यांची संख्या कमी होत चालली आहे. त्यांचा अधिवास म्हणजे निवासाची ठिकाणं नष्ट होत चालली आहेत. त्यामुळे ही ठिकाणी वाचवून त्यांची संख्या वाढवण्याचे प्रयत्न होत आहेत.



**खादाडी**

## गारेगार मँगो कोकोनट पॉप्सिकल

दोस्तांनो, तुम्ही घरच्या घरी मँगो आईस्क्रीम कँडी बनवू शकता. या कँडीत नारळ घालून थोडा ट्विस्टही देता येईल. यासाठी दोन कप आंब्याचे तुकडे घ्या. आंब्याच्या तुकड्यांऐवजी पल्पही वापरता येईल. अर्धा लीटर नारळाचं दूध, अर्धा कप मध आणि पाव चमचा व्हॅनिला एक्स्ट्रेक्ट हे साहित्य घ्या. आंबा, नारळाचं दूध, मध आणि व्हॅनिला एक्स्ट्रेक्ट मिक्सरमध्ये एकत्र वाटून घ्या. पॉप्सिकल मोल्डमध्ये हे मिश्रण भरून घ्या. सात ते आठ तास सेट होण्यासाठी फ्रीजरमध्ये ठेवा. यानंतर गारेगार कँडी खा.



**समाजभान**

## करू नका गुदगुल्या

मुलांनो, तुम्ही तुमच्या मित्रमैत्रिणींना गुदगुल्या करता. गुदगुल्या केल्यावर खूप हसायला येतं. आपण लहान मुलांशी खेळत असलो तरी त्यांना गुदगुल्या करतो. पण छोट्या बाळांना गुदगुल्या केल्यानंतर त्यांना त्रास होऊ लागतो. गुदगुल्या केल्यानंतर लहान मुलं हसतात. हसता हसता त्यांना धाप लागते. लहान मुलांना बोलता येत नाही. यामुळे त्यांना होणारा त्रास आपल्याला कळत नाही. म्हणूनच लहान बाळांसोबत खेळत असताना त्यांना गुदगुल्या करू नका.




**बी फिट**

## योगा क्लासला जाताय?

दोस्तांनो, यंदा तुम्ही योगा क्लासला जायचं ठरवलं असेल तर काही गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात. योगा करताना ढगळ कपडे घाला. बाजारात योगा पँट्स मिळतात. त्या घालता येतील. दुसरं म्हणजे आपण एखादं आसन किती वेळ करायचं हे समजून घ्या. वेळेपेक्षा अधिक काळ आसन केलं तर त्रास होऊ शकतो. योगा करताना श्वासांवर लक्ष केंद्रित करा. आसनं करताना श्वास सर्वात महत्त्वाचा असतो.



**ठिपके जुळवा**



# जपा हे मैत्र

**जाणून घ्या**

दोस्तांनो, तुमच्याकडेही घरात डॉगी किंवा मनी आहे का? तुम्हाला तर माहीतच आहे की, ते तुमचे जीवलग दोस्त होऊ शकतात. त्यांना बोलता येत नसलं तरी त्यांचं प्रेम ते छान पद्धतीने व्यक्त करतात. ते आपली सोबत करतात. आपल्याशी खेळतात. तुम्हाला माहिती आहे का, की त्यांच्याशी खेळल्यामुळे आपल्या मनावरील ताण हलका होतो. मनीमाऊ बऱ्यापैकी स्वतंत्र असते. तिची फारशी काळजी घ्यावी लागत नाही. मात्र डॉगीला खायला देणं, स्वच्छता राखणं, फिरवून आणणं हे सगळं तुम्हाला करावं लागतं. ही काम करत असाल तर चांगलंच आहे, पण करत नसाल तर अवश्य करा, कारण पाळीव प्राण्यांच्या संपर्कात राहिल्यास विविध प्रकारच्या संसर्गापासून आणि मुख्य म्हणजे जाडी वाढण्यापासून सुटका होते बरं का! पाळीव प्राण्यांच्या संपर्कात राहिल्यास आपल्या शरीरावर काही उपकारक जीवाणूंचा स्तर वाढतो. हे जीवाणू शरीराची रोगप्रतिरोधक शक्ती वाढवण्याचं काम करतात, त्यामुळे काही संसर्गांपासून आपण लांब राहू शकतो. आपलं शरीर संसर्ग पसरवणाऱ्या जीवाणू आणि विषाणूंचा हल्ला यशस्वीपणे परतवून लावू शकतं. कुत्र्याच्या पंजात आणि शरीरावरील केसांवर हे उपकारक जीवाणू आढळतात. म्हणूनच त्यांच्या संपर्कात राहणाऱ्यांना काही आजारांचा धोका अजिबात नसतो. जी मुलं पाळीव प्राण्यांजवळ असतात त्यांना दमा होण्याचा धोका कमी असतो असं तज्ज्ञांनीही मान्य केलं आहे. मुक्या प्राण्यांना तुम्ही जितकं प्रेम द्याल त्याच्या कितीतरी पट प्रेम ते आपल्यावर करतात. डॉगी अनेक गोष्टी शिकू शकतात आणि आपल्याला मदतही करतात.



# आगळीवेगळी थिएटर्स

**गंमत जंमत**

तुम्हाला सिनेमे पाहायला आवडत असेलच. घरात मोठमोठ्या आकाराचे टेलिव्हिजन असले तरी थिएटरमध्ये चित्रपट पाहण्याची मजा काही वेगळीच असते.तो साऊंड आणि पडद्याची ती भव्यता तुम्हाला आवडत असेल. शिवाय मध्यंतरात बटाटेवडे, सामोसे, पॉपकॉर्न खाण्याची मजा काही निराळीच. मित्रांनो, जगातली काही थिएटर्स तर अगदी आगळीवेगळी आिहेत. खरे तर ती यासाठीच प्रसिद्ध आहेत असंही म्हणता येईल. जाणून घेऊ या अशाच काही थिएटर्ससंबंधीची ही रंजक माहिती.

* अमेरिकेतील ओरलँडो येथील साय–फाय डाईन–इन थिएटरमध्ये तुम्ही पिकनिकला गेल्याचा आनंद अनुभवू शकता. तुम्हाला माहितीये, या थिएटरमध्ये क्लासिक कार्सच्या आकाराचे टेबल्स आहेत. छतावर चमचमणाऱ्या कृत्रिम चांदण्या लावण्यात आल्या आहेत. इथे स्वादिष्ट जेवण वाढलं जातं आणि त्याचा आस्वाद घेत चित्रपटाची मौज लुटता येते.

* ग्रीसमध्ये ऑलिंपिया नावाचं एक थिएटर आहे. या थिएटरमध्ये आलिशान बेड आहेत. तिकीट काढल्यावर या बेडवर लोळत, अगदी आरामात चित्रपटाची मौज लुटता येते.

* लंडनमध्ये हॉट ट्यूब सिनेमा नावाचं एक थिएटर आहे. याचं वेगळेपण म्हणजे इथे गरम पाण्याने भरलेले बाथटब ठेवण्यात आले आहेत. प्रेक्षक त्या पाण्यात डुंबतात, मनसोक्त नाचतात, गातात आणि अशी धमाल करत चित्रपटही पाहतात.

* लंडनमधील इलेक्ट्रिक नावाचं थिएटरही असंच अनोखं आहे. लंडनमधील पुरातन थिएटर्सपैकी एक असणारं हे थिएटर आपल्या फॅशनेबल रुपासाठी प्रसिद्ध आहे.



# संधी पेट्रोलियम इंजिनिअरिंग क्षेत्रातील

**कोण होणार?**

इंजिनिअरींग क्षेत्रात रस असणारी बरीच मुलं असतात. बारावीनंतर इंजिनिअरींग शाखेकडे वळता येते. मॅकेनिकल, कॉम्प्युटर, आयटी, आर्टिफिशिअल इन्टेलिजन्स,ऑटोमोबाईल अशा इंजिनिअरींगच्या विविध शाखा प्रसिद्ध आहेत. मात्र यासोबतच उत्तम भविष्य असलेली त्यापैकी एक शाखा म्हणजे पेट्रोलियम इंजिनिअरींग. या शाखेत नैसर्गिक वायू किंवा खनिज तेलाच्या उत्पादन प्रक्रियेबाबत शिकवलं जातं. पेट्रोलियम इंजिनिअर खनिज तेल आणि नैसर्गिय वायूच्या उत्पादनांशी संबंधित क्षेत्रात कार्य करतात. भारतासह परदेशातही तुम्हाला संधी मिळू शकते. पेट्रोलियम इंजिनिअरला फिजिक्स, के मिस्ट्री अशा विषयांसह मॅकेनिकल इंजिनिअरींग, जियोलॉजी आणि इकोनॉमिक्सचं ज्ञान असणं गरजेचं असतं. सध्या जगभरात पेट्रोलियम उत्पादनांच्या मागणीत बरीच वाढ झाली आहे. त्यामुळे पेट्रोल, डिझेलसारख्या इंधनांचे साठे कसे पुरवायचे हा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत पेट्रोलियम इंजिनिअर्स महत्त्व खूपच वाढलं आहे. नैसर्गिक वायू, खनिज तेलांच्या नव्या साठ्यांचा शोध घेणं गरजेचं असतं. यासाठी कुशल तज्ज्ञांची गरज असते. म्हणून पेट्रोलियम इंजिनिअर्सच्या मागणीत वाढ होणार आहे. त्यामुळे इंजिनिअरींग करायचं असेल तर या शाखेचा विचार करता येईल.





## ओळखा पाहू

**जिज्ञासा**

१) एनडीएचं विस्तारित रुप काय?
२) राज्यसभेस कोणतं सभागृह म्हणतात?
३) हिंदुस्थान मशिन टूल्स हा सरकारी मालकीचा कारखाना कुठे आहे?
४) भारताला किती कि.मी लांबीची समुद्रकिनारपट्टी लाभली आहे?
५) जम्मू ते त्रिवेंद्रमदरम्यान धावणारी रेल्वे गाडी कोणती?
६) बिस्मिल्ला खान कोणतं वाद्य वाजवण्यात तरबेज होते?
७) जमिनीवरील सैन्याला काय म्हणतात?
८) अंबर फोर्ट कुठे आहे?
९) क्युबाची राजधानी कोणती?
१०) जगातील सर्वात जास्त लोकसंख्येचा देश कोणता?

उत्तर : १) नॅशनल डिफेन्स अकॅडमी २) कौन्सिल ऑफ स्टेट्स ३) बंगळुरू ४) ७५१७ कि.मी. ५) हिमसागर एक्स्प्रेस ६) शहनाई ७) इन्फंट्री ८) राजस्थान ९) हवाना १०) भारत



## भारतीय संघाने माजी क्रिकेटपटू शिवलकरांना वाहिली श्रद्धांजली

**आज भारतीय संघ ऑस्ट्रेलियाविरूद्ध चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेतील सेमीफायनलचा सामना खेळला गेला. या सामन्यात भारतीय संघाने माजी क्रिकेटपटू पद्माकर शिवलकर यांना श्रद्धांजली वाहिली. भारतीय संघ आज हाताला काळी पट्टी बांधून मैदानात उतरला. भारताचे माजी क्रिकेटपटू पद्माकर शिवलकर यांचे परवा मुंबईमध्ये निधन झाले. महान फिरकीपटू शिवलकर हे मुंबईसाठी २० वर्ष क्रिकेट खेळले आहेत. त्यांनी जवळपास वयाच्या ५० व्या वर्षी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. शिवलकर यांनी एकूण १२४ प्रथम श्रेणी सामने खेळले आहेत. ज्यामध्ये त्यांनी १२४ मध्ये ५८९ विकेट्स घेतल्या आहेत व ५१५ धावा केल्या.**

# टीम इंडिया अंतिम फेरीत

## ऑस्ट्रेलियाला ४ विकेट्सने पराभूत करत सलग तिसऱ्यांदा गाठली चॅम्पियन्स ट्रॉफीची अंतिम फेरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेत भारतीय संघाने अंतिम सामन्यात स्थान मिळवलं आहे. मंगळवारी (४ मार्च) दुबईत झालेल्या उपांत्य सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाला ४ विकेट्सने पराभूत करत सलग तिसऱ्यांदा चॅम्पियन्स ट्रॉफीची अंतिम फेरी गाठली. यापूर्वी भारताने २०१३ आणि २०१७ साली झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यातही स्थान मिळवले होते. २०१३ मध्ये भारत विजयी झाला होता, तर २०१७ मध्ये उपविजेता होता. आता १२ वर्षांनी पुन्हा विजेतेपद मिळवण्याकडे भारताने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे.

भारतासमोर ऑस्ट्रेलियाने विजयासाठी २६५ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग भारताने ४८.१ षटकात ६ विकेट्स गमावत पूर्ण केले. भारताकडून विराट कोहलीने अर्धशतकी खेळी केली. त्याला श्रेयस अय्यरचीही चांगली साथ मिळाली. दरम्यान, आयसीसी वनडे स्पर्धांमध्ये बाद फेरीत ऑस्ट्रेलियाविरुद्ध झालेला हा सर्वोच्च धावांचा यशस्वी पाठलाग आहे. भारताने आपलाच २०११ वर्ल्ड कपमधील विक्रम मागे टाकला आहे. याआधी २०११ वर्ल्ड कपच्या उपांत्यपूर्व फेरीत भारताने २६१ धावांचे लक्ष्य ऑस्ट्रेलियाविरुद्ध पार केले होते.

भारताकडून रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांनी डावाची सुरुवात केली होती. रोहितने आक्रमक खेळ सुरुवातीचा केला होता. पण शुभमन गिल पाचव्या षटकात ८ धावांवर बेन ड्वारशुईच्या गोलंदाजीवर त्रिफळाचीत झाला. त्याच्यापाठोपाठ ८ व्या षटकात रोहित शर्माही २९ चेंडूत २८ धावा करून माघारी परतला. त्याला कुपर कोनोलीने पायचीत केले.

यानंतर मात्र विराट कोहली आणि श्रेयस अय्यर यांनी एकेरी-दुहेरी धावांबरोबरच खराब चेंडूवर चेंडू सीमापार करताना धावफलक हलता राहिल याची काळजी घेतली. या दोघांनी ९१ धावांची भागीदारीही केली. यादरम्यान विराटने अर्धशतक पूर्ण केले. पण २७ व्या षटकात श्रेयसला ॲडम झाम्पाने त्रिफळाचीत करत भागीदारी तोडली. श्रेयस ६२ चेंडूत ४५ धावांवर बाद झाला. त्यानंतर विराटला काही वेळ अक्षर पटेलने साथ दिली. पण अक्षरला ३५ व्या षटकात नॅथन एलिसने २७ धावांवर त्रिफळाचीत केले.

पण तरी एक बाजू विराटने सांभाळली होती. त्याला केएल राहुल साथही देत होता. त्यामुळे विराट आणखी एक शतक करेल, असं दिसत होतं. परंतु, याचवेळी माशी शिंकली विराट ४३ व्या षटकात झाम्पाच्या गोलंदाजीवर बेन ड्वारशुईकडे झेल देत बाद झाला. विराटने ९८ चेंडूत ५ चौकारांसह ८४ धावांची खेळी केली.

विराट बाद झाल्यानंतर केएल राहुलला हार्दिक पांड्याने साथ दिली होती. पण विजयासाठी ६ धावांची गरज असताना पांड्या २४ चेंडूत २८ धावा करून बाद झाला.

तत्पुर्वी ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करताना ४९.३ षटकात सर्वबाद २६४ धावा केल्या होत्या. ऑस्ट्रेलियाकडून कर्णधार स्टीव्ह स्मिथने ९६ चेंडूत सर्वाधिक ७३ धावांची खेळी केली. तसेच ॲलेक्स कॅरेने ५७ चेंडूत ६१ धावा केल्या. या दोघांशिवाय ट्रॅव्हिस हेडने ३९ आणि मार्नस लॅबुशेनने २९ धावा केल्या. या चौघांनीच २० धावांचा टप्पा पार केला. बाकी कोणी खास काही करू शकले नाहीत.

भारताकडून गोलंदाजी करताना मोहम्मद शामीने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. तसेच वरुण चक्रवर्ती आणि रवींद्र जडेजा यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. हार्दिक पांड्या आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

## १६ वर्षाखालील टेनिस स्पर्धेत स्वानिका रॉय हिला दुहेरी मुकुट



**पुणे :** फर्ग्युसन कॉलेज यांच्या वतीने व शेपिंग चॅम्पियन्स फाऊंडेशन पुणे यांच्या सहकार्याने आयोजित एमएसएलटीए फर्ग्युसन कॉलेज पीएमडीटीए अखिल भारतीय मानांकन सुपर सिरीज 16 वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत मुलींच्या गटात स्वानिका रॉय हीने एकेरी व दुहेरी या दोन्ही गटात विजेतेपद पटकावत दुहेरी मुकुट संपादन केला. तर, मुलांच्या गटात एकेरीत मनन अग्रवाल याने आणि दुहेरीत आराध्य म्हसदे व दक्ष पाटील यांनी विजेतेपद पटकावले.

विशेष म्हणजे 100 वर्षे पूर्ण केलेल्या फर्ग्युसन कॉलेज टेनिस कोर्ट येथे पार पडलेल्या या स्पर्धेत एकेरीत मुख्य ड्रॉमध्ये अंतिम फेरीत मुलांच्या गटात अव्वल मानांकित मनन अग्रवाल याने आठव्या मानांकित महाराष्ट्राच्या दक्ष पाटीलचा 6-4, 1-6, 7-6(4) असा संघर्षपूर्ण पराभव करून विजेतेपद पटकावले. हा सामना 2तास 10मिनिटे चालला. पहिल्या सेटमध्ये सुरुवातीला दोन्ही खेळाडूंनी आपापल्या सर्व्हिस राखल्या. दहाव्या गेममध्ये मननने दक्षची सर्व्हिस ब्रेक केली व हा सेट 6-4 असा जिंकून आघाडी मिळवली. दुसऱ्या सेटमध्ये दक्षने जोरदार खेळ करत तिसऱ्या, पाचव्या गेममध्ये मननची सर्व्हिस भेदली व हा सेट 6-1 असा जिंकून आपले आव्हान कायम राखले. तिसऱ्या व निर्णायक सेटमध्ये दोन्ही खेळाडूंनी आक्रमक खेळ केला व सामन्यात बरोबरी कायम ठेवली. बरोबरी झाल्यामुळे टायब्रेकमध्ये मननने आपला खेळ उंचावत दक्ष विरुद्ध हा सेट 7-6(4) असा जिंकून विजेतेपदावर आपले नाव कोरले. मनन हा डेक्कन जिमखाना येथे संदीप किर्तने यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो.

## साखळी क्रिकेट स्पर्धेसाठी ईशा पाठारेकडे महाराष्ट्र संघाचे नेतृत्व



**पुणे :** भारतीय क्रिकेट नियमक मंडळाच्या वतीने चंदीगड येथे २३ वर्षाखालील महिला एकदिवसीय साखळी क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाचे नेतृत्व ईशा पाठारेकडे सोपविण्यात आले आहे. महाराष्ट्राचा एलिट 'क' गटात समावेश आहे . या गटात महाराष्ट्र, पांडेचेरी, नागालँड, दिल्ली, बंगाल आणि गुजरात या संघाचा समावेश आहे. महाराष्ट्राचा पहिला सामना पुड्डेचेरी संघाबरोबर पाच मार्चला होईल. दुसरा सामना सात तारखेला नागालॅण्ड संघाबरोबर, तिसरा सामना नऊ तारखोला दिल्ली संघाबरोबर, चौथा सामना बंगाल व अखेरचा साखळी सामना गुजरात संघाबरोबर तेरा तारखेला होणार आहे. सतरा मार्चपासून बाद फेरीचे सामने सुरु होतील. उपांत्य फेरी २४ मार्च आणि अंतिम सामना २६ मार्च रोजी खेळविण्यात येईल. बाद फेरीचे सामने कटक येथे होणार आहेत.

एमसीएचे सचिव कमलेश पिसाळ यांनी जाहीर केलेला महाराष्ट्र संघ : ईशा पाठारे (कर्णधार), खुशी मुल्ला, ईश्वरी सावरकर, ईश्वरी अवसरे, श्रध्दा गिरमे, भाविका अहिरे, आयेशा शेख, श्रावणी देसाई, श्रुती महाबळेश्वरकर, इशिता खळे, गायत्रि सुर्वे, सौम्यलता बिरादार, उत्कर्षा कदम व श्वेता सावंत.

## पीवायसी विनसिस रॅकेट लीग स्पर्धेत 196 खेळाडू सहभागी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना क्लब आयोजित आठव्या पीवायसी विनसिस रॅकेट लीग स्पर्धेस पासून प्रारंभ होत असून या 6 संघात मिळून 196 खेळाडू सहभागी झाले आहेत. नऊ तारखेपर्यंत पीवायसी हिंदू जिमखाना क्लबच्या टेबल टेनिस, टेनिस व बॅडमिंटन कोर्टवर ही स्पर्धा होत आहे.

अधिक माहिती देताना पीवायसी हिंदू जिमखानाचे अध्यक्ष कुमार ताम्हाणे आणि क्लबचे सह सचिव सारंग लागू यांनी सांगितले की, पीवायसी विनसिस रॅकेट लीग ही अनोखी व नाविन्यपूर्ण अशी लीग स्पर्धा मिश्र गटांत होणार असून यामध्ये प्रौढ, पुरूष, महिला आणि कुमार यांचा संघात समावेश असणार आहे.

क्लबचे सह सचिव सारंग लागू पुढे म्हणाले की, क्लबच्या सभासदांकरिता क्रिकेट, बॅडमिंटन, बास्केटबॉल, स्नूकर, टेनिस, टेबल टेनिस, फुटबॉल, फिटनेस आणि इतर सर्व रॅकेट क्रीडा प्रकारांमध्ये अशा वेगवेगळ्या क्रीडा प्रकारात लीग स्पर्धा आयोजित करणारा पीवायसी हिंदू जिमखाना क्लब हा शहरांतील एकमेव क्लब आहे. तसेच या क्रीडा प्रकारांच्या माध्यमातून सदस्यांना मनोरंजनबरोबरच आपले आरोग्य उत्तम ठेवण्यास महत्वपूर्ण ठरेल. या प्रमुख स्पर्धेबरोबर किड्स लीग स्पर्धा खेळविण्यात येणार असुन यामध्ये 56 खेळाडूंचा समावेश आहे.

स्पर्धेसाठी 196 खेळाडूंची निवड लिलाव पध्दतीने करण्यात आली असून हे खेळाडू सहा संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

### पुण्याच्या रॅली ड्रायव्हरची जागतिक स्तरावरील स्पर्धेतील लक्षवेधी कामगिरी

## थायलंड मधील रॅलीत संजयला तिसरा क्रमांक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुण्याचा आंतरराष्ट्रीय रॅली ड्रायव्हर संजय टकले याने जागतिक स्तरावरील स्पर्धेतील लक्षवेधी कामगिरीची मालिका कायम राखली आहे. थायलंड येथे पार पडलेल्या रॅलीमध्ये त्याने तिसरा क्रमांक मिळवून करंडक पटकावला.

फोर बाय फोर (४×४) मालिकेतील पहिल्या फेरीत त्याने टी १ या व्यावसायिक गटात त्याने ही कामगिरी बजावली. साकिओ प्रांतातील नाखोन राचसीमा शहरात ही रॅली पार पडली. संजय याने मुंबईस्थित एअरपेस रेसर्स संघाचे प्रतिनिधित्व केले. थायलंडमधील फास्ट फॉरवर्ड स्पोर्ट संघाच्या तांत्रिक साथीत ही कामगिरी साकार झाली.

एक आणि दोन मार्च अशा दोन दिवशी ही रॅली झाली. रॅलीचे एकूण अंतर २५० किलोमीटर होते, ज्यातील १३३ किलोमीटर अंतर स्पर्धात्मक होते. संजयने टोयोटा हायलक्स ही कार चालवली. किराती नाजोरीद त्याचा सहकारी ड्रायव्हर (नॅव्हीगेटर) होता. रॅलीच्या आदल्या दिवसापासून टेस्टिंगच्या दरम्यान संजय याच्या कारमध्ये तांत्रिक समस्या निर्माण झाली होती, जी त्याच्या संघातील तंत्रज्ञांना परिणामकारकरित्या दूर करता आली नाही. अशा परिस्थितीत संजयला वेग राखण्यास पुरेशी पॉवर मिळत नव्हती. कारचा वेग वाढतच ती अस्थिर होत होती. त्यामुळे छोट्या वळणांवर संजयला वेग कमी करणे भाग पडत होते. त्याचा वेळेवर आणि एकूण कामगिरीवर प्रतिकूल परिणाम होत होता. संजयने त्यानंतरही खचून न जाता अलीकडेच झालेल्या डकार रॅली मधील अनुभव पणास लावला. पुरेसा वेग राखत फेऱ्या पूर्ण करण्याचे धोरण ठेवले. बाकी असताना मार्गावरील एका खोलगट भागात त्याची कार जमिनीला आपटून थोडी उडाली. ह्यात संजय याच्या मनगटाला दुखापत झाली. त्यानंतरही संजयने कारचे स्टेरिंग ताकद एकवटून धरत रॅली सुरू ठेवली.

संजयने ह्या कामगिरी बद्दल समाधान व्यक्त केले. त्याने सांगितले की, सौदी अरेबिया मधील आव्हानात्मक अशी डकार रॅली पूर्ण केल्यानंतर मला स्पर्धात्मक पातळीवर सहभागी होणे आवश्यक आहे. मी डकार रॅली संदर्भात एक विशिष्ट उद्दिष्ट ठेवले आहे. त्यादृष्टीने सहभागी झालो. थायलंडमधील विविध प्रांतांत होणाऱ्या रॅली खडतर मार्गांवर होतात. त्या अनुभवाचा फायदा होतो.

पुण्याचा आणखी एक स्पर्धक अनिरुद्ध देशपांडे याने टी 2 गटात चौथा क्रमांक मिळवला.

## राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत यंगस्टार कबड्डी संघ अजिंक्य



**इंदापूर :** निरवांगी येथे झालेल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत शिर्सुफळ ( बारामती) च्या यंगस्टार कबड्डी संघांने अजिंक्यपद मिळवत सात हजार रुपयाचे पहिले बक्षीस व ट्राफी पटकावली. निरवांगी येथील छावा स्पोर्ट क्लब, जय महाराष्ट्र क्रिडा मंडळाच्या वतीने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. दि.१ ते २ मार्च या कालावधीत निरवांगी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या पाठीमागे कबड्डीचे सामने झाले. अजिंक्यपद मिळवणाऱ्या संघाला उद्योजक अमोल मालोजी गुरव यांच्या वतीने प्रथम क्रमांकाचे ७ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. सागर गुरव, प्रणित गायकवाड, पृथ्वीराज शिंदे, किरण गुरव व त्यांच्या सहका-यांनी स्पर्धेचे नियोजन केले होते. स्पर्धेत अजिंक्य ठरलेल्या यंगस्टार कबड्डी संघांच्या संकेत महादेव आटोळे, वैभव मुळे, शुभम चव्हाण, शहीद शेख, ज्ञानेश आडागळे, चिकू आडागळे, सार्थक आटोळे, पन्ना आटोळे, अमोल आव्हाड, प्रेम म्हेत्रे, प्रतीक कांबळे या खेळाडूंनी चित्तथरारक खेळ करत विजयश्री खेचून आणली. त्यांना प्रशिक्षक महादेव आटोळे, बंडू थोरात यांचे मार्गदर्शन मिळाले.

## इन्फोसिस आंतर आयटी टी 20क्रिकेट स्पर्धेत इन्फोसिस संघाला विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** इन्फोसिस आंतर आयटी टी 20क्रिकेट स्पर्धेत अंतिम फेरीत हृषिकेश खांडेकर(95धावा), आशय पालकर(53धावा) यांनी केलेल्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर इन्फोसिस संघाने केपीआयटी संघाचा 77 धावांनी पराभव करून विजेतेपद संपादन केले.

इन्फोसिस क्रिकेट मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत प्रथम फलंदाजी करताना इन्फोसिस संघाने 20षटकात 6बाद 206धावाचे आव्हान उभे केले. यात हृषिकेश खांडेकरने 51चेंडूत 11चौकार व 4षटकाराच्या मदतीने 95धावांची तडाखेबंद खेळी केली. त्याला आशय पालकरने 31चेंडूत 2चौकार व 4षटकारासह 53धावा, संदीप संघाईने 33धावा, तरुणकुमार रायने 17 धावा काढून साथ दिली.

या आव्हानाचा पाठलाग करताना केपीआयटी संघ 16.5षटकात सर्व बाद 129धावावर संपुष्टात आला. यात मंगेश पाटील 70, आलोक नागराज 31 यांनी दिलेली लढत अपुरी ठरली. इन्फोसिस संघाकडून हर्षद तिडके(4-25), निखिल रोकडे(3-14), सागर बिर्दावडे(2-14)यांनी सुरेख गोलंदाजी करत संघाला 77 धावांनी विजय मिळवून दिला.

स्पर्धेतील विजेत्या संघाला करंडक व रोख रकमेची पारितोषिके देण्यात आली. याशिवाय मालिकावीर हा पुरस्कार हर्षद तिडके याला देण्यात आला. स्पर्धेचे पारितोषिक वितरण इन्फोसिसचे आयआरसी हेड आनंद बारटक्के यांच्या हस्ते करण्यात आले.

### युवा पर्व चषक १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धा

## अजिंक्य क्रिकेट क्लब संघाचा दुसरा विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पवार फाउंडेशन आणि युवा पर्व फाउंडेशन आयोजित युवा पर्व चषक १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत विरेन आटोळे 4-21) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर अजिंक्य क्रिकेट क्लब संघाने पाटोळे क्रिकेट क्लब संघाचा 18 धावांनी पराभव करून दुसऱ्या विजयाची नोंद केली.

राजगड स्पोर्टस अकादमी, आव्हाळवाडी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत प्रथम फलंदाजी करताना अजिंक्य क्रिकेट क्लब संघ 42.1षटकात सर्व बाद 167धावावर संपुष्टात आला. यात प्रिन्स दाभड 38, सुयश कदम 31, प्रशांत निंबाळकर 31 यांनी धावा काढून संघाच्या डावाला आकार दिला. पाटोळे क्रिकेट क्लबकडून अर्णव सिडणकर(2-16), कार्तिक कोरडे(2-15), समर्थ चौधरी(2-20) यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. या आव्हानाचा पाठलाग करताना पाटोळे क्रिकेट क्लब संघ 42.2षटकात सर्व बाद 149धावावर कोसळला.

## स्पोर्ट्स मॅनियाची विजयी सुरुवात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** रिलायन्स फाऊंडेशन यंग चॅम्प्सचा 4-0 असा पराभव करताना स्पोर्ट्स मॅनियाने एआयएफएफ सब ज्युनियर लीगमध्ये (2024-25) विजयी सुरुवात केली. त्यात शौर्य रोहन मोहोळ (२ गोल) चमकला.

स्पोर्ट्स मॅनिया टर्फ येथे सोमवारी शौर्य रोहन मोहोळ (९') आणि नंतर कार्तिक जोशीच्या (३७') गोलच्या जोरावर स्पोर्ट्स मॅनियाने मध्यंतराला २-० अशी आघाडी घेतली.

उत्तरार्धात, शौर्य (45') आणि आर कार्तिकेयने (53') त्यात भर घातली. त्यामुळे, स्पोर्ट्स मॅनियाने ४-० अशा फरकाने विजय मिळवला.

स्पोर्ट्स मॅनिया त्याचा पुढील सामना घरच्या मैदानात 6 मार्च रोजी डिसूझा फुटबॉल अकॅडमीशी खेळेल.

स्पोर्ट्स मॅनियाचा ब गटात समावेश असून त्यात मुंबई सिटी एफसी, महाराष्ट्र ओरांजे एफसी, डिसूझा फुटबॉल अकॅडमी, रिलायन्स फाऊंडेशन यंग चॅम्प्स, एसएसई बीएफसी सॉकर स्कूल या मुंबईच्या संघांचा समावेश आहे. प्रत्येक टीम होम आणि अवे सामना खेळेल.

### पुनित बालन ग्रुप तर्फे आयोजित चौथी 'फ्रेंडशिप करंडक' २०२५ क्रिकेट स्पर्धा !!

## रंगारी रॉयल्स्, तुळशीबाग टस्कर्सनी गाजवला दिवस!!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** रंगारी रॉयल्स्, तुळशीबाग टस्कर्स, सुर्योदय रायझर्स, रमणबाग फायटर्स संघांनी गाजवला उद्घाटनाचा दिवस

पुणे : पुनित बालन ग्रुप तर्फे आयोजित पुण्यातील गणपती मंडळ, नवरात्र मंडळ, ढोल-ताशा पथकांच्या संघांचा समावेश असलेल्या चौथ्या 'फ्रेंडशिप करंडक' क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत रंगारी रॉयल्स्, तुळशीबाग टस्कर्स, सुर्योदय रायझर्स आणि रमणबाग फायटर्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेच्या उद्घाटनाचा दिवस गाजवला.

सहकारनगर येथील ल.रा. शिंदे हायस्कूल येथील मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन पुण्याचे पोलिस उपायुक्त (झोन १ चे) संदीपसिंग गिल आणि पुनित बालन ग्रुपचे संचालक आणि 'फ्रेंडशिप करंडक' क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेचे मुख्य आयोजक पुनित बालन यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अखिल मंडई मंडळाचे अण्णा थोरात, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टचे संजीव जावळे, तुळशीबाग गणपती मंडळाचे नितीन पंडीत यांच्यासह पुण्यातील गणपती उत्सव मंडळ, नवरात्र उत्सव मंडळांचे अध्यक्ष, मीडिया क्षेत्रातील मान्यवर आदि उपस्थित होते.

> "ही केवळ स्पर्धा नसुन एक क्रिकेट महोत्सवच आहे. या महोत्सवामध्ये पुण्यातील विविध गणेश मंडळ, नवरात्र मंडळ तसेच ढोल-ताशा पथक अशा सर्वच क्षेत्रातील कार्यकर्ते व नागरिक एकत्र येत आहेत आणि मैत्रीचे नवे नाते निर्माण करत आहेत. "
> — **संदीपसिंग गील,** पोलिस उपायुक्त, पुणे (झोन १)

#रा